


" श्री शिवाजी " छापखान्यात छापिला.

---

मिति मार्गशीर्ष कृष्ण ३ शके १८०६ तारणनाम संवत्सरे,
तारिख ५ माहे डिसेंबर सन १८८४.

---

( या ग्रंथावर सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिष्टर करून ग्रंथकर्त्यानें आपला सर्व हक्क ठेविला आहे. )

किंमत १८४

टपाल व बंगीखर्च ८२ आणे.

For copyright

No 112 of I/1885

क्र.वि. ६३४

रा. रा. जनार्दन बाळाजी

“ श्री शिवाजी ” छा[illegible] छापिला.

मिति मार्गशीर्ष कृष्ण ३ शके १८०६ तारणनाम संवत्सरे,
तारिख ५ माहे डिसेंबर सन १८८४.

( या ग्रंथावर सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिष्टर करून ग्रंथ-
कर्त्यानें आपला सर्व हक्क ठेविला आहे. )

किंमत १०४

टपाल व बंगीखर्च ०२ आणे.

# व्यवहारपद्यसहस्र.

हा

सुभाषितग्रंथ,

**केशव सदाशिव रिसबूड संगमनेरकर,**

धुळें येथील माजी ट्रेनिंगमास्तर,

हल्लीं पेन्शनर मु० नाशिक,

यानीं

रचून तयार केला.

तो

लोकहितार्थ,

पुणें येथें

"श्री शिवाजी" छापखान्यांत छापिला.

मिति मार्गशीर्ष कृष्ण ३ शके १८०६ तारणनाम संवत्सरे,
तारिख ९ माहे डिसेंबर सन १८८४.

(या ग्रंथावर सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिष्टर करून ग्रंथकर्त्यानें आपला सर्व हक्क ठेविला आहे.)

किंमत १०४

टपाल व बंगीखर्च ०२ आणे.

॥ आर्या. ॥

॥ व्यवहाराऽऽराम–विषय–तरु–पद्य–सहस्र–पुष्प-हार नवा ॥
॥ हा कांठें धरा, जन, यद्गंधें शमवूनि चित्तताप निवा ॥ १ ॥

# व्यवहारपद्यसहस्र.

## प्रस्तावना.

विचार करून पाहतां, अलीकडे पंचवीस तीस वर्षांत स्वकपोलकल्पित कांदबऱ्या, सुरस गोष्टी, नाटकें, अथवा अशाच प्रकारचीं परभाषांतील पुस्तकांचीं भाषांतरें, अशीं नवीन नवीन पुस्तकें साल दरसाल बरींच प्रसिद्धीस आलीं व येत आहेत. हीं पुस्तकें हातीं येवांच प्रथमतः त्यांच्या "कल्पित" या विशेषणानेंच त्यांजवरील निष्ठा कमी होते. पुढें त्यांचें वाचन होत असतां तात्कालिक मनोरंजन होतें, ही गोष्ट खरी; तथापि, त्यांचें वाचन एक दोन दिवसांत लगेहातींनें आटोपलें ह्मणजे त्यांची अभिरुचि न उरून पुढें कोणत्याही लोकहितकार्यांत त्यांची अवश्यकता नसल्यामुळें पुनः त्यांस हातीं धरण्याचा प्रसंग क्वचित् येतो, हा सर्वत्र अनुभव आहेच. दूर कशास ? आमच्या घराण्यांतच **मंजुघोषा, विश्वासराव** आणि **वसंतकोकिला** हीं पुस्तकें निर्माण झालीं असून पहिल्यास तर सुमारें दीड तप लोटून बऱ्याच आवृत्तिही निघाल्या; परंतु सदहू पुस्तकें तयार झाल्यावेळीं जें त्यांचें एकदां वाचन झालें त्याजवर आजपर्यंत तीं पुस्तकें वाचण्याची पुनः गरजच पडली नाहीं. अशा प्रकारच्या पुस्तकांची लोकांस केवळ एक वेळां मनोरंजनार्थ वाचनापेक्षां जास्त अपेक्षा नसल्यामुळें तीं लोकांच्या हातोहात फिरण्यांत लवकरच जर्णि दशा पावून अखेरीस कोठेंतरी अव्यवस्थेंत पडून राहतात. दुसरें, जगांत होऊन गेलेल्या सर्व प्रसिद्ध शूर पुरुषांचीं अथवा जगमान्य सत्पुरुषांचीं चरित्रपुस्तकें किंवा क्षेत्रवर्णनें (अनुक्रमें त्यांच्या शौर्य, सुजनता, माहात्म्यरचनादिकरून कर्तृत्वगुणस्थितींचे मिळतील तितके लेख व दाखले जमवून) वेळोवेळीं प्रसिद्ध होत आहेत. तीं वाचतांना त्यांतील खऱ्या गोष्टींवरून त्यांजवरील निष्ठा जरी कायम राहते; तथापि, त्यांचें एकवेळां वाचन झालें ह्मणजे त्यांचाही लोककल्याणीं विशेष उपयोग न होतां त्यांस देखील बहुतेक एके ठिकाणींच स्थिर रहावें लागतें; परंतु निरंतर सर्वोपयोगीं ह्मणजे ज्यांच्या नुसत्या एकाच वाचनानें तर काय, परंतु कित्येक आवृत्तींनींही लोकांची तृप्ति व कार्य न होतां ज्यांचें नित्य वाचन, उद्घाटन, चर्चा, व की-

र्तनादिकेंकरून कधीं कंटाळवाणें न होतां, जगाची स्थितिरीति, वर्तनादि सुधारलीं जाऊन त्यांचें कल्याण होईल, अशा प्रकारच्या व्यावहारिक प्राकृत सुभाषित ग्रंथांची नेहमीं फार गरज असतां, तिकडे अर्वाचीन ग्रंथकारांचें लक्ष्य न पोहोंचून, त्यांजकडून वर दर्शविलेल्या उभय मार्गांचेंच वारंवार अवलंबन होत असल्यामुळें जगाचा फार तोटा होत आहे.

आतां, " आपण जेवुनी जेववी लोकां " या श्री तुकारामाच्या सदुक्तीप्रमाणें नेहमीं जगांत कार्यें घडत गेलीं पाहिजेत; या विचारानें सुमारें साडेतीन वर्षें झालीं, मनांत आलें कीं, परमेश्वरानें जी आपणास थोडी फार कविताभिरुचि व बुद्धि दिली आहे, त्यांचा विनियोग कांहीं तरी एखाद्या सर्वोपयोगीं ग्रंथरचनेच्या कामाकडे करावा; मग त्या कामीं, " जो व्यवहारी चोखटा । त्यानेंच परमार्थाच्या लंघिल्या वाटा ॥ येर ते स्वार्थपरमार्था फुकटा । अंतरले " ॥ १ ॥ ह्या श्री ज्ञानेश्वराच्या सर्व मान्य ओंवीप्रमाणें स्वार्थ आणि परमार्थ साधक असा "व्यवहार" हा विषय योजून, मनानें सिद्ध केलेल्या त्याच्या नकाशाबरहुकूम या ग्रंथरूपी इमारतीच्या पायाचा पहिला दगड शके १८०२ च्या माघमासीं बसविला. पुढें तें काम आपल्या सवडीप्रमाणें व बुद्धिरूप ऐपतीप्रमाणें सहा महिनेपावेतों हळू हळू चालवून त्या इमारतीचें नुकतेंसें जोतें तयार होत आहे इतक्यांत, माझें पूर्वसंचित दुर्दैव ओढवून त्यानें ध्यानीं मनीं नसतां मजवर अकस्मात् गुप्त छापा घालून मला जखडून त्या इमारतीचें कामास एकदम हरकत दिली.

**श्लोक.**

सर्वेंद्रियांत नयनेंद्रिय हें प्रधान. । त्यावांचुनी सकल ह्या जगतांत शून्य॥
सारीच दृष्टिविण सृष्टि निरर्थका ही।जीहून मूल्य न जगांत पदार्थ कांहीं॥ १॥
राजाशिवाय जशि तेजहता प्रजा ती।स्त्री दीन कीं स्वपतिवांचुनि विप्रजातीं॥
हें चक्षुरिंद्रिय तसें नृप. काय सांगू? । सर्वेतरावयव त्या व्यतिरिक्त पंगू॥ २॥
हा दिव्य देहरथ,ज्या पदहस्त वाजी;।त्यासारथी चतुर चंचल चक्षु गाजी॥
ज्यावांचुनी भडकुनी हय आडवाटें।जातां क्षणीं रथ कलंडुनि जाय नेटें॥ ३॥

असें जें सर्वेंद्रिय-श्रेष्ठ नयनेंद्रिय, त्यासच अकस्मात् विकृति घडून दृष्टी नष्ट झाली. ती अशी—

## श्लोक.

येऊनि नेत्र, चढुनी वर दाट सारा, । आच्छादलींच बुबुळें दिवसांत वारा.॥
हो हालचाल सहजीं मग बंद सारी.।होतां विधी उलट,कोण तया निवारी?॥१॥

अशी स्थिति माझे वयाचे एकेचाळीसावे वर्षी एकदम प्राप्त झाल्यामुळें सर्व सृष्टसुखास अंतरून मी किती दुःखी झालों असेन ? या विषयींची स्पष्टता करण्यास मी समर्थ नाहीं ! इतकेंच खरें कीं, अशी दुःसह स्थिति व दुरवस्था ईश्वर कधीं कोणासही न देवो ! असो, भगवदिच्छेनें प्राप्त झालेल्या स्थितीस सादर होऊन डोळ्यांच्या दुरस्तीचे उपचारार्थ आज तीन वर्षें सतत गांवोगांव श्रम, कष्ट, विपत्ति भोगीत फिरून, त्यांतच आज दीड वर्ष झालें, मी श्री क्षेत्र नाशिक येथें वस्तीस आहें; परंतु डोळ्यांचे कामीं इतका दीर्घोद्योग करून सर्वोपरि पैशानें व शरीरानें खरात्रीस आलों, तरी परिणामीं कांहींच फायदा झाला नाहीं. "आलें देवाजीचे मना । तेथें कोणाचें चालेना." असो, अशा स्थितींतच आरंभ केलेल्या ग्रंथाचें पूरीकरणार्थ मनास स्वस्थ वाटलेल्या वेळीं लागून, जरी व्यवहार अनंत आहे, तरी स्वहेत्वनुरूप[1] एकसहस्र कवितांनीं युक्त असें हें "व्यवहारपद्यसहस्र" नामें पुस्तक रचिलें आहे. यांत लोकांची स्थितिरीति, चालचलणूक, रहणी, वर्तनादिकेंकरून एकंदर सर्व प्रकारचा व्यवहार परस्परांशीं कसा असावा, आणि त्याच्या ग्रहणाग्रहणानें बरे वाईट परिणाम कसे घडतात, याविषयीं त्यांस अनुकूल अशा पौराणिक, ऐतिहासिक आणि व्यावहारिक उदाहरणांनीं स्पष्ट करून, सुसंगत कीर्तनसरणीनें प्रकरणवार विवेचन केलें आहे. या पुस्तकाचे १ ईशनमन व ईशस्तुति; २ मुख्य व्यवहार[2]; ३ सर्वव्यवहार[3]सार आणि ४ जनांस व मनास[4] उपदेश आणि ईशप्रार्थना; असे ४ विभाग केले आहेत.

पुस्तकांत ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, विसर्ग, विरामादिचिन्हें इत्यादिकांची शुद्धता बहुधा बरोबर राखिली आहे; कवितांचे पादांतीं आलेले संस्कृत इकारांत व उकारांत शब्द पादांतस्थल द्विमात्रक जाणून ईकारांत व ऊकारांत ठेविले आहेत; प्रत्येक शब्द निरनिराळे दाखवून दोन

---

१ श्लोकार्याबद्ध. २ श्लोकबद्ध प्रकरणें ३३. ३ दृष्टांतपर आर्याबद्ध प्रकरणं ५७. ४ अनुक्रमें साक्या, दिंड्या, पदें व कटाव यांहीं युक्त.

किंवा अधिक शब्दयुक्त सामासिकपदें, मध्यें अशीं - संयोगचिन्हें देऊन जोडून दाखविलीं आहेत; तशींच सामासिक शब्दांत स्वरसंधिस्थळीं अकार किंवा आकार स्पष्ट समजण्यासाठीं एक किंवा दोन अशीं अवग्रहचिन्हें दाखविलीं आहेत; विशेषनामाचीं आद्याक्षरें आणि विशेषस्थळीं प्रधान शब्द मोठ्या अक्षरांनीं दाखविले आहेत; कवितांत दूरान्वयी शब्दांचा निकट संबंध समजण्यासाठीं त्या त्या शब्दावर शून्यादिकरून एकाच जातीच्या खुणा दिल्या आहेत; कठीण शब्दांवर अंक घालून त्यांच्या टिपा खालीं दिल्या आहेत; पुस्तक छापणें होऊन अखेर ज्या चुक्या राहिल्या आहेत, त्यांचें शुद्धिपत्र पुस्तकाचे शेवटीं दिलें आहे. हें सर्व काम मजकडून होईल तितक्या खबरदारीनें केलें आहे; तथापि माझे दृष्टीबाहेर, ह्मणजे परदृष्टीनें हें काम झालें असल्यामुळें कदाचित् कांहीं न्यूनाधिक होऊन चुका राहिल्या असतील, त्यांजबद्दल माझी सर्वप्रकारें पराधीन स्थिति मनांत आणून वाचक क्षमा करतील.

मूळ तयार होत गेलेल्या कवितांचे लेखनापासून तों पुस्तक छापण्याचें काम आटोपेपर्यंत माझ्या पराधीनतेमुळें जे श्रम पडले ते सांगतां येत नाहींत; परंतु मूळप्रत लिहून तयार होतेवेळीं रा. रा. वासुदेव लक्ष्मण गोखले कल्याणकर नाशिक जिल्ह्यांतील अ. कलेक्टर साहेबाचे माजी पंडित हल्लीं मुक्काम मुंबई, यांनीं ग्रंथतपासणीचे कामीं जी प्रेमपुरःसर सवडीप्रमाणें मदत दिली, तीबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे.

सर्वकालीं, सर्वदेशीं, सर्व लोकांस, या पुस्तकाचा उपयोग घडावा, अशा हेतूनें ग्रंथकर्त्यानें आपल्या बुद्धीप्रमाणें हें पुस्तक रचिलें असून सर्वत्र संग्रहास योग्य होईल, असा इरादा ठेविला आहे; तरी सर्व लोकांनीं या समयीं या पुस्तकास आपला पूर्ण उदार आश्रय देऊन, ग्रंथकर्त्याची उमेद ताजी राखिली असतां, पुढें अशींच सर्वोपयोगीं कामें ग्रंथकर्त्याच्या हातून घडण्याचा संभव आहे.

ग्रंथकर्ता.

संगमनेरस्थ के. स*. रि.

---

* आर्या—के—केशव, स-सदाशिव आणि रि रिसबूड नाम गणुनि पहा.॥
संगमनेरनिवासी, संगमनेरस्थ ह्मणुनि के. स. रि. हा॥१॥

काव्य ९५८३

# व्यहारपद्यसहस्त्र पुस्तकाची अनुक्रमणिका.


| कविता. | प्रकरणाचें नांव. | पृष्ठ. |
|---|---|---|
| | **विभाग १ ला.** | |
| | श्लोकार्याबद्ध प्रकरणें २. | |
| १ | ईशनमन. श्लोक | १ |
| ४५ | ईशस्तुति. आर्या | १ |
| | **विभाग २ रा.** | |
| | श्लोकबद्ध मुख्य प्रकरणें २६ आणि पोट प्रकरणें २१. | |
| ६३ | मातापितरांचें कर्तृत्व आणि पुत्राचें कर्तव्य व कर्तव्येतर वर्तन. | |
| | १७ आईचें कर्तृत्व | ६ |
| | १३ बापाचें कर्तृत्व | ९ |
| | १७ पुत्राचें कर्तव्य | ११ |
| | १६ पुत्राचें कर्तव्यान्यकर्म | १५ |
| २१ | बंध्वैक्य वर्तन | १८ |
| ४४ | स्त्रीपुरूषांचें, संसारांत परस्पर व एकंदर वर्तन. | |
| | २ प्रकरण विवेचन | २२ |
| | १९ स्त्रीवर्तन | ,, |
| | २३ पुरुषाचें वर्तन | २५ |
| १४ | आळस. १३+१ फटका | ३० |
| २२ | उद्योग | ३३ |
| १५ | विद्या | ३७ |
| २८ | विद्वानांचीं लक्षणें २७+१ पद | ३९ |
| १६ | अधिकारी पुरूषांचें कर्तव्य व तद्विपरीत त्यांचें वर्तन. | |
| | ७ न्यायवर्तन | ४६ |
| | ५ अन्यायवर्तन | ४७ |
| | ४ तात्पर्य | ४८ |
| १२ | अधिकाऱ्याशीं प्रजेचें वर्तन | ४९ |
| १७ | संपत्तीचें लक्षण व तींत आपलें कर्तव्य | ५१ |
| १० | द्रव्यसंचय व त्याचा व्यय | ५४ |
| १५ | द्रव्यमाहिमा. | |
| | ९ संपत्युत्कर्ष | ५६ |
| | ६ संपत्यपकर्ष | ५८ |
| २७ | कालमहिमा. | |
| | ४ प्रकरण विवेचन | ५९ |
| | १४ दुर्दैव | ६० |
| | ९ सुदैव | ६२ |
| २२ | परोपकार | ६४ |
| १७ | मित्रत्व | ६८ |

१० षड्रिपुदमनावश्यकता ७१
९ साधुत्व............७३
१७ प्रामाणिकता ........७४
१५ ऐक्य व देशाभिमान.७७
१५ धैर्य...............८०
२२ शौर्य..............८३
१० कृतघ्नता .... .......८६
१३ कृतज्ञता ............८८
२७ धर्म ...............९१
२१ मद्यपान ............९६
५८ षड्रिपु
९ काम ............१००
९ क्रोध ...........१०२
१० लोभ ..........१०४
९ मोह.............१०६
१० मत्सर.........१०८
११ अहंकार.......११०

**विभाग ३ रा.**

आर्याबद्ध प्रकरणें(५७.)

३५० व्यवहारसार दृष्टांतपर आर्या.
७ ईशनाममहिमा ..११३
५ ईशभक्तवात्सल्य..११४
१७ सज्जन........११४
११ दुर्जन ........११६
११ महदाश्रय..... ११७
२ अबलाश्रय ....११८
११ मित्रत्व ........११८
६ शत्रुत्व ... .....११९
१५ सद्गुण .........११९
३ दुर्गुण............१२१
५ ज्ञानी ........... ,,
९ मूर्ख............ ,,
३ दाता ............१२२
४ कृपण............१२३
१० सधनता........१२३
५ निर्धनता..........१२४
२ स्वतंत्रता..........१२४
२ परतंत्रता ... ....१२५
३ कृतज्ञता..........१२५
३ कृतघ्नता... .......१२५
३ कालमहिमा.......१२६
९ दैवानुकूलता.......१२६
१६ दैवप्रतिकूलता...१२७
१० उद्योग..........१२८
२ आळस...........१२९
५ ऐक्य ............१२९
४ द्वैत.............१३०
५ थोरपणा.........१३०
४ थोरांशीं स्पर्धा....१३१
३ धैर्य ............१३१
३ शौर्य ......... ...१३१
२ कर्तृत्व...........१३२
६ स्त्रीस्वभाव........१३२
४ देहस्वभाव........१३२
५ हितेच्छुवाक्यामान्यता..........१३३
६ अतिशयता......१३३
३ स्वार्थसाधकता....१३४

३ पूर्वावधानता.····१३४
२ ममता. ···· ····१३४
३ प्रेमागत्य·······१३५
९ गरज············१३५
२ लालूच·········..१३६
३ जनरीति·······१३६
२ दुष्कर्मप्रवृत्ति... .१३६
६ काम ··········१३७
३ क्रोध ··· ·······१३७
८ लोभ ············१३७
६ मोह ············१३८
३ मत्सर············१३९
३ अहंकार ·······१३९
२ विद्यानुभव.......१३९
४ सत्पुत्र..........१४०
४ पतिव्रता ·······१४०
२ सद्गुरुनिष्ठा........१४०
४ आत्मसंयमन ····१४१
४ ईश्वरी चिंतन ····१४१
५२ सर्वसामान्य स्फुट प्रकरण. ·······१४१

**विभाग ४ था.**

१९ जनास उपदेश. पशुपक्षीकीटकादिकांचे ग्राह्य गुण. साक्या....१४७
३० मनास उपदेश.
२९देहाऽशाश्वतस्थिति. श्लोक१ दिंड्या२४..१४८
५स्वतरुणोपाय. पदें.१५१
४ परमेश्वराची प्रार्थना. पदें.. ··············१५५
१ ग्रंथसमाप्तिवर्णनकटाव१५९


१००५

पुस्तककर्त्याची नेत्रापंगास्थिति जाणून ज्या गृहस्थांनीं ह्या "व्यवहारपद्यसहस्र" पुस्तकाचे लोकप्रसिद्धीसाठीं केवळ परमार्थबुद्धीनें पैशाचीं रोख मदत दिली, त्यांचीं नावें त्यांनीं दिलेल्या द्रव्यसाह्याच्या रकमांसह खालीं दाखल करून ह्या त्यांच्या उदार आश्रयांबद्दल पुस्तककर्ता कृतज्ञतापूर्वक त्यांचे फार आभार मानीत आहे.

| आश्रयदात्यांचीं नावें. | हुद्दा. | ठिकाण. | साह्याची. रक्कम. रुपये. | प्रती. |
|---|---|---|---|---|
| रा० रा० | | | | |
| ,, ,, गोविंद रामचंद्र गरुड. | वकील डि. कोर्ट, | धुळें खान्देश. | १५ | १ |
| ,, ,, माधवराव नारायण गद्रे. | ग. प्रॉसिक्यूटर. | ,, | १० | १ |
| ,, ,, माधवराव नारायण ऊर्फ ... ... ... ... ... ... ... ... ... | | | | |
| भिकु आण्णा दांते. | हुजूर खजिनदार, | ,, | १० | १ |
| ,, ,, केशवराव जनार्दन पाटणकर | ओव्हरसि. प. व. डि. | जळगांव | १० | १ |
| भाषणसमाज. | भाषणसमाज. | ,, | १० | १ |
| ,, ,, नानाजी आबाजी देशपांडे ... ... ... ... | | नगर. | १० | १ |
| रा० ब० श्रीधर गुंडो | डि० डे० कलेक्टर, | खानदेश. | ५ | १ |
| रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी. | हेड मास्तर, | उमरावती. | ५ | १ |
| ,, ,, वामनराव नारायण रानडे. | वकील डि० कोर्ट, | धुळें खानदेश. | ३ | १ |
| ,, ,, केशवराव बापूजी जोपुळकर | हेड क्लार्क रेल्वे ... ... ... ... ... | | | |
| ... ... ... ... ... | म्यानेजर ऑफिस. | भुसावळ. | २ | १ |

काव्य १५८७

# व्यवहारपद्यसहस्र पुस्तकाविषयीं अभिप्राय.

"व्यवहारपद्यसहस्र" हें पुस्तककर्त्यानें मजकडे अभिप्रायासाठीं पाठविलें. तें समग्र वाचण्यास फारसा वेळ सांपडला नाहीं; तथापि जेवढा भाग पाहिला आहे, तेवढ्यावरून पाहतां पुस्तक लोकोपयोगीं होईल, असें वाटतें. भाषा सोपी व सरळ आहे व कांहीं कांहीं ठिकाणीं व्यवहारांत उपयुक्त असे नीतीचे उपदेश चांगल्या रीतीनें दिले आहेत. एकंदरीनें " व्यवहारपद्यसहस्र " लोकांनीं व विशेषत: लहान व्यवहारानभिज्ञ मुलांनीं संग्रहीं ठेवण्याजोगें पुस्तक आहे, असें माझें मत आहे.

मु० पुणें, ता० १ माहे आक्टोबर सन १८८४. } **वामन शिवराम आपटे, एम्. ए.** सुपरिंटेंडेंट ऑफ दी न्यूइंग्लिशस्कूल.

---

" व्यवहारपद्यसहस्र " हें पुस्तक सर्व वाचून अभिप्राय देण्याची इच्छा होती; परंतु कर्त्याचें दुसरें पत्र आल्यानें तसें करितां आलें नाहीं. ह्या पुस्तकापैकीं मीं ५०।६० पृष्ठें वाचलीं. भाषा सरळ आहे व गोड आहे. ज्यांस आपल्या हिंदु लोकांची जुनी रीतभात समजून घेणें असेल त्यांनीं हा ग्रंथ अवश्य वाचावा. आधुनिक विद्वानांवर व विशेषेंकरून त्यांनीं सुरू केलेल्या कित्येक प्रघातांवर ग्रंथकर्त्याची वाजवीपेक्षां अधिक करडी नजर दिसते. पूर्ववत् सर्व रहाटी कधींही रहात नाहीं; व कांहीं केल्यानें राहणारही नाहीं. शाहण्याचें एवढेंच काम आहे कीं, फेरफार जे करावयाचे ते बेताबाताचे, अत्यावश्यक व फायद्याचे असावेत. एकंदरीनें पुष्कळ लोकांस हा ग्रंथ पसंत होईल, व ते ग्रंथकर्त्याची विकल स्थिति मनांत आणून उदारत्वें त्यास सहाय्य होतील, अशी माझी खात्री आहे.

मु० अकोलें, प्रांत वऱ्हाड. ता० ८ आक्टोबर १८८४. } **विष्णु मोरेश्वर महाजनी, एम्. ए.** हेड मास्तर हायस्कूल अकोलें.

---

" व्यवहारपद्यसहस्र " हें पुस्तक मीं समग्र वाचून पाहतां त्यांतील प्रत्येक प्रकरणाचें संविधान चांगलें बांधिलें असून व्यवहारांत बऱ्या वाईट वर्तनापासून मनुष्याच्या होणाऱ्या हिताऽहिताविषयींचें निदर्शन सम्यक् उदाहरणांनीं चांगलें स्पष्ट केलें आहे. अशा व्यवस्थित पद्धतीचें नीतिबोधपर असें हें पहिलेंच प्राकृत सुभाषित पुस्तक माझे नजरेस येत आहे. कवितांची भाषा प्रौढ असून सुबोध आहे. क्वचित् स्थळीं श-

ब्दादिकांच्या कांहीं चुका घडल्या आहेत; परंतु त्यांतील एक दोन शिवायकरून बाकीच्या मोठ्याशा जमेंत धरण्यासारख्या नाहींत. एकंदरीनें हें पुस्तक पुरुष आणि स्त्रिया या उभयतांसही वाचून संग्रहीं बाळगण्यास उपयुक्त असें झालें आहे. हें पुस्तक विद्याखात्यांत शाळांतून कविताविषयावर जर चालू होईल तर लहानपणापासून मुलांस आपली स्थितिरीति सुधारून घेण्यास मोठें साधन होईल अशी माझी खात्री आहे; आणि ह्या सर्वोपयोगीं पुस्तकास जर सर्व लोक आपला उदार आश्रय देतील तर पुस्तककाराकडून पुढें अशीं उपयुक्त कामें होण्याचा संभव आहे.

मु० नाशिक, ता० १० आक्टोबर सन १८८४. } **बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे, बी. ए.** डे० ए० इन्स्पेक्टर, जिल्हा नाशिक.

---

के. स. री. हे कवी पूर्वींपासून प्रसिद्ध आहेतच. त्यांची पद्यरचनेची कुशलता वर्णनीय आहे. आलीकडे त्यांस नेत्रहीनत्व प्राप्त झाल्यामुळें ते महत्संकटांत आहेत. कवीश्वर दलपतराम हे गुजराथेंतील उत्तम कवी आहेत. सर्व देश व देशांतील शाळा त्यांचे कवितेनें गजबजून राहिल्या आहेत. त्यांसही अशीच दशा प्राप्त झाली आहे. ईश्वरी इच्छेस उपाय नाहीं, तत्रापि आपले श्रमांपासून लोकांस उपयोग व्हावा, धर्मनिष्ठा, देशप्रीति, ईश्वरभक्ति व सदाचारवृद्धि होऊन सद्गुणांस दृढता यावी या हेतूनें हें पद्यसहस्र प्रसिद्ध केलें आहे. हा त्यांचा हेतु उत्तम आहे. हा ग्रंथ संस्कृत सुभाषितासारखा प्राकृतांत अनेक विषयांवर लिहिला आहे. यापासून वाचकांस बहुत लाभ होईल असें आह्मास वाटतें.

मु० रतलाम, ता० १८ आक्टोबर सन १८८४. } **गोपाळराव हरि देशमुख.** दिवाण संस्थान रतलाम.

---

" व्यवहारपद्यसहस्र " हें पुस्तक त्याचे कर्ते के० स० री० ह्यांनीं मजकडे पाठविलें तें मीं वाचिलें. केसरीची कविताशक्ति चांगली आहे, हें त्यांचे पूर्वींचे ग्रंथ वगैरे पाहून माझें मत झालेंच होतें, तेंच हल्लींचा ग्रंथ पाहून दृढ झालें. यांतील कविता क्लिष्ट नसून तींतील विचारही चांगले आहेत; व व्यवहारांत पुष्कळ वेळां उपयोगीं पडण्या-

सारखे आहेत. सदर ग्रंथांतील पद्यें सरळ असून निरनिराळ्या वृत्तांचीं आहेत, यामुळें शाळेंतील मुलांस तर यांचा पुष्कळ रीतीनें उपयोग होईल. केसरीस परमेश्वरानें दृष्टीनें अपंग केल्यावरही त्यांनीं हें काम केलें, यावरून त्यांचा उद्योग व कविताशक्ति हीं दोन्हींही वाखाणण्यासारखीं आहेत; व त्याप्रमाणें या ग्रंथास आश्रय मिळून त्यांस द्रव्यद्वारां सहाय्य मिळेल अशी मी आशा करितों.

मुंबई, ता० २० नोव्हेंबर सन १८८४. } **महादेव चिमणाजी आपटे, बी. ए. एल्. एल्. बी.** वकील मुंबई हायकोर्ट.

---

" व्यवहारपद्यसहस्र " या नांवाचें पुस्तक केशवराव रिसबूड यांणीं केलेलें इकडे अभिप्रायाकरितां त्यांणीं पाठविलें, तें समग्र वाचून पाहण्यांत आलें. हल्लीं जीं नवीन सर्व पुस्तकें होत आहेत त्यांमध्यें कवित्वगुण फारसा असत नाहीं व कविता असली तरी नांवाचीच असते. व्यवहारपद्यसहस्र या पुस्तकाची योग्यता मराठींतील ग्रंथांच्या मानानें श्रेष्ठ वर्गांत गणली पाहिजे असा माझा अभिप्राय आहे. कविता बहुतेक अंशीं शुद्ध, सरळ, सुबोध व उपदेशपर आहे. यापैकीं सर्वच भाग सारख्या योग्यतेचे आहेत असें ह्मणतां येत नाहीं तरी बहुतेक भाग शाळांतून लहान मुलांस व मुलींस फार उपयोगीं पडण्यासारखा आहे. प्रत्येक भागाचें विशेष विवेचन केलें असतां विस्तार होईल; तथापि मुख्य मुख्य भागांविषयीं अभिप्राय देणें जरूर दिसतें. पहिला भाग 'ईशस्तुति' ह्मणून आहे. त्यांतील आर्या व वर्णन हीं साधारण प्रतीचीं आहेत. दुसरा भाग, 'मातापितरांचें कर्तृत्व' आणि 'पुत्राचें कर्तव्य' या विषयांवर आहे. यांपैकीं 'आईचें कर्तृत्व' या कविता फार उत्तम साधल्या आहेत. 'स्त्रीपुरुषांचें संसारांत वर्तन' हाही भाग फार चांगला साधला आहे. या पुढें आळस, उद्योग, इत्यादि विषयांवर कवित आहेत, त्यांत कांहीं भाग उत्तम आहेत; परंतु एकंदरींत कुटुंबाच्या माणसांच्या परस्परवर्तनाविषयीं जी कविता आहे त्याच्या तोडीची फारच थोडी आहे. प्रत्येक गुणावगुणाचें वर्णन करितांना जे दाखले घेतले आहेत ते पुराणप्रसिद्ध स्त्रीपुरुषांचे घेतले असल्यामुळें कवित्वास प्रसाद चांगला आहे. अखेरच्या भागांत पूर्वीं झालेल्या विवेचनाच्या उपसंहारासाठीं दृष्टांतपर आर्या दिलेल्या आहेत. दृष्टांत चांगले आहेत तथापि पुनरुक्तीच्या दोषामुळें

या भागास बरेंच व्यंग येतें. विभाग चौथा, यांत जनांस उपदेश केलेला आहे. त्यापैकीं पशु, पक्षी, कीटकादिकांचे ग्राह्य गुण ह्या आर्या चांगल्या आहेत. मनास उपदेश ह्मणून जो भाग आहे तो साधारण आहे. स्वतरणोपाय व ईश्वरप्रार्थना हीं पद्यें जुन्या रीतीप्रमाणें बरींच साधलीं आहेत. एकंदरींत या पुस्तकाविषयीं माझा ग्रह चांगला झालेला आहे. ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केल्यानंतर ग्रंथकर्त्यांची दृष्टि गेली असें प्रस्तावनेंत त्यांनीं लिहिलें आहे, त्या योगानें त्याच्या कवित्वास मार्दव व रस अधिक प्राप्त झाला आहे असें म्हटलें पाहिजे. ह्या पद्यसहस्राचा विस्तार थोडा कमी करून सहज दूर होण्यासारखे कांहीं दोष आहेत ते काढून टाकिले असतां हें पुस्तक सर्व विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडण्यासारखें आहे.

| | |
|---|---|
| मु० पुणें, ता० १ डिसेंबर<br>सन १८८४. | महादेव गोविंद रानडे. |

---

"व्यवहारपद्यसहस्र" ग्रंथांत कवीनीं कवितेंत सरळपणा व माधुर्य हीं चांगलीं साधलीं आहेत ; व अनेक विषयांवर कविता केली असून त्या विषयांचीं प्रकरणें निरनिराळीं व्यक्त केलीं आहेत,यामुळें हा ग्रंथ कीर्तन करणारे जे हरिदास यांस तर फारच उपयुक्त होईल. अशा धाटणीचे ग्रंथ प्राकृतांत फारसे आढळण्यांत येत नाहींत. तुकाराम, ज्ञानेश्वर, वामनपंडित; मोरोपंतादि कवींचे ग्रंथ सर्व विषयांनीं परिपूर्ण आहेत खरे पण त्यांतून निरानिराळे विषय, प्रकरणवार नसल्यानें वेंचून काढण्याचा आयास केल्याशिवाय मिळावयाचे नाहींत. तसा आयास या ग्रंथांत मुळींच नाहीं, यामुळें हरिदासांस हा ग्रंथ अवलंब्य आहे, असें स्वानुभवावरून वाटतें. शिवाय या ग्रंथांत पारमार्थिक व प्रापंचिक संबंधाचा सदुपदेश असल्यानें त्यांच्या साधकांसही हा फार साधनभूत होईल. खेरीज अशिक्षित मुलांसही शिक्षणास साधनभूत होण्याची योग्यता या ग्रंथाचे ठायीं चांगली आहे; इत्यादि कारणानें हा ग्रंथ सर्वमान्य होऊन ग्रंथकर्त्यास सर्व लोक असाच सर्वोपयोगीं दुसरा ग्रंथ करण्यास आपल्या महदाश्रयानें उत्तेजन देतील असें आम्ही इच्छितों.

| | |
|---|---|
| मिती मार्गशीर्ष शुद्ध ७<br>शके १८०६ चंद्रवासर. | हरिशास्त्री बिन् चिंतामणभट्ट फडके हरिदास त्र्यंबककर, मुक्काम श्री क्षेत्र त्र्यंबक. |

काव्य १८७३

# व्यवहारपद्यसहस्र.

## विभाग पहिला.

### ईशनमन.

॥ श्लोक ॥

( शार्दूल विक्रीडित वृत्त. )

निर्मी भू जल तेज वायु नभ जो हीं पंच भूतें महा;
जो उत्पन्न करी स्वयें स्थिर-चरें तैशा दिशाही दहा; ।
निर्मी प्राण्युपजीवना तृण फळें, धान्यें; जगा रक्षितो;
त्या विश्वेश-पदांबुजा नमुनि, मी हा ग्रंथ आरंभितों ॥ १ ॥

### ईशस्तुति.

॥ आर्या. ॥

भू जल तेज समीर ख देवा ह्या पंच भूत तत्वांहीं ॥
इच्छामात्रें केली पृथिवी उत्पन्न खेळत त्वां ही ॥ १ ॥
आकाशांत अधांत्रीं ही सूर्याऽकर्षणें प्रभो राया ॥
राखूनि, ह्या सभोंतीं लावियलें हीस संतत फिराया ॥ २ ॥
देवा जल-प्रपूर्णा, वाताऽबर-वेष्टिता, स्व हस्तांहीं ॥
वनस्पति-लता-युक्ता, केली नग-हेम-रत्न-खचिता ही ॥ ३ ॥

स्वेदज जारज अंडज जीवांहीं ही वसुंधरा बरवी ॥
देवा करूनि, तीतें प्रकाशिता रोविलास दीप रवी ॥ ४ ॥
तो सूर्य-दीप जातां मागें द्याया तिला उजेड निशीं ॥
देवा करुणा-स्नेहें पाजळिलें ज्योति* मंदगामि शशी ॥ ५ ॥
दैनंदिन वार्षिक ह्या लावुनि वसुधा फिरावया गतिंनीं ॥
दिन, रात्र, वर्ष, देवा केले शीतोष्ण जलद काळ तिन्ही ॥६॥
सिंधु-जलाऽकर्षण तें करवूनि प्रखर सूर्य-किरणांहीं ॥
घन-वृष्टि करुनि देवा करिशी भू तर उशिर तुज नाहीं ॥ ७ ॥
जीवोपजीवनातें तृण धान्य फलादि सेव्य वस्तूंतें ॥
उपजविशी भूम्युदरीं देवा करुणार्णवा नमोस्तु तुतें ॥ ८ ॥
प्राण्यांत मनुजकोटी[1] देवा कोटीच[2] निर्मिली असशी ॥
ज्यानें आकळिलें धीप्रेमबळें साच जाणुनी तुजशीं ॥ ९ ॥
भूगोल निर्मुनि असा निर्बाध, अविघ्न सर्वही रहाटी ॥
चालविलीस यथास्थित देवा चिरकाल सांज हि पहाटीं ॥१०॥
भूगोल तसेच सकल देवा ग्रहगोल रचुनि, एक तुवां ॥
ग्रहचक्र करुनि, मध्यें अचलाऽक्षय ठेविलास सूर्य दिवा ॥११॥
तेजोमय खँगणांहीं[3] भूसद्माऽऽकाशछत[4] लखाकविलें ॥
भूसद्म गोल देवा यास्तव नभ-छत तसेंच वांकविलें ॥ १२ ॥
सर्वां ग्रहांस मध्योत्सारिणि[5] मध्याभिगामिनी[6] गतिंहीं ॥
फिरवूनि वर्तुलाकाति, केले देवा तुवां सहाऋतु ही ॥ १३ ॥
ही एक सूर्यमाला ; दुसऱ्याही कोटिशा मिळुनि ऐशा ॥
विश्वाऽवाढव्यचि हें रचिलें गगनोदरांत विश्वेशा ॥ १४ ॥

---

* मूळ संस्कृतांतल्याप्रमाणें हा शब्द नपुंसकलिंगीं ठेविला आहे. १ वर्ग. २ रत्न. ३ नक्षत्रसमुदायांनीं. ४ पृथ्वीरूप घराच्यावरील आकाशरूप छतास. ५ सरळ रेषेनें जाणारी. ६ सूर्याकडे गमन करणारी.

एकाचि रोमरंध्रीं तुझिया ऐशीं अनंत विश्वें कीं ॥
वसतीं, देवा मिरविल तुज पुढतीं कोण आपली शेकी ? ॥१५॥
करितोसि विश्व-भरणा विश्वंभर ह्मणुनि नाम तुज लोकीं ॥
आद्यंत मध्य ना, तुज देवा यास्तव अनंत वदले कीं ॥ १६ ॥
विश्वेशाऽनंता त्वल्लीला-कर्तृत्वशक्ति-महिम्यातें ॥
गातां शिणले बुधजन बोलावे काय गुण यशाहि ग्यां ते? ॥१७॥
सृष्ट्युत्पत्तिस्थितिलयकर्ता सर्वेश ह्मणुनि ह्मणति तुला ॥
देवा त्वदीय शक्ति स्वयमेवा कीर्ति ही जगीं अतुला ॥ १८ ॥
देवा सर्वां चालक, सर्वांतर्साक्षि तूंचि, लवलेश ॥
तुझिया सत्तेवांचुनि न घडे कांहीं, नही हले केश ॥ १९ ॥
देवा परम समर्था विश्वाचा सूत्रधार, हालविशी ॥
दोरी, तसेंच नाचे जग हें, कोणा स्वशक्ति ना लवशी ॥२०॥
जीवांत सर्व आह्मां मनुजांवर तवकृपा अपार दया ॥
ज्ञानें जाणवुनी तुज देवा होशी भवाब्धि-पारद यां ॥ २१ ॥
आह्मां साठींच तुवां देवा केलेंस विश्व हें, कांकीं ॥
सृष्टपदार्थ-सुखाचा उपभोक्ता मनुज मात्र एकाकी ॥ २२ ॥
देवा बुद्धि ज्ञान हि दिधली आह्मां तशीच जी वाचा ॥
त्यांहीं समर्थ झालों पेक्षां सर्वत्र अन्य जीवांच्या ॥ २३ ॥
आह्मां नरदेह्यांवर असतां तव अनुपमा कृपा देवा ॥
आम्ही कृतघ्न होउनि त्वद्भक्तिहि विसरला करूं सेवा ॥ २४ ॥
स्मर-कोप-लोभ-मत्सर-मोहाऽहंकार-षड्विकार-रत ॥
होउनि, आम्ही देवा झालों दुर्मार्ग-वर्तनीं बहुत ॥ २५ ॥
सत्यत्वातें सोडुनि शिरलें नास्तिकपणांत मात्र मन ॥
देवा बहुत पर-धनंस्त्र्याभिलाषीं सतत तें करी भ्रमण ॥२६॥

---

७ थोडीशी. ८एकटा. ९जे नरदेही, त्यावर येशीं संयोग. १०परधनकांता हरणीं.

मन हें अनिवार बहुत तुजवांचुनि कोण यास आवरिता ॥
देवा श्रेष्टपणाचा अन्यें घालूं नयेचि आंव रितीं[11] ॥ २७ ॥
अन्यायपथीं मन हें न पडो ऐशीच बुद्धि दे देवा ॥
क्रोधाऽहंकार जिरो, न घडो कोणाविशीं मनीं हेवा ॥ २८ ॥
वमने[12]समचि मन मानो अन्य-धनाची पडोच कां रास ! ! ॥
देवा पर निंदेस्तव जिव्हा न कधीं पडो चकोरास[13] ॥ २९ ॥
देवा परस्त्रियेची उपजो स्वमनांत काम-बाधा न ॥
राहुनि सुविचार मनीं असल्या वृत्तीं वसो समाधान ॥ ३० ॥
भक्ति तुझी, निजधर्मीं निष्ठा, संशय न कोणता राहो ॥
देवा जनाऽपवादापासुनि हा जन अजाणता राहो ॥ ३१ ॥
सत्संगति नित्य असो, दया वसो अंतरीं क्षमा शांती ॥
देवा स्वकीय वचन-प्रमाणता ना ढळो स्वनाशां[14]ऽतीं ॥ ३२ ॥
तव गुण गाया वाचा, ऐकाया कान, रूप लोकांया[15] ॥
नयन, हि तत्पर राहो देवा पर-कार्य-साधनीं काया ॥ ३३ ॥
न जगीं परोपकारासम सत्कर्म हि न पुण्य तरि दुसरें ॥
देवा यास्तव चंदन झिजवाया निज शरीर पुढतिं सरे ॥ ३४ ॥
तीन प्रकार त्याचे कायिक वाचिक हि मानसिक देवा ॥
हें पाहिजे घडाया पूर्वार्जित जन्म जन्मिचा ठेवा ॥ ३५ ॥
स्वांगें परोपकारा झटुनि झिजूं, मी परंतु देवा हे ॥
मी दृष्टि हीन यास्तव ही पर-हित-साधनीं न तनु वाहे ॥ ३६ ॥
देवा सक्त[16] जरी मीं द्रव्यें व्हावेंच लोक-हित-कामीं ॥
पढवुनि शिष्यां विद्या, केला निर्वाह दीन इतका मी* ॥ ३७ ॥

---

११ पोकळ. १२ ओकीप्रमाणें. १३ चकार शब्दास. १४ आपला नाश झाला असतांही १५ पाहण्यास. १६ तत्पर. * पंतोजीपणाचें काम करून उपजीविका करणारा असा.

काव्य १५३

मग म्यां व्हावें देवा जरि निजवाचें परोपकार-रत ॥
न तसें महत्व अंगीं कीं निजवचनें घडेल लोक-हित ॥ ३८ ॥
तुझिया परंतु सुकृपें देवा मद्भाग्य थोर इतुकें कीं ॥
दिधली अभिरुचि मजला कविता रचनार्थ जी न कित्येकीं ॥३९॥
मजला परोपकारा हें साधन मात्र थोडकें फार ॥
देवा दिलें ह्मणुनि मी भावें करितों तुला नमस्कार ॥ ४० ॥
देवा नाना विषयांवर कविता-सांधनें, करुनि कविंनीं ॥
ग्रंथ, जगावर केला उपकारहि नांव राखिलें भुवनीं ॥ ४१ ॥
त्यांची न योग्यता मज येइल, देवा तरी न वचकावें ॥
गगनीं गरुड उडे, तरि न उडावे कां स्वशक्तिनें रविं ? ॥४२॥
यास्तव लोकहितार्थचि कथितों व्यवहार पद्यरूपानें ॥
देवा ग्रंथ सुखें हा निर्विघ्न तडीस शीघ्र सुकृपें ने ॥ ४३ ॥
मी न समर्थ कथाया, देवा व्यवहार साच, मजकरवीं ॥
वदवूनि तूंचि, तत्सम सकलां वर्तावया उमज करवीं ॥ ४४ ॥
मी दीन, दीन-बांधव तूं, देवा माझिया हकेसरेंशी ॥
घालूनि उडी सत्वर, दे, पुरवुनि हेतु, सौख्य के.स.रि. शी ॥४५॥

---

१७ कविता साधनानें. १८ शुकानें. १९ हाकेबरोबर.

# विभाग दुसरा.

## मातापितरांचें कर्तृत्व आणि पुत्राचें कर्तव्य.

### आईचें कर्तृत्व.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

वाहूनी नवमास गर्भ उदरीं, जी चालतां पांवलीं[1] ।
तद्वारें अधिकाधिक प्रतिदिनीं कष्टश्रमा पावली ; ॥
वत्सातें प्रसवोन हर्षसुभरें[2] चित्तांत सामावली[3] ; ।
ऐशी जी निज जन्मदा सुखकरा वंदूं सती मावली ॥ १ ॥
न्हाणोनी, स्तन-दुग्ध-पान करवी घेऊनि अंकावरी ; ।
बाळाचें मळ मूत्र जी निजकरीं काढी, न शंका वैरी ॥
टाहो बालक फोडितां अमळसा, कामांतुनी धांवली ; ।
ऐशी जी निज जन्मदां सुखकरा वंदूं सती मावली ॥ २ ॥
राही दक्ष मुलाचिया प्रतिदिनीं सल्लालनीं[4] पाळणीं ; ।
येतां नीजे[5] न बालकास हलवी घालूनिया पाळणीं ; ॥
" अंगाई[6] " वदुनीच थापटितसे, गाई सुगीतांऽवली[7] ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ ३ ॥
घेऊनी निज बालका कटिवरी, दावूनि काऊ चिऊ, ।
जेवूं घालित वाजवूनि चुटक्या, पाणी हि घाली पिऊं ; ॥

१ पायांनीं. २ हर्षातिशयानें. ३ भरूनि गेली. ४ धारण करी. ५ झोंप. ६ येग येग गाई म्हणून. ७ चांगलीं चांगलीं पुष्कळ गाणीं.

कुक्षीं घेउनि बालका निजवितां जात्याहि झोंपावली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ ४ ॥
थोडीशी किरकीर मूल करितां, चौहाटच्या मातिची ।
भाळीं लावुनि तीट, दृष्ट उतरी ; प्रेमीं न सीमा तिची ॥
थोडा ये ज्वर कीं जरा कणकणे, जी शीघ्र कोमावली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ ५ ॥

आरोग्यास्तव बालका प्रतिदिनीं घाली घुटी जी करीं ; ।
कांहीं अल्प दुखे खुपे, निगुतिनें त्याच्या उपाया करी ; ॥
बाळाची नित पथ्य आपण करी, नेमव्रता डौवली[11] ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ ६ ॥

अंकीं घेउनि पाजितां, मळकस्या संधिस्थळीच्या करीं ।
काढी चोळुनि ; यापरी करितसे, सप्रेम जी चाकरी ; ॥
घेई चुंबन, खेळवीहि हसवी, साधी[12] घडी फावली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ ७ ॥

तैलाभ्यंग करूनि, नित्य शिशुतें न्हाणोनिया सोज्वल, ।
लावी तीट, हि गालबोट, नयनीं जी लेववी कज्जल ; ॥
माथीं पिंपळपान विंचरूनिया गुंफितसे जावळीं ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ ८ ॥

गोट्यांचा घड भिंगरी खुळखुळा दे खेळण्या रिंगणें ; ।
बाळाचें आति जीस कौतुक गमे पाहोनिया रिंगणें ;[13] ॥
बाळाचे मुखचुंबनीं हरघडीं सप्रेम लोभावली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ ९ ॥

बाळाचे मृदु बोबडे परिसुनी “ **पापा ममा** ” बोल ते, ।

---

८ स्वतःहो. ९ चौरस्त्यावरील. १० टापटिपीनें. ११ टाळी म्हणजे सोडी. १२ साधुन घेई. १३ रांगणें.

प्रेमें संकुतुकेंचि आपण तसें उच्चारुनी, बोलते ; ॥
गोंजारी हृदयीं धरुनि सुरूपें वत्सा जशी गोंवली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ १० ॥

बोटें देउनि चालवीत असतां पांगूळगाड्यावरी, ।
जातां झोल, पुनः पुन्हां निजकरीं सप्रेम त्या सांवरी ; ॥
जातां चालुनि मूल खेळत घराबाहेर, भांबावली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ ११ ॥

खाऊ खारिक दे, बदाम, मनुका दे, डाळिया कुर्मुरे ; ।
दे घेऊनि नवी नवाळ सुफळें, पेढा कधीं खोबरें ; ॥
घेतां हट्ट, करुनि दे चिमुकला दांडू विटी, भाकली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ १२ ॥

पोटीं एक असो, असोतहि दहा सर्वांवरी सारखी ।
आईची ममता ; न बालक हिता न्यूनाधिका पारखी ॥
बाळातें जननीच मात्र जगतीं विश्रांतिची सावली, ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ १३ ॥

पायीं कंटक ही खडा रुपलिया जी होतसे विव्हल ; ।
लागे ऊन जरा मुलास, उतरी जी कांसे[15]-पात्रें झळ ; ॥
चित्तीं होऊनि घाबरी कळवळे मुंगी जरी चावली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ १४ ॥

बाळाचा अपराध अल्प दिसतां बोधूनि तेचि क्षणीं, ।
मोळा, रीत सुमार्ग लावुनि, कथी सद्धर्म सच्छि[16]क्षणीं ; ॥
बाळाचें बरवेंच ऐकुनि उभ्या जीच्या स्वरोमा[17]वली ; ।
ऐशी प्रेमकरा दया-सुखकरा वंदूं सती मावली ॥ १५ ॥

---

१४ गाय. १५ काशाच्या भांड्यानं. १६ चांगल्या शिकवणुकीनें. १७ आंगा-
रील लवपंक्ति.

११·३१०५
६३२



मातेची ममता जगीं निरुपमा ; जीची न कोणासरी. ।
लग्नीं योग्य वरास दे स्वतनया, गेलीहि ती सासरीं. ॥
पुत्राचा करुनि विवाह, जननी पाही स्नुषेचें मुख. ।
घेतां पायघड्यास कष्ट विसरे ; पोटीं न मावे सुख ॥ १६ ॥
माया, लोभ, दया, कृपा, कळवळा, मोह स्वपुत्राविशीं, ।
प्रेमाऽस्था, श्रम, कष्ट, सोशिकपणा, पुत्रार्थ कासाविशी, ॥
मातेच्या बहु अद्वितीय सुगुणीं कोणास ना ये सरी, ।
"श्रीर्मातुःपरदैवतन्न"[२] कथितो वेदोक्ति हे के. स. रीं. ॥ १७ ॥

## बापाचें कर्तृत्व.

॥ श्लोक ॥

( पृथ्वी वृत्त. )

मुलास जगतां तसा सुखद जन्मदाता भला ; ।
सुखार्थचि मुलाचिया श्रमुनि जो जगीं राबला ; ॥
धना मिळवुनी, मुला जपुनि होय संगोपिता ; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ १८ ॥
श्रमें थकुनि ये घरीं, परि विलोकुनी बालका, ।
स्वताप सगळे हरे सहज एक घेतां मुका ॥
मुला जवळ घेउनी स्वकरिं जेववी जेवितां ; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ १९ ॥
कुठें नवलदा अशा सहज देखतां वस्तुला ।
स्वयें विकत घेउनी त्वरित आणुनी दे मुला ; ॥
लळाहि पुरवी कधीं शिशुस होय जो दापिता ; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २० ॥

प्रसाद अथवा कुठें जरि मिळेचि पेढा विडा, ।
न चाखुनि, मुलास दे स्वगृहिं आणुनी तेवढा ; ॥
मुला प्रथम दे फळावळ चहाहि खातां पितां ; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २१ ॥
सुयोग्य पेंट[१८] भूषणें करुनि, जो मुला लेववी ; ।
करी पुरवठा घरीं शिशुस वस्तु जी जी हवी,[१९] ॥
उणें न कवणे रितीं पडुंचि दे स्वकन्येसुतां[२०] ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २२ ॥
सुबोधवचनामृता प्रतिदिनीं मुला पाजुनी, ।
स्वधर्म हित-नीति जो कथुनि, रीति दावी जुनी ; ॥
मुलास्तव सुधामही वतन-वित्त हो स्थापिता ; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २३ ॥
सुविद्य शिशु व्हावया गुरुकडूनि विद्या भली ।
धनें करुनि देववी, कथितसे दुजी आपली[२१] ; ॥
स्वजीवाहि मुलाचिया सुखहितार्थ हो अर्पिता ; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २४ ॥
जयास हृदयीं दया निरुपमा स्वतोकोविशीं[२२] ; ।
पदीं अमळ चालतां शिशु, घडेच कासाविशी ; ॥
नखींहि, बहु विव्हळे शिंशुचिया जरा कांपतां ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २५ ॥
मुलास सुखसंपदा सुयश आयुरारोग्य तें ।
असो, ह्मणुनि ईश्वरा स्तवितसे मनें नित्य तें ; ॥
शिरीं शिशुहितार्थ जो जडाहि[२३] होतसे झेंपितों[२४] ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २६ ॥

---

१८ वस्त्रालंकार. १९ पाहिजे. २० मुली मुलांस. २१ स्वतां सयेत असलेली. २२ मुलाविषयीं. २३ स्वशक्ती बाहेरचें करणें. २४ तोलून धरितां.

" सुविद्य सुगुणी भला निपजला '' असें आत्मजा ।
जनीं सकल बोलतां, गमतसेचि, मी धन्य ज्या ; ॥
मुला निज-धनित्व जो सकळ होय संतर्पितों[25]; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २७ ॥
करूनि व्रत[26]बंधनादिक समस्त कर्में विधीं, ।
विवाह करितां ह्मणे कर मुला आतां साव धी ; ॥
स्नुषेस नय-नीतिचा सुपथ होय जो दाविता ; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २८ ॥
सुविद्य करुनी दिलें सकल वर्तन-ज्ञान तें ; ।
प्रपंच, परमार्थ, या उभय गोष्टिंला जाणतें ; ॥
करूनि, दिधलें जगत्सुख भलें अयानें स्वतां ; ।
नमूं तनुमनें असा सुखद साह्यकारी पिता ॥ २९ ॥
असा सकल गोष्टिंचा. सुखद द्यावया लाभ जो ।
झिजे, तनुमनें धनें स्वमन हें तयाला भजो, ॥
जडे भ्रमर होउनी जनक पादपद्मा स्वयें, ।
सुधन्य सुत तो ! ! करी कथन के. स. री. निश्चयें, ॥ ३०

## पुत्राचें कर्तव्य.

॥ श्लोक ॥

( शिखरिणी वृत्त. )

जगीं आईबापें बहु सुखद जीं जन्मद मुला ; ।
तयासाठीं ज्यांचा श्रमुनि झिजुनी जीव दमला ; ॥

---

२५ अर्पण करितां. २६ येथें जोडाक्षराचें स्थल नव्हे परंतु शब्द संकोचयामुळें आदिशब्द कायम केला आहे.

जयांच्या कर्तृत्वें शिशुपण खुशालींत निभलें ; ।
मुला झालें प्राप्त स्वहितकरसें यौवन भलें ; ॥ ३१ ॥
सुविद्या होऊनी सकल परिचें ज्ञान मिळलें ; ।
विचारानें सारें निज-हित हि कर्तव्य कळलें ; ॥
स्वकर्तृत्वें झाला धन मिळविता, स्त्री हि तरुणी ।
घरामध्यें झाली प्रमुख हि पुढारी सुतरणीं[27] ; ॥ ३२ ॥
सुपुत्रें या वेळीं बहुत सुविचारें दिननिशीं ।
स्वकर्तृत्वें द्यावें सुसुख[28] जनकाशीं जननिशीं, ॥
स्वतां तत्सेवेतें करुनि, ललनाही करिलशी ।
स्वयें ठेवावी ती बहु खबरदारी प्रतिदिशीं, ॥ ३३ ॥
तयांचा संतोष, स्वसुख समजे स्वर्गसम जें ; ।
तयांचें जें आशीर्वचन, निजकल्याण समजें ; ॥
तदाज्ञा जो मानी सकल परि वेदोक्तिच जशी ; ।
ह्मणे, जो तत्सेवेतरें[29] नियमना धर्म मजशीं ॥ ३४ ॥
ह्मणे जी जी केली मजवरि दया, प्रेम, पितरीं ।
न मी त्यांचा होई* कधिंहि उतराई लवपरी ॥
स्वचर्माचें हातें करुनि पितरां पायंतन[30] तें ।
दिलें घालायाला, तरि तदुपकारा सम न तें[31] ॥ ३५ ॥
असा मातेपोटीं जरि निपजला एक कुमर, ।
तया गाती ग्रंथीं कविजन, पुराणीं मुनिवर ॥
त्रिलोकां जिंकी, जो, अचल पितृ भक्तीस टिकतो ।
उभें भीमातीरीं करित विठला पुंडरिकें[32] तो ॥ ३६ ॥
निजस्कंधीं मातापितर नित वाहुनि सुत जो ।

---

२७ चांगली नौका म्ह० आहे नाहीं हें पाहणारी इत्यर्थः. २८ सुखाधिक. २९ पितृमातृसेवेहून अन्य. ३० जोडा. ३१ तें करणें. ३२ प्रसिद्ध पुंडलिक नामा.

करी काशीयात्रा ; निजतनु ह्मणे श्रावण[33] झिजो ॥
विनिंद्या तातीं[34]ज्ञा, तरिहि शिरसा वंद्य करुनी ।
वसे तो श्रीराम श्रमुनि चवदा वत्सर वनीं ॥ ३७ ॥
जयां कांहीं तोषाविण जननिच्या अन्य नलगे, ।
असे ते कुंतीचे प्रबळ विजयी पांच मुलगे ॥
द्वितीयें[35] तत्पुत्रें, कळुनि[36] गजगौरी व्रत तिला ।
सुरेंद्राचा ऐरावत उचलुनी आणुनि दिला ॥ ३८ ॥
जयानें हो केलें पितृहनन, त्या क्षत्रिय-मदा ।
हराया, त्वेषानें फिरुन वसुधा एकविसदां, ॥
करी संहारातें थरथरवुनी क्षत्रिय कुला ।
असा सर्वां आहे सुत परशुराम श्रुत भला ॥ ३९ ॥
प्रदंशें सर्पाच्या[37] निजजनक[38] पावेचि निधनें[39], ।
प्रतीकारा[40] त्याच्या अपरिमितसें वेंचुनि धन, ॥
स्वयें जाळी सत्रीं[41] करुनि सकळा पन्नग-कुळा ।
असा सर्वां आहे श्रुत नृपति जनमेजय भला ॥ ४० ॥

(शार्दूलविक्रीडित वृत्त.)

ज्याचें नांव जगांत गाजुनि, भली ज्याची सुदैवोपमा ।
देती लोक परस्परांस ; नुरली ज्याला जगाची तमा ; ॥
ऐसा बादशहा शिकंदर पहा जो मातृभक्त स्वता ।
मातेचें सुख तोंचि जीवित ह्मणे, तद्दुःख मृत्यूप्रता ॥ ४१ ॥

(शिखरिणी वृत्त.)

जगीं माता धन्या प्रसवुनि अशा एकचि सुतें !! ।
न व्हावे बारा ते कुसुत पितरां जे न पुसेते[42] ॥

---

३३ प्रसिद्ध मातृपितृ भक्त विशेष. ३४ बापा दशरथाची. * होणार नाहीं. ३५ भीमानें. ३६ समजल्यावरून. ३७ तक्षक नामा सर्पाच्या. ३८ परीक्षिती राजा. ३९ मृत्यु. ४० सूड उगविण्यास. ४१ यज्ञानें. ४२ विचारणारे.

विचारी वैद्याला गरज सरतां रुग्णे[४२] जन कां ? ।
स्वतारुण्यीं तैसा कुसुत विसरे मायजनकां ॥ ४२ ॥
न आई बापांची कळकळहि आस्था लव मनीं, ॥
असा तो जाणावा कुसुत पशुसा मातृगमनी ॥
अशी वार्ता कानीं बहुत परिसूं ये अलिकडे ।
तयाचें तात्पर्य कथन करितो के. स. रि. पुढें ॥ ४३ ॥
स्वयें चोंचीं दाणा खगम-पितरें घालुनि, पिलीं ।
लहानाचीं मोठीं बहुपरि करायास जपलीं ॥
मं तद्बाल्यावस्था, फुटुनि मग पंखांस, उरली, ।
क्षणीं आईबापां मग उडुनि जातां विसरलीं ॥ ४४ ॥
स्ववत्सातें धेनु श्रमुनि परिपाळी[४४] सुममतीं ; ।
तयासाठीं रानांतुनि पळत ये हंबरुनि तीं ; ॥
स्वदुग्धें जोर्पैवी[४५] पुरवुनि न ती तर्क पुढला ; ।
अखेरीला मातेवरति परि तो वत्स चढला ॥ ४५ ॥
सुबुद्धि-ज्ञानाचें सदन पशु पक्षी न, ह्मणुनी ।
पित्यामातेचें त्या स्मरण कसलें, ओळख जुनी ? ॥
क्षुधा, तृष्णा, निद्रा, भय, विषय, हें ज्ञान निर्येतें ।
दिलें देवें खाया ह्मणुनि अयतें धान्य गवत ॥ ४६ ॥
प्रर्धी-ज्ञाना[४६] देवें नरतनु निवासा स्थल दिलें ; ।
" सुकर्तृत्वें नारायण नरचि हो " वेद वदले ; ॥
सुधी ज्ञानी ऐसा मनुज अविवेकांत विचरे, ।
बरीं त्यापेक्षां तीं मग तरि चतुष्पाद खेंचेरें[४७] ॥ ४७ ॥

---

४२ रोगी. ४४ पोषण करी. ४५ नेमकें. ४६ विशिष्ट बुद्धिज्ञानास. ४७ पक्षी.

# पुत्राचें कर्तव्यान्य कर्म.

( शार्दूलविक्रीडित. )

विद्या होउनि, ये विशींत मुलगा, तो रोजगारीं, सवें[४८] ।
स्त्रीतें घेउनि जाय, जीस न कधीं संसार कामीं सवें[४९] ॥
प्रेमाचें गणगोत एक ललना त्या ते स्थळीं होउनी, ।
मोलें सर्वहि काम देउनि, तिला जाऊं न दे तो उनीं[५१] ॥४८॥
किल्ली घेउनि पेटिची जवळ, ती घाली गळीं साखळी[५२] ।
तोंडें पाटिलकी स्वतां करुनि, हो कामांतुनि मोकळी ॥
वेळीं मात्र पुढें पुढें स्वपतिच्या कामां करी शंभरां ।
प्रेमास्था जडवूनि घे बहुतसा विश्वास त्याचा बरा ॥ ४९ ॥
एकांतांत रहस्य पाहुनि ह्मणे, हे कांत, सोडा चला ।
भारी हो नित गांजिलेंच तुमच्या मातापित्यांनीं मला ॥
पाहा ! हे वणें[५३], खोंक, जेवण सुधें नाहीं मिळालें पुरें ।
या बाळंतपणास हो मज घरीं जाणेंचि आतां पुरें ॥ ५० ॥
आलिंगूनि तिला, ह्मणे पति, न तूं प्राणप्रिये हुंबरें ।
त्यांनीं कां तुज एकटीस ? मजही ना पाहिलें कीं बरें ॥
ह्यां आंगास खुणा तुझ्या, उमटल्या माझ्यापरी काळजीं. ।
आतां तूं तरि मालकीण घरची, कैची तुला काळजी ! ॥५१॥
नुक्तासाच चतुर्थमास सरला ; बुद्ध्याच मीही तरी ।
त्वां जावेंचि घरीं, ह्मणुनि वदलों, हें नेणसी अंतरीं. ॥
नाहीं होतचि कामकाज तुज, हें जाणूनि, मीं या करीं ।
याया आइस पत्र आज लिहिलें ; येईल ती लौकरी ॥ ५२ ॥
येतां दे ; गृहकाम सोंपवुनि त्या सासूवरी ती स्नुषा ।

---

४८ बरोबर. ४९ संवय. ५० रोजगाराचे गांवीं. ५१ उन्हांत., ५२ साखळींत ओंवून. ५३ जखमा ग्ह० मारलेल्या खुणा.

किलयांचें जुडगें स्वतां जवळ घे, त्यासी करी शुश्रुषा. ॥
लागे साकर, तूप, गूळ, तितुकें काढूनि दे सौंरजा. ।
हे हेरंब[५५] सुपुत्र मोलकरणीबाईस देती रजा ॥ ५३ ॥
आई कष्टकरी घरांत घरकीबाई जशी त्या परें, ।
कांता ही यजमानिणीसम हवे तैशारितीं वापरे. ॥
आईला गुजरी, स्वदार मसुरी नेसूनि नामावळ, ।
भोंतालीं पतिच्या फिरे तशि जशी कृष्णार्थ चंद्रावळ. ॥५४॥
जातां वाजुनि आठ होय ललना जागी पलंगावरी. ।
आई ती अरुणोदयास उठुनी कामा श्रमें आंवरी. ॥
घे साहित्य करूनि, आंग धुवुनी पाणी धुणेंही करी, ।
वाढी ताट दे[५६]हास, पाक करुनी, सप्रेम पुत्रा करीं ॥ ५५ ॥
स्वच्छंदें मुखमार्जनादि करुनी वेणी फणी रेखली, ।
आली अंग धुवूनि सून मग जों, त्या सासवें देखिली. ॥
सासू वाढुनि ताट, वाट बघतां, लज्जा मनीं काय ती ।
नेणे ! ! येउनि भोजना बसतसे पाटावरी आयती ॥ ५६ ॥
होतां जेवण, ताट लोटुनि पुढें, कामाचिया वेगळी ।
होऊनी, बहु दाब सासुवर ती ठेवी, अशी आगळी. ॥
सासूची नवऱ्यास नित्यहि कथी कांहीं तरी कोंगाळी, ।
ती ऐकूनि कुपुत्र तो जननिशीं देतां शिव्या ती गिळी ॥५७॥
ये कांहीं तिथि, पर्वणी, सण, तरी देवाचिया दर्शना ।
जाया देखिल मोकळीक तिजला नाहीं स्नुषाऽऽज्ञे विना. ॥
घ्याया तांदुळ तीस मूठभरही चोरीच देवापुढें ।
ठेवाया शिवराइ तो मग मिळे कैचा ! स्वचित्तीं कुढे[५८] ॥५८॥
" आई राबवुनी, खुशाल, बसवी हा आपली कामिनी " ।

---

५४ त्या सुश्वारूप सारजाबाई. ५५ हे पुत्ररूप हेरंब. ५६ दहा वाजतां.
५७ गाऱ्हाणें. ५८ मनांतल्यामनांत झुरते.

हें यावें न सुहृन्मनांत अथवा व्हावी न चर्चा जनीं, ॥
लोकीं मित्र-जनीं ह्मणूनि तसल्या मुद्दाम ओघें, स्वतां ।
दावूनी बहु थोरवी जननिची, भार्येस दे तुच्छता ॥ ५९ ॥
" पुण्याई अमुच्या खरी, जननिची ती घे सदा शांतिला. ।
मोठी दक्ष, कटाक्ष, काम इतरीं केल्या रुचेना तिला. ॥
सर्वांच्याहि, करीच काम उठुनी मोठ्या पहाटीं अधीं, ।
प्रातःस्नान करी, परंतु पडसें ना खोकलाही कधीं ॥ ६० ॥
स्त्री, नाहीं तर हो मलूल, आमुची कामास निर्माल्यशी. ।
पाहाटीं उठल्या कपाळ दुखतें, ना सोसवें तें तिशीं. ॥
पावे तत्प्रकृति त्वरें विकृतिला कष्टश्रमें अल्पशा, ।
तीतें चैन पडे न, औषध तरी चालू असे नित्यशा " ॥ ६१ ॥
हाही पुत्र बरा, तयाहुनि, ह्मणे जो पुत्र, " आई, फुका ।
श्राद्धा ब्राह्मण दोन सांग ह्मणशी मातें पिते दोन कां ? " ॥
आईला बसवी निरुत्तर अशीं बोलोनि दुर्भाषणें, ।
ऐसा पुत्र न जन्मला तरि बरें, हा धिक् तयाचें जिणें!!! ॥ ६२ ॥
जन्मा देउनि, आपणांस ममतें " तात्पर्य " ज्यांनीं स्वतां ।
केलासे प्रतिपाळ, फार झिजुनी ती धन्य मातापिता ! ! ॥
होऊनी उतराइ आपण तरी आनंद द्यावा तयां. ।
सांगे के. स. रि. याविना न दुसरें कर्तव्य लोकांत या ॥ ६३ ॥

---

५९ सोयरेधायरे मंडळींत. ६० ज्या गोष्टींत कांहीं तरी आईचा संबंध येईल अशा ओघानें. ६१ निस्तेज. ६२ मला.

## बंध्वैक्यवर्तन.

॥ श्लोक ॥

( वसंततिलका वृत्त. )

सत्प्रीति ठेवुनि परस्पर बंधु चारी ।
जे वर्तती सहज एकमतें विचारी, ॥
ज्येष्ठास मानुनि पित्यासम, एकमेकां ।
प्रेमें करूनि जपती, मग त्यां कमी कां ? ॥ १ ॥

स्वप्नीं जयां कपट-भाव न ये कदां ही ; ।
ऐकू नये कलह- भाषण एकदां ही ; ॥
पाहूनि बंधु, सुख हर्ष परस्परांना ; ।
होतां वियोग, सुख-भोग रुचे जरा ना. ॥ २ ॥

दैवानुसार धरिती जरि चार सोयी ; ।
प्राप्त्यल्प कीं, बहु असो अथवा नसो ही ; ॥
धामीं असोत, परक्याहि वसोत गांवीं ; ।
घोळे सदैव परि एक विचार गावीं[१]. ॥ ३ ॥

आंतूनि त्या धुसफुसोत कितीक जावा ; ।
कैशा असोत मग त्या अति दुःस्वभावा , ॥
त्यां वारिती, समय पाहुनि, सामें[२], दंडें ;
जे बंधु राक्षिति निजैक्य मनें उदंडें. ॥ ४ ॥

जे स्तंभ बांधव निजैक्य-निकेतनाला[३], ।
कुंभ्या स्त्रिया डगवितील कशा तयांला ? ॥

१ मनांत. २ सामोपचारें अथवा चौदावें रत्न दाखविण्यानें. ३ आपल्या ए-क्यरूप इमारतीला. ४ खांबाखालच्या दगडी चौकया. ० बंधुरूप खांबांस.

त्याही मनीं समजती, न चले स्व हेका ;।
ध्यावाच वाइटपणा मग तो फुका कां ? ॥ ५ ॥
कांहींहि कृत्य करिती अवघे विचारें ;।
द्रव्यादि साह्य करुनी झटतात सारे ;॥
प्रेमा दुरीहि असल्या घर-सारखा तो ;।
बंधु-स्मृति प्रतिदिनीं ६ तारि सार, खातो ॥ ६ ॥
एकास तेंच दुसऱ्याप्रति दुःख भारी, ।
विद्युज्झणत्कृति जशीच समान तारीं. ॥
तच्चित्त एक, दिसती जरि देह दोन. ।
पाणी, तरंग, उभयां स्थिति ती न भिन्न ॥ ७ ॥
होतां अरण्यवश राघव, राज्य-लक्ष्मी ।
धिःकारुनी, भरत हो७ वनवासगामी. ॥
तैशीच ८पोर्तुगिज सोदर बंधु-जोडी, ।
नां प्राण आवड धरूनि कुडीस सोडी ॥ ८ ॥
ऐसे जगांत असले जर दोन भाऊ, ।
त्यांचे न काय करितीलचि चार बाहू ? ॥
श्रीविष्णुशा बहुत पाहुनि विक्रमाला, ।
लक्ष्मी न कां वरुनि घालिल त्यांस माला ? ॥ ९
बंध्वैक्य तें अचल रामहि लक्ष्मणाचें, ।
झालें सुराज्य हरितें नृप रावणाचें. ॥
अद्वैत तीं वसुनि पांडव बंधु पांच ।
संपादिती निरुपमा हरिची कृपाच. ॥ १० ॥
एका जुटें करुनि मानव, त्यांत बंधू, ।
जे राहतील, अटवीतिल कां न सिंधू ? ॥

---

५ विजेचा झटका. ६ तारायंत्राचेठायीं. ७ झाला. ८ शाळांतील क्रमिक चौथे पुस्तकांतील " बंधुप्रीति " ही गोष्ट पहा. ९ चतुर्भुज जो विष्णु त्या सारख्या.

ते रंक ही असलिया भय राजयातें. ।
जैसेंच चार वृषभीं[10] मृगराजयातें. ॥ ११ ॥
बंध्वैक्य कायम सदां ह्मणती रहावें, ।
त्यांनीं स्वबुद्धिवश, निग्रहचित्त व्हावें. ॥
अज्ञ स्त्रिया स्ववनिता मतिभेदकांतें ।
विश्वासुनी, निजसुखास मुकूं नये तें. ॥ १२ ॥

( शिखरणी. )

स्त्रिया चौघी आल्या स्वगृहिं परक्या चार घरच्या. ।
तयांच्या वाग्बाणाहुनि बहु बऱ्या तीक्ष्ण बरच्या. ॥
नगाऽऽलंकारांची अतितर जयां हाव ; पुरती ।
कदा नाहो, जावा धुसफुसुनिया काम करिती. ॥ १३ ॥
मनीं प्रत्येकीच्या, पृथक तरि राहीन परतो. ।
स्वयें वाक्चातुर्यें मग पतिस ऐकांत[11] करि ती, ॥
स्वकष्टाची सारी मिळकत तुह्मी वेंचुनि घरीं, ।
" पहा[12], मी लंकेची कशि दिसतते पार्वति तरी ? " ॥ १४ ॥
नसे कांटा नाकीं, धड तरि नसो काय लुगडें ! ।
मला आई देई हसळि, ह्मणुनी बालक रडे. ॥
असो ; कामानेंही प्रतिदिन सदां जीव दमला. ।
न माया यायाची, तरि पृथक द्या ठेवुनि मला. ॥ १५ ॥
पहा, भाऊ काऊ ; सकल धन-खाऊच समजा. ।
प्रसंगीं दावोनी स्वकर वरती, सांगतिल ' जा ' ॥
मनीं हें आणोनी, प्रथम उमजा, हेंचि बरवें ।
स्वतंत्रें राहावें, क्षण हि दम आतां न धरवे. ॥ १६ ॥

---

१० इसापनीतींतील " सिंह आणि चार बैल " ही गोष्ट पहा. ११ एकांतांत गुजगोष्टी. १२ या एकंदर ह्मणीचा अर्थ मला सोन्याचा विटाळ आहे.

अशा रीतीं भार्या पतिस वळवाया निज-मता, ।
झटे सामें [13]यत्नें जरि पति न पावेल समता, ॥
कराया एखादें तरि सहज जी साहस उभी. ।
अशी कौटाळा ती, पतिस [14]कवटाळी, न मनिं भी. ॥ १७ ॥

स्त्रिया ऐशा रीतीं वळवुनि पहा चित्त पतिचें, ।
घराच्या विध्वंसा सहज करिती, ह्या प्रचितिचे ॥
पुराणें तैशा त्या कथितिल जनां लेख बखरी. ।
न तें धुंडा. आतां अनुभव असे तो घरघरीं. ॥ १८ ॥

प्रकोपाऽज्ञानाचें सदन गमतें त्या*तर मला. ।
तयांच्या दुश्छंदीं भ्रमुनि नर जो त्यांत रमला, ॥
स्वयें अद्वैतातें सकलहि सुखालागिं मुकला. ।
न पावे कां दुःख श्रम पुरुष जो मार्ग चुकला ? ॥ १९ ॥

पहा त्या, आनंदी ध्रुव-जननि आणी कयकया ।
स्व-हट्टानें नेती निज-पति-सुखानंद विलया. ॥
अशा व्रात्या कृत्या कितिक तरि झाल्याच जगतीं ।
तयांच्या संसर्गें खचित बरवी होय न गती ॥ २० ॥

असो ; ही स्त्री-बुद्धि प्रळयकर जाणूनि, सुजनें ।
त्रिकाळीं वर्तावें सुपथ-सुविचारें निज मनें. ॥
निजैक्यें, प्रेमें, जें सकल वसती बांधव घरीं, ।
महाऽऽनंदें त्यांच्या नमन चरणीं के. स. रि. करी. ॥ २१ ॥

---

१३ सामोपचारयत्नानें. १४ आपल्या हातांत आणी. * स्त्रिया.

# स्त्रीपुरुषांचें संसारांत परस्पर व एकंदर वर्तन.

॥ श्लोक ॥

( स्रग्धरा वृत्त. )

या संसारीं पहा स्त्रीपुरुष उभयतां गाठुनी लग्नसूत्रें, ।
अर्पूनी एकमेकां तनुमनधन तीं साच होतात मित्रें. ॥
आयुष्यीं एकमेकां सकलपरि सुखा आणि दुःखाहि थारा ।
होतीं. प्रेमैक चित्तें निवसुनि करितीं गोड संसार सारा. ॥

( शिखरिणी वृत्त. )

पहा, स्त्री संसारीं निपट जणुं माया अवतरे. ।
दिसे कोठेंही तत्सम सुखद नां वस्तु दुसरें. ॥
असावी तद्रीति-स्थिति-गुण कशी वर्तन-कृती ? ।
अधीं हें सांगोनी, पुरुष-कृति सांगेन पुढतीं. ॥ २ ॥

## स्त्रीवर्तन.

मनीं भावी श्वश्रू, श्वशुर, जननीं आणि जनिता ; ।
करूनी तत्सेवा बहुत सुख दे त्यां रिझवितां ; ॥
तशी अन्यीं सर्वीं बहुपरि सुमर्याद वडिलीं ; ।
जिनें त्यांची आज्ञा फुकट न कधींही दवडिली. ॥ ३ ॥
त्रिकाळीं ही ठावें व्रत न पतिसेवेतर जिला ; ।
पतीच्या संभाषीं सततचि जिचा जीव रिझला ; ॥
करी कामा तर्कें समजुनि मनोभाव सकल, ।
पतीच्या आज्ञीं ती मग करिल कां चालढकल ? ॥ ४ ॥

---

१ विशेषेंकरून सन्निध राहून. २ हा शब्द मूळ संस्कृतरूपाप्रमाणें नपुसकलिंगी ठेविला आहे. ३ समजे. ४ सास.

दिरीं जावीं हेवा न करुनि, न चिंताहि कसली, ।
निजावस्थीं, देवा स्मरुनि, बहु सौख्येंचि वसली. ॥
कशाची हाकाटी न करुनि, ह्मणे शांत-हृदयें, ।
उणें कांहीं नाहीं जरि पति-सुखीं ईश्वर-दयें. ॥ ५ ॥

घरीं दारीं कोठें मृदु मधुरसे बोल वदली ; ।
जिच्या चित्तीं कोठें न वसत अहंभाव मुदलीं ; ॥
स्वभावें जी स्वच्छा, किमपि न जिच्या कृत्रिम मनीं ; ।
विचारें दक्षा जी विपरित मनेच्छा-नियमनीं. ॥ ६ ॥

स्वधर्मीं स्वाचारीं दिननिश जिचा प्राण रिझला ; ।
पितापुत्रभ्रात्यासम पुरुष पर्यन्य जिजला ; ॥
जिची लोकीं साधी सरळ सकला रीत रहणी ; ।
निजैश्वर्यानें जी किमपि कवणा तुच्छ न गणी. ॥ ७ ॥

स्व-लक्ष्म्यैश्वर्यें ही मिरवुनि न तोरा किमपि, जी ।
धरी दीरांजावांविषयिं हृदयीं बुद्धि न दुजी ; ॥
करूं तत्संसारा तनुमनधनें फाराचि झटे ; ।
तिच्यामागें ऐशीं असुनि, न विटे, शंभर झटें. ॥ ८ ॥

घरीं कोणी येतां, सुख बहु जिला, पाहुणपणें ; ।
न कामीं कंटाळा ; दिवसभर ठावें न निजणें ; ॥
न हें तें खाण्याची चटक, तितुकें जेवण पुरे ; ।
अगत्याच्या कामाविण परगृहीं जी नच शिरे. ॥ ९ ॥

घरीं मागूं येतां घृत हि उसनें, त्या न विटते ; ।
जरी सर्वां थोडें, तरि सुरस दे ताक झट तें ; ॥
आनाथा दीना दे झट मुठपसा धान्य पयसा ; ।
न संतापे कोणावर तिळहि ; नित्यक्रम असा. ॥ १० ॥

---

५ पतीवांचून इतर. ६ लचांडीं.

पराच्या साह्या दे, सरुनि पुढतीं, हात जलदीं ; ।
तुफानें ना जीचा किमपि खवळे पित्त-जलधी ; ॥
करी दासी-दासावर बहु दया जी जननिशी ; ।
तिला जे ते प्रेमें स्तवुनि जन गाती दिनानिशीं. ॥ ११ ॥

मिठाई मेवा ये, घरिं अगर ओंब्या हरबरा, ।
अर्धी देवा, सर्वां मग, उपरि घे आपण जरा ; ॥
कधीं पंक्तीमध्यें निजपर असा भेद न करी ; ।
पतीला, तें सर्वां बहु सढळ वाढी निजकरीं. ॥ १२ ॥

जिचें पाहूं जातां, गृह नभ जसें निर्मल तसें ; ।
मधें वस्त्रें, पात्रादिक चमकतें स्वच्छउँडुसें ; ॥
स्वतेजें त्यामध्यें सुखद पतिपूर्णेंदु भरला ; ।
तयाची ही दारा, बहु चमक मारी सुतर्‌ला. ॥ १३ ॥

घरीं वेळीं आल्या सकलहि पदार्थांतुनि, जरा ।
निराळें काढोनी घर ह्मणुनि ठेवी सुचतुरा, ॥
अशा साटोप्यानें, अवचित निशार्धींहि गरज ।
पडे, कस्तूरीची, त्वरित तरी दे काढुनि रज. ॥ १४ ॥

व्यवस्था संसारीं सकल जिचिया टापटिपिची ; ।
अगाऊ राखाया नजर पुढची तर्तुद जिची ; ॥
प्रपंचा थाटानें करुनिहि जपे जी पति-हिता ; ।
करी उत्साहातें प्रसवुनि कुशीं पुत्र दुहिता. ॥ १५ ॥

पतीला वंचूनी धन-वसन-पात्रादिक कदां ।
न माहेरीं धाडी जरि बहु असे तेथ विपदा. ॥
स्व माहेरीं जातां करुनि अवधी जी नमुदं, तीं ।
न टाळी, ओढीनें परत गृहिं ये त्याच मुदतीं. ॥ १६ ॥

---

७ स्वच्छ नक्षत्रासारखे. ८ अधिक चपळ. ९ नेमून दिलेली.

लिहाया वाचाया शिकुनि, सवडीनेंहि कशिदा ।
शिके काढाया, ती विणकरहि कामें तशिं कदां. ॥
सुपुष्पां गुंफोनी करुनि गजरा हारहि तुरा, ।
पतीला दे, त्याचें जडवुनिचि घे प्रेम चतुरा. ॥ १७ ॥
स्वधर्माचारीं, ज्या दिसतिल चुका दोष पतिचे, ।
प्रसंगा पाहोनी वदुनि मृदुसे बोल [10]पतिचे, ॥
पतीला जी दावी उकलुनि सुदृष्टांतपर ते. ।
सुधारी तद्वृत्ति स्थिति सकल मोठ्या चतुरतें. ॥ १८ ॥
सुवंद्या ही भार्या, सकल[11]सुगुणार्या, कुलवती, ।
पतीच्या सत्कार्या न करित विपर्यास लवती. ॥
उभारीची चर्या, किमपि पति-धैर्या न खचवी. ।
अशी धन्या स्त्री, कां न कुलतरणी[12] होइल भवीं[13] ? ॥ १९ ॥
उदारा ही साध्वी सतत पतिसेवेंतचि उभी ; ।
विचारें धैर्यें, ये जरि हि कसलें संकट, न भी ; ॥
मनानें जी शुद्धा, अमृतवचना, हास्यवदना, ।
सती प्रत्यक्ष श्रीपतिस मग दे कां प्रमद ना.* ? ॥ २० ॥
अशी स्त्री संसारीं पतिस असल्या सर्व सुगुणा, ।
तयाच्या आनंदाहुनि नृप-सुखानंदहि उणा. ॥
स्त्रिया ज्या संसारीं वळतिल अशा दिव्य वळणें, ।
सुधन्या त्या साध्वी अवनिवरतीं के. स. रि. ह्मणे ॥ २१ ॥

## पुरुषाचें वर्तन.

( शार्दूलविक्रीडित. )

लाभो यत्न करुनि जी स्थिति दशा वाईट किंवा बरी, ।

---

१० विश्वासपर. ११ सर्व गुणवती स्त्रियांत श्रेष्ठा. १२ कुलनौका. १३ संसारांत * आनंद.

ती मध्यें सुख मानुनी, भरंवसा ठेवीच विश्वंभरीं. ॥
ताजी नित्य उमेद राखुनि मनीं, धैर्य प्रसंगीं वरी. ।
ना भी जो, जरि कोसळेल समयीं आकाश अंगावरी. ॥ २२ ॥
ठेवी अन्य-धनीं न दृष्टि, करुनी जो सद्विवेका मनीं ; ।
जो मानी जननी, स्वसा, स्वदुहिता, स्व-स्त्री-तरा कामिनी ; ॥
जो सत्य-प्रिय-भाषणींच रतला ; निंदा न ज्या ठावकी ; ।
मात्सर्या व अहंकृतीस न मिळे ज्याच्या मनीं ठाव कीं. ॥ २३ ॥
झाला दुर्व्यसना पराङ्मुख सदां सत्संगतीच्या बळें ; ।
धर्माऽऽचार-सुनिष्ठ होउनि सदां अन्योपकारीं वळे ; ॥
कोणी दीन गरीब भिक्षुक घरीं आल्यास याचूं[14]आकर, ।
द्याया त्यां धन धान्य ऐपत जशी, ज्याचा पुढारीं कर. ॥ २४ ॥
कोणी पत्रहि घेउनी सलगिचे, आले घरीं पाहुणे, ।
प्रेमास्थें न पडोंचि दे किमपि जो त्यांच्या व्यवस्थीं उणें. ॥
मित्रीं साधुजनीं तसा गुणिजनीं भारी भुकेलाचि जो ; ।
द्रव्यें त्यांस्तव झीज घेउनि ह्मणे, हा देह सारा झिजो. ॥ २५ ॥
जाया भोगुनि हाल, जो कृपणतें राखी न पैसा करीं ; ।
किंवा जो उधळेपणा करुनि, ना लोळे घृतीं साकरीं ; ॥
जैसें ज्या समयास योग्याचि, तशा द्रव्य-व्ययाला करी ; ।
पाही धोरण मात, कर्ज समयीं होतां फिटे लौकरी. ॥ २६ ॥
झाला प्राप्त नृपाधिकार, बहुशी संपत्ति ही लाभली ; ।
लागे सर्वपरीं जनां गरज ही तत्साह्यतेची भली ; ॥
सोडी ना तरि रीति चाल रहणी, सद्वर्तनें पद्धती. ।
लोकांचा न करी अनादर, परी यत्नें झटे तद्धितीं.[15] ॥ २७ ॥
कोणी थोर लहानही स्वसदनीं येतां ह्मणे, "या" "बसा" ।
बोलूनी मृदु, जो तयां पुसतसे, "वृत्तांत आहे कसा ?" ॥

---

१४ याचकजन. १५ त्यांच्या हितावषयीं.

"होतां[१६] होइल तों करूनि" पुरवी त्यांच्या स्वयें कामना; ।
हो बोलूनि अर्धी, अखेर मग ना, ज्यापाशिं हें काम ना.॥२८॥
प्रेमें लोभ करी स्वसेवक-जनीं, प्याद्यां शिपायांवरी, ।
कामीं सिद्धहि राहती ह्मणुन ते एकाच पायावरी. ॥
वेळीं दे बढती इनामहि, ह्मणे, कोठें न बाहेर जा ; ।
आधीं ताकिद, अल्पदंड मग, त्यां जो शेवटीं दे रजा. ॥२९॥
लक्ष्मी, विष्णु, उमामहेश्वर, तशीं ज्या पूज्य मातापिता ; ।
तत्सेवीं न विसंबला, न विटला, खातां हि पाणी पितां ; ॥
आहे[१७] नादि पुसूनि, तर्तुद करी बाहेर जातां अधीं ; ।
येतां भेटुनि सौख्य दे सुवचनें पित्र-द्वया जो सुधी. ॥ ३० ॥
चित्तें तत्पर राहुनी सुसुख दे ज्येष्ठां पितृव्यादिकां ; ।
पित्रीं भक्ति, तशीच त्यांजविषयीं ठेवी, न ऊनाऽधिका. ॥
भाऊ ते निज बाहु, आणि भगिनी जाणे कुशी आपल्या ; ।
सौख्यानंद तयांस दे तनु-धन-द्रव्यें स्वतोषें भल्या. ॥ ३१ ॥
भावां भावजयांस जो जपतसे सप्रेम जीवाधिक ; ।
भावांना, मग आपणा विकत घे जो वस्त्रपात्रादिक ; ॥
पत्नी, भावजया, परस्पर न जो लेखी निजा, पारख्या ; ।
सर्वां दे नग डागिणेहि लुगडीं चोळ्या तशा सारख्या. ॥३२॥
वस्त्राऽलंकृतिनें मुलें निज, तशीं जो बंधुचीं शोभवी ; ।
ज्याच्यीं अल्प करावया प्रतरणा चित्तांत ना लोभ वी[१८] ; ॥
बंधु-प्राप्ति कमी असो, बहु असो, किंवा वसो तो घरीं, ।
कांहीं ना विपरीत भाव उपजे ज्याच्या कधीं अंतरीं. ॥ ३३ ॥
संसारीं निजसौख्य एक ललना, विश्रांतिचें स्थान कीं ; ।
जी सम्पत्ति विपत्तिला सहचरी रामा जशी जानकी. ॥

---

१६ त्या ह्मणीचा अर्थ होईल तितकें करून. १७ आहे किंवा नाहीं आदिकरून विचारपूस करून. १८ उपजतो.

ऐसें जाणुनि, जो मनें तनुधनें, जी आपली अंगना ।
सत्प्रेमें ममता करी तिजवरी, जीचा कधीं भंग ना. ॥ ३४ ॥
स्त्री ही केवळ हो बटीक घरची काबाडकष्टा धनी ; ।
राबावें न उसंत घेउनि तिनें सर्वांचिया साधनीं ; ॥
बोलावा ब्र न, गांजितांहि तिजशीं [19]सांस्वादिकीं सांजणीं ; ।
जो ह्या तुच्छुनि दुष्ट रीति, समजे स्त्री ही गृह-स्वामिणी. ॥३५॥
स्त्रीला अधिकार, ना प्रमुखता, ना कोणती मालकी, ।
ना स्वातंत्र्य तिला, [20]सुंभीरू अबला हा माल निर्माल्य कीं. ॥
"विद्या शीक" अशी स्त्रियेस न जरा शास्त्रोक्ति [21]कोठें वदे, ।
जो हें भाषण तुच्छुनी, स्वललने विद्यासुधा-पान दे ॥ ३६ ॥
संसारीं अधिकारिणी [22]मुखरणी, स्त्री ही गृहस्वामिणी ; ।
वेळेला सरसावुनी बहु क्षणीं जी होय चिंतामणी ; ॥
संसाराब्धि-निभावणीस तरणी, जी चित्तसंमोहिनी, ।
बोले, जी मधुधारिणी कमलिनी या [23]षट्पदालागुनी. ॥ ३७ ॥
जन्माचा प्रियमित्र कीं संवगडी जी एक हो कामिनी ; ।
जी प्रेमें सुख-तोषदे, पुरवुनी येईल जें का मनीं ; ।
बैसे सांवलिला सुनिश्चल, मला [24]कल्पद्रु जी [25]भावुनी ; ।
बोले, निष्ठुरतें तिला ढकलुनी देऊं कसा मी [26]उन्हीं ॥ ३८ ॥
देव, ब्राह्मण, यांसमक्ष वदलों, " धर्मार्थ कामें पहा, ।
भार्ये, सौख्य अखंड देइन तुला. " केलेंहि पाणिग्रहा. ॥
छद्में आज तिच्या सुखा जरि फुका होईन मी घातकी, ।
बोले कीं, तरि मत्समान न दुजा कोणी महा पातकी. ॥३९॥

---

१९ सासू, सासरा, नणंद, दीर, जाऊ आणि नवरा या सहा जणांनीं २० फार भित्री. २१ कोणत्याही ग्रंथीं. २२ मुख्य किंवा प्रमुख. २३ या मज भ्रमरास. २४ कल्पवृक्ष. २५ समजून. २६ उन्हामध्यें.

चित्तीं वाहुनि हा विचार बरवा, जो कांत कांतिप्रती ।
प्रेमें वागवुनी, मनें सुखवुनी, राखी तिची संस्थिती ॥
विद्याभ्यासाहि चालि[27]चाँ करवुनी, सन्मार्ग दर्शी तिला ।
होऊनी, पळवी समस्त तिचिया अज्ञानता-भ्रांतिला ॥ ४० ॥
जैसें पोंचवितां [28]सुतैल समयीं, ये तेजता ज्योतिला. ।
प्रेमें योग्य लळा तसा पुरवुनी, आनंद दे जो तिला. ॥
एखादा भलता तसाचि बसतां घेऊन हे[29]कें मनीं, ।
बोले, सर्व तुझेंचि. काय तुजला गे ऊन हे कामिनी ? ॥४१॥
वारंवार हितोपदेश कथुनी बोले, मनीं सांचवी ;* ।
पातिव्रत्य-सुधर्मनीतिपर जे, ते ग्रंथही वाचवी. ॥
कांते ऐक, विचार, सत्य, करुणा, शांति, क्षमाऽद्वैतता, ।
ज्या धामीं करितात वास, रुळते लक्ष्मी तिथें सर्वथाः ॥४२॥
कोणाच्या नशिबेंकरूनि अवघें चाले कळेना घर, ।
यासाठीं परिधान तूं कर सखे अद्वैत-दिव्यांबर. ॥
दैवाची निघतां किलीच घरची झालीच उद्ध्वस्तता. ।
माझा कांतच एकटा कमविता, ना बोल ऐसें स्वतां. ॥ ४३ ॥
वर्ते बाह्यजनीं घरीं पुरुष जो ऐशा विचारें भले, ।
राजाच्या सुख-मंदिराहुनि बहू तद्धाम हो शोभले, ॥
जेथें स्त्री-पुरुषें परस्पर-मतें अद्वैतता पावलीं, ।
बोले के. स. रि. त्या गृहाप्रत **रमा** चालून ये पावलीं. ॥४४॥

---

२७ कामापुरता. २८ स्वच्छ तेल. २९ हट्ट. * या क्रियेचें कर्म हितोपदेश हें आहे.

# आळस.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

आतांचें मग, कीं उद्यां हि परवां, किंवा पुढें काम तें ।
एखादे दिवशीं करूंच ; अथवा होईल होणार तें, ॥
ऐसें बोलुनिया खुशाल बसणें यत्नाविना कोणत्या, ।
बोला आळस त्यास, जो जन वरी कां दुर्दशा ये न त्या ? ॥१॥

( वसंततिलका. )

आहे उभा सतत आळस-शत्रु मोठा ; ।
सोटा स्वयें फिरवुनी करि फार तोटा. ॥
लागेल जो जन तया रिपुच्या स्वहस्तीं ; ।
त्या हिंडवी त्वरित दीन करूनि रस्तीं. ॥ २ ॥
जिंकूं जगास रिपु आळस तो निघाला ; ।
घालील कैं[1] न समजे गुपचीप घाला. ॥
त्याचा जगावरि असे बहुसा दरारा ; ।
दास्यें नृपाहि करूं लावितसे खरारा. ॥ ३ ॥
चित्तीं न कींव, रिपु आळस दुष्ट भारी ; ।
जातां पदीं शरण तो धरितो उभारी. ॥
बांधी जनांस जखडूनिच, आसपाशीं ।
जाऊं न दे, सहज मारितसे उपाशी. ॥ ४ ॥
जृंभा, अळीपिळि अशा उभय स्वदासी ।
प्रेरी पुढें नटवुनी निज साधनासीं. ॥

---

१ केव्हां.

आकर्षुनी, जन-मनास हटां ऽगेना त्या ।
मोहूनि पत्निसम दाखवितात नात्या ॥ ५ ॥

माया ममत्व अति दाखवुनी, स्वहस्तीं ।
आलिंगुनी, जन-मनीं करितात वस्ती- ॥
पाडूनि गुंग करिती बसल्याच ठायां ; ।
देती न उत्सव मना तिथुनी उठाया. ॥ ६ ॥

देती सुचूं न पुरुषां निज कामधंदा ; ।
मोहून त्यांस करिती निज दास बंदा. ॥
जृंभादि त्या घरघुशा मग लोक-वित्ता ।
आकर्षुनी, वहुत चालविती स्वसत्ता. ॥ ७ ॥

ऐशा जनांस मग मेहनत-स्त्रियेचा ।
वाराहि दुःसह गमे दिनरात्र साचा. ॥
साधूनि ही त्वरित आळस-शत्रु संधी, ।
टाकी धरूनि पुरुषां अति दुःख-बंधीं. ॥ ८ ॥

आलस्य दे न इह-भोग, न मोक्ष तोही ; ।
न स्वार्थ आणि परमार्थ घडेच कांहीं. ॥
दुःखें घरोघर जनां फिरवी भिरीरी. ।
प्रत्यक्ष मृत्यु तरि आळस ह्या शरीरीं. ॥ ९ ॥

त्या आळसापरिस मृत्यु बरा, पहा कीं, ।
सारी ददात विपदा चुकवी क्षणैकीं. ॥
तन्द्रा[३] निरंतर विपत्तिहि दुःख देते, ।
राहे असाच निज जन्मवरीं वदे ते[३]. ॥ १० ॥

ऐसा सुदुष्ट रिपु आळस, त्याजपेक्षां ।
त्याची करूनि बसणें न बरें उपेक्षा. ॥

---

२ वेश्या. ३ तंद्रा. ३ आळस किंवा निद्रा.

मोडावया त्वरित खोड उठा तयाची, ।
त्या ध्वंसुनी, करुनि घ्या सुटका स्वतांची. ॥ ११ ॥
उद्योग-बंधु रणधीर सुसौख्य-राशी, ।
त्याचा जॅनीं करुनि आश्रय, आळसाशीं ॥
दावूनि हात, उचलूनिच आपटावा, ।
कीं तो पुनश्च न करील कधीं उठावा. ॥ १२ ॥
त्या जन्मठेप नृप-शासन तीव्र फार ।
देऊनि, मानस-सरोवर-हद्दपार ॥
द्यावें करूनि, मग उद्यम-मित्रसंगें ।
घ्यावें अखंड सुख. के. स. रि. हेच सांगे. ॥ १३ ॥

## फटका.

गेली घटका पुनश्च ना ये मनीं कसें जनहो तुमजा
काय पहातां बसुन मजा ॥ ध्रु० ॥
सभोंवती आलस्य-शत्रुचा पडे गराडा फार जबर
तरि नाहीं कोणास खबर ॥
धरा करीं उद्योग-शस्त्र हें प्रखर बेत सोडुनि शंभर
त्वरित उठुनि बांधा कंबर ॥
निकर करुनि समर त्या दुष्ट शत्रुची पुरी घेऊन खबर
वर बांधा मुस्तकिम् कबर ॥

### चाल.

व्हाल तुह्मी मग सहज गबर. ॥
भाकर तेथें खाल घिवर. ॥
दरवळेल कस्तुरि अंबर. ॥
के. स. रि. चें हें वचन सर्वथा हिशेबांत व्हावें न वजा
काय पहातां बसुन मजा ॥ १४ ॥

---

४ लोकांनीं.

# उद्योग.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

त्रैलोक्यांत लहान थोर अवघ्या कोण्याहि कार्याविशीं ।
लागे जो श्रम यत्न मेहनत जी भारीच कीं अल्पशी, ॥
त्यातें उद्यम बोलती, हि ह्मणती उद्योग ; त्या वांचुनी ।
होणें कार्य न कोणतेंचि. महिमा त्याचा पहा वाचुनी. ॥ १ ॥

( वसंततिलका. )

आहेच काळ सकलाहुनि मूल्यवान, ।
तो आळसीं क्षण निरर्थक घालवा न. ॥
दाही दिशा हुडकिल्या स्वमनें तथापि, ।
गेली घडी न दिसणार पुन्हां कदापि. ॥ २ ॥
आयुष्य-वेळ दिधली परमेश्वरें जी, ।
तद्वृद्धि कोणिहि करूं न शके स्वकाजीं. ॥
ती नित्य मात्र घटते दिनरात्र यांहीं ; ।
यालागिं सद्व्यय तिचा करणेंच कांहीं. ॥ ३ ॥
आहेच वेळ तरि पुष्कळ कामकाजा ; ।
ऐशा तिच्या भरंवशावरती नेका जा. ॥
ती दूर दूर ह्मणतां, निज कार्य-वेळा ।
ठेपेल येउनि. तिची असली स्व-लीळा. ॥ ४ ॥
जो आपला हितक उद्यम-बंधु सांथी, ।
त्या, ना विसंबुनि धरा दृढ शीघ्र हातीं. ॥

२ जाऊं नका. ३ उद्योगरूपबंधु. ४ पाठिंबा राखणारा.

तत्सेवनीं झिजुनि देह सदा वसावा ; ।
जीवा घडेल सुख भोग, मना विसावा. ॥ ५ ॥
येतील ते दिवस उत्तम, हा हवाला ।
घेतां, घडेल न कधीं सुख या जिवाला. ॥
उद्योग आपण करूं ज़रि एक नेटें, ।
दारीं घरीं किमपि वाण नुरेल, कोठें. ॥ ६ ॥
उद्योगशील पुरुषास न दे क्षुधा ती ।
बाधा, कधीं न भिववी विपदा ददाती. ॥
कामीं स्वतां सतत जो रमला, तयातें ।
सोपें, कठीण असतांहि समस्त होतें. ॥ ७ ॥
जें आज काम करणें, न उद्यांवरी तें ।
टाकी, स्वयें त्वरित सिद्धि तयां वरीते ॥
प्रत्यक्ष मेहनत माय खऱ्या बिँधीची. ।
सम्पत्ति दे स्वतनया परमावधीची. ॥ ८ ॥
सारें हि दुर्मिळच मेहनती शिवाय. ।
दे पेरिल्याविण फळास जमीन काय ? ।
कोठूनि दे उघडिल्याविण छत्र छाया ? ॥
पंखा हवेस्तव हवाँ तरि हालवाया. ॥ ९ ॥
" माझा असेल हरि, देइल याच बाजीं " ।
ऐसें वदूनि बसल्या न मिळेल भाजी. ॥
यत्नाविणें वदुनि विठ्ठल ही विठाई, ।
होईल कार्य न कधीं बसल्याच ठायीं. ॥ १० ॥
ना हालचाल, तरि आणुनि कोण पायीं ।
देईल इच्छित ? मुखें वदुनी अगाई ॥

---

५ नशीबाची. ६ पाहिजे.

संजीवनी अमृततुल्य कविप्रसादें ।
दीर्घोद्यमेंच गुरु-पुत्र कचास साधे. ॥ ११ ॥
तो बालक ध्रुव महा हि तपोद्यमातें ।
स्वीकारुनी, अढळशा मिळवी पदातें, ॥
राजा भगीरथ करूनि महा श्रमाला, ।
ती स्वर्णदी उतरवी पितराऽऽश्रमाला. ॥ १२ ॥
स्वस्थ क्षणैक बसती द्रुपदात्मजा ती, ।
रात्रीस भीष्म-शिबिरा भिउनी न जाती, ॥
"सौभाग्य-सत्सुतवती" वरुनी वरातें ।
येतीच कां परत आपुलिया घरातें ? ॥ १३ ॥
द्वारावतीस जरि भीमककन्यका ते ।
ना धाडिती द्विज, लिहूनि सुपत्र हातें, ॥
कृष्ण भ्रतार मिळता तरि काय तीतें ? ।
उद्योग-कल्पतरु इच्छित दे फळातें. ॥ १४ ॥
लावूनि रंग, तनु झांकुनि वल्कलांहीं, ।
वृक्ष-स्थळीं वसति ; ना गृह गांव कांहीं ; ॥
निर्वाह जे करिति कंद-मुळें-फळांहीं ; ।
विद्या शहाणपणही लवलेश नाहीं, ॥ १५ ॥
होते खऱ्या वनचर-स्थितिला अशा जे, ।
ते लोक सांप्रत पहा भरतोर्वि-राजे ॥
उद्योग हेंच तप इंग्लिश यांहिं केलें, ।
अज्ञान-सिंधु विपदाऽब्धि तरूनि गेले. ॥ १६ ॥
जासूद शीघ्रगम वृत्तद तारयंत्र, ।
केलेंच अग्निरथ वाहन तें स्वतंत्र, ॥

---

७ शुक्राचार्यांच्या कृपेंकरून. ८ गंगानदी. ९ द्रौपदी. १० रुक्मिणी. ११ भरतखंड भूमीचे स्वामी.

केल्या कलाकुशलता हि दुज्या विचित्रा, ।
चित्तास त्या करिति थक्क, तटस्थ नेत्रां. ॥ १७ ॥
भू-तोय-तेज-पवमान-ख पंच भूतां ।
दीर्घोद्यमें प्रकट ठेवियलें स्वहस्तां, ॥
कंगालसें नगर लंडन हेम-लंका ।
केली. प्रयत्न-महिमा असला, न शंका. ॥ १८ ॥
नित्योद्यमें मधुप कीं मधु मक्षिका ते, ।
पीयूषशा मधु-रसास सदैव खाते. ॥
ना दूर, सन्निधचि सर्वहि उद्यमाला. ।
लक्ष्मी गळां वरुनि घालिल त्यास माला. ॥ १९ ॥
मार्जार दीर्घ करुनी सततोद्यमातें, ।
लोणी सुदुग्ध घृत सायहि नित्य खातें. ॥
लाभे सुसिद्धि करितां श्रम, त्याविना हें ।
होऊनि पंगु निज दैव सदैव राहे. ॥ २० ॥
यत्नश्रमें करुनि नित्य नवी हुशारी ।
जीवास ये, टवटवीहि वसे शरीरीं. ॥
किल्ली जशी अधिक वापरण्यांत, तैसी ।
राहील ती चकचकीत सुनिश्चयेंसीं. ॥ २१ ॥
उद्योग कल्पतरुच्या जन आश्रयासी ।
बैसे, तरी सकल सिद्धि घडे तयासी. ॥
घालूं नये तरि निरर्थक वेळ लोकीं, ।
हें के. स. री. जन-हितास्तव बोलला कीं. ॥ २२ ॥

# विद्या.

॥ श्लोक ॥

( मंदाक्रांता. )

जीच्या योगें सकल विषय-ज्ञान संपूर्ण झालें ; ।
यत्संयोगें भ्रम हरुनि हत्ताप सारे निमाले ; ॥
पश्चात् कीर्ति स्थिर उरवुनी देतसे मान सद्यां ; ।
देतां वाढे द्विगुणित, तिला बोलिजे नाम विद्या. ॥ १ ॥
कोणी विद्या कुलवधुविशीं होउनीया भुकेला, ।
तत्प्राप्तीचा तनुमनधनें यत्नही दीर्घ केला ; ॥
विद्या-धामीं वसुनि तिचिया लागला शुश्रुषेला ; ।
त्याला प्रेमें वरुनि, निज ती लेववी दिव्य शेला. ॥ २ ॥
विद्याभार्या सतत पतिच्या हेतुकार्या उभी ती ; ।
आत्में तेजें जन-नृप-सभीं त्या उरूं दे न भीती ; ॥
धामीं राहो, सतत विपिनीं कीं करो घोर वास, ।
तत्संगें ती वसुनि करिते आदरें गौरवास ॥ ३ ॥
या विद्येची प्रियहितकरा बुद्धि नामेंचि[1] आली. ।
विद्योऽऽरामीं[2] निज तिजसवें ती करूं केलि[3] आली. ॥
विद्याकुक्षीं सुत उपजती ज्ञान आणी विचार. ।
धर्मार्थादि प्रबलचि तिचे पौत्र विख्यात चार. ॥ ४ ॥
विद्या-धामीं निमुट रिपु सा बैसती ते अधोस्य ; ।
विद्या-गेहीं वसुनि करिती पंचभूतें प्रदास्य ; ॥
विद्याऽऽगारीं सतत विनयें राबती ऋद्धिसिद्धी ; ।
विद्या-द्वारीं सतत नयंता तिष्टते ही प्रसिद्धी. ॥ ५ ॥

---

१ सखी. २ विद्यारूप बागेंत. ३ क्रिडा.

विद्या-धामीं वरुण भरितो नित्य पाणी खुशाल ; ।
विद्याऽऽगारीं सविनय निशीं अग्नि दावी मशाल ; ॥
विद्प्रासादीं पवन हलवी योग्य वेळेस पंखा ; ।
विद्या-द्वारीं समभैं र्थैथिवी देइ तासास डंका. ॥ ६ ॥

विद्या-शक्त्या उडुनि फिरतीं अंतराळीं विमानें ; ।
तत्सामर्थ्यें सतत फिरती सागरीं वारि-यानें ; ॥
होतो अग्नि प्रकट समयीं ओढिल्या एक काडी ; ।
घोड्यां बैलांविण महिवरी चालते आगगाडी. ॥ ७ ॥

विद्या यंत्रें त्वरित कळवी जें घडे वृत्त दूर ; ।
स्नेहस्थानीं बहु पुरविते दीपका ज्यास-धूर ; ॥
भूगर्भींच्या सकल खडका गाळुनी तेल[10] काढी ; ।
संयोगी[11] भू खणुनि जलधी एकमेकांसि जोडी. ॥ ८ ॥

भूगर्भीं निर्भय शिरुनि ती आपल्या बाहु-नेटें, ।
शोधूं धात्वां सकलहि रसां थेट पाताळ खेटे. ॥
विद्यासारें गगन उडुनी पाहते सूर्यमाला ।
विद्या, शक्त्या निज-नियमनें[12] हाटवी त्या यमाला. ॥ ९ ॥

विद्यां-कोठीं कणिक मयदा सिद्ध सामुग्रि सारी ; ।
विद्यां[13]-पेटीं बहुपरिचि या कापडाची तयारी ; ॥
विद्यां-कोशीं सतत झटती हेम रौप्यादि नाणीं ; ।
विद्याऽऽरामीं प्रिय सुखदशीं चालती राग-गाणीं. ॥ १० ॥

विद्या-कोरी बहुविध जना थक्क व्हायास लेणीं ; ।
विद्या वांधी मिसर भुवनीं ते मनोरे त्रिवेणी ; ॥

---

४ साहा. ५ मुख खालीं घालून. ६ न्याय. ७ घड्याळ. ८ सामर्थ्यानें. ९ गलबतें. १० रॉकॉइलनांवचें. ११ सुयेजनांवाची. १२ प्राणाकर्षणानें. ०० गहूं दळण्याचें यंत्र॰ ० स्थान. १३ कापडाच्या गिरणींत. १४ टांकसाळेंत. १५ बाजांच्या पेट्यांची. ० अमेरिकाखंड.

विद्या तर्के जलधिंत महाद्वीप शोधी अफाट ; ।
विद्या दावी वरुनि [16]सरिता तत्तळीं रेलवाट. ॥ ११ ॥
विद्या स्थापी कुतुकद अशा वेध-सच्चित्रशाला ; ।
विद्या छापी सकल विषय-ग्रंथ पाडी ठशाला ; ॥
विद्या मापी अवनि सकलां पर्वतां सागरांशीं; ।
विद्या दापी सकल भुवनां बैसुनीया घराशीं. ॥ १२ ॥
विद्या दावी भुवन चवदा ज्योतिषाऽऽधारतंत्रें; ।
विद्या दावी जवळ, दुरच्या ही पदार्थास [17]यंत्रें; ॥
विद्या छाया धरुनिच हुबेहूब काढी सुचित्रें[18]; ।
विद्येचीं या परिकितिक मी सांगू कसें विचित्रें. ॥ १३ ॥
विद्या, यत्नाप्रिय-निजजना सत्करूपें नित्य पाही; ।
विद्या चोरा हरणकारितां येत नाहीं नृपाही; ॥
विद्या राहे टिकुनि तिजला घोकितां सुश्रमानें; ॥
विद्या शेखीं[19] निजवशजना पूर्ण सौख्याऽऽश्रमा, ने. ॥ १४ ॥
विद्या योगें, मति बल नय ज्ञान ऐश्वर्य रूप, ।
धर्म प्रौढि प्रभव शुचिता धैर्य तैसा हुरूप ॥
कीर्त्युद्योग स्थिर यश सुख स्थैर्य इत्यादि लाभे ।
हें सांगाया प्रकट, वदतो के. स. री., "ना मला, भे." ॥१५॥

---

## विद्वानाचीं लक्षणें.

॥ श्लोक ॥

( स्रग्धरावृत्त. )

चौदा चौसष्ट विद्या जन शिकुनि कला, ज्ञानसंपन्न झाला; ।
षड्शास्त्री तत्ववेत्ता बहुविध गणिती बोलती लोक ज्याला;

---

१६ लंडन शहराची टेम्सनदी. १७ दुर्बीनीनें. १८ फोटोग्राफिक चित्रें. १९ निदानीं.

बुद्धिज्ञानें जयानें श्रमुनि दिननिशीं देश-कल्याण-मार्ग ।
शोधोनी, नीट केले; त्यजुनि निज सुखा; तोच विद्वत्सुवर्ग.॥१॥

लोकांचे, तेचि सारे निज हित समजे होउनी जो विमानी[1]; ।
कोणी वाणोहि, निंदो, परि लव सुख वा दुःख कांहीं न मानी;॥
सोशी नाना विपत्ति श्रम बहु समयीं घालुनी जीव धोकीं; ।
ऐसा जो देश-कार्यी जन बहु खपला, तोचि विद्वान लोकीं.॥२॥

लागे येऊनि पायीं रिपुहि, मग तरी पुत्रवत्प्रेम-नातें ।
ठेवूनी, आत्मविद्या सकलहि शिकवी; अल्प नेच्छी धनातें॥
विद्यार्थ्यांची प्रतिष्ठा, निजसुख समजे; ताद्धिता जो विलोकीं;।
ऐसा अन्योपकारी पुरुष निपजला,तोचि विद्वान लोकीं.॥३॥

यास उदाहरण श्लोक १० वा खालीं पहा.

विद्वत्संगचि राहे डगमगुनि न जो अल्पही षड्विकारें; ।
विद्योन्मादें अहोचि कधींहि करितसे जो न कोणास कारे; ॥
निर्लोभें सर्व शिष्यांवरति करितसे प्रेम जें आत्म-तोकीं; ।
ऐसा जो एकभावी पुरुष निपजला, तोचि विद्वान लोकीं. ॥४॥

यास उदाहरण ११ वा श्लोक पहा.

कांहीं मानाऽऽदरीं तीं गरज न परवा बाळगूनी प्रतिष्ठा ; ।
वाणीच्याही प्रसंगीं प्रिय मृदु वचनें लीन थोरा कनिष्ठा ; ॥
विद्येची ना वढाई कधिंहि निजमुखें मीपणें अल्प झोंकी ।
ऐसा जो कां निगर्वी पुरुष निपजला, तोचि विद्वान लोकीं॥५॥

यास उदाहरण. १२ वा श्लोक पहा.

दारीं धामीं सभीं ही सरळ चि रहणी ठेवुनी वृत्ति साधी, ।
आल्या गेल्यास''या,जा''मृदु वदुनि,करीं जो निजोद्योग साधी;॥

---

१ निरभिमानी.

कोणी कांहीं विचारो, तरि समजुनि जो देइ; राही न झोंकीं; ।
ऐसा जो सद्विचारी पुरुष निपजला, तोचि विद्वान लोकीं. ॥६॥
यास उदाहरण १२ वा श्लोक पहा.

विद्या-कोश स्वयत्नें उघडुनि, सुमनें द्यावया साह्य भावां ।
प्रेमें सल्लेखनानें प्रकट करितसे अंतरीय स्वभावा; ॥
औदार्यें गुप्त ठेवा त्यजुनि निजहिता दाखवी जो विवेकी;।
ऐसा दाता कृपेचा पुरुष निपजला, तोचि विद्वान लोकी. ॥७॥
यास उदाहरण १३ वा श्लोक पहा.

येतां विघ्नें अरिष्टें धरुनि नच मनीं कोणती भीति वाया, ।
काया वाचा मनाहीं दिननिश झटला लोक कल्याण व्हाया; ॥
स्वज्ञानें हेतु ज्यानें उकलुनि हृदया सर्व केलें प्रसिद्ध; ।
व्याख्यानी बोधियेले जन फिरुनि मही. तोच विद्वान्प्रबुद्ध.॥८॥
यास उदाहरण १४ वा श्लोक पहा.

साऱ्या देशप्रजेचा, कळवळुनि मनीं, होउनि जो पुढारी ।
लोकांच्या दुःखतापा, बहु खटपटिनें साह्य देऊनि वारी; ॥
बोधें देशोन्नतीचा क्षिति फिरुनि, जना धोपटा मार्ग दावी; ।
विद्वानाख्या, असा जो पुरुष निपजला त्यास लोकीं वदावी॥९॥
यास उदाहरण १५ वा श्लोक पहा.

येऊनि भूमिलोकीं गुरुसुत कच तो लागला कार्यपायीं ।
रक्षी पुत्राप्रमाणें समजुनि हृदयीं त्यास नाना उपायीं. ॥
दुर्दैवी जी स्वविद्या पढवुनि शिकवी शुक्र संजीवनी ती ॥
बोले,"बाळा सुखे जा परत निजगृहीं" सांगुनी धर्म.नीती॥१०॥

---

२ देशबांधवातें. ३ हेतूस. ४ शुक्राचार्यांचे चरणीं. ५ न देण्याजोगी.

प्रस्तुत्काळांत विद्वज्जन जणु दुसरे भास्कराचार्य सिद्ध; ।
यद्विद्या भानुदीप्ति प्रकटुनि जगता द्योतवी हें प्रसिद्ध, ॥
विद्यासंगें जयांनीं बहु खडतरसे जिंकिले शत्रु साहा; ।
ते केरोपंत छत्रे सकल मिळविती धन्य तेचि अहाहा.!!॥११॥
तें विद्वद्रत्न गेलें चिपळुणकर जें विष्णुशास्त्री पुण्याचें. ।
तत्कन्या बंधमाला[६] कथन करितसे वृत्त त्याच्या गुणांचे. ॥
तद्विद्या ज्ञानबुद्धि स्मृति विनय तसें धैर्य देशाभिमान ।
सत्यप्रीति स्वधर्मीं बघुनि, जन तया वंदिती थोरसान. ॥१२॥
दृष्टि स्वार्थीं न देतां जन हितकरणीं इंग्रजी पाठशाळा ।
स्थापूनी; लोकचित्तीं ठळक वठविती आत्मविद्या ठशाला ॥
पुण्यग्रामीं सुरत्नें कितिक चमकती या परी स्वप्रकाशीं ।
आगर्कर्नाम ज्यांशीं ठळक टिळकही आपटे नामजोशी ॥ १३ ॥
केला ज्यानें स्ववाचें तनुमनाहि धनें देशसंसार सारा ; ।
देशप्रांतीं फिरोनी कळवळुनि जना पाजिलें बोधसारा ; ॥
बोले तैसाच चाले त्यजुनि निज सुखा, योग्यता ये फुका कां !! ॥
प्रेमें वंदू ग.वां.जो.[७] सकल जन जया बोलती देश''काका''॥१४॥
सोडूनी नौकरी ती घर वतन मळा अन्य धंदा पसारा, ।
हिंडोनि देश, केला तनुमनाहि धनें देशसंसार सारा ; ॥
दुष्काळीं अन्न लोकां पुरवुनि, जगवी मागुनि धर्म देशीं ; ।
बोधी देशोन्नतीचें पथ सुरस वचें ; वंदुं त्या गो. नृ.दे.शीं.[८]॥१५॥

## पद.

( जाऊं नकोरे विषयाळविची वाट कठिण मोठी—या चालीवर )

देश हितार्थ खुले पथ ज्यांनीं केले ज्ञानबळें, ।
त्यां विद्वान ह्मणावें, वरकड पोटार्थी सगळे ॥ ध्रु० ॥

---

६ निबंधमाला. ७ गणेश वासुदेव जोशी. ८ गोपाळ नरसिंह देशपांडे यांशीं.

ज्या काळीं जो राजा त्याची जन विद्या करिती, ।
होती निष्णात तीमधें बहु. ऐशी लोकरीती. ॥
यवनीं राज्यीं अलेफ, बे, पे, पढुनि अक्षरें तीं, ।
फार्शी अर्बी भाषांना जन पूर्णत्वें वरिती ॥
हिंदुराज्यिं क, ख, ग, घादि घेउनि वर्णांची ग्रंथी, ॥
संस्कृतज्ञ होउनि जन झाले वेद दशग्रंथी, ।
सांप्रत राज्यीं ए, बी, सी, डी घोंकुनि दिनरातीं ।
इंग्लिश ल्याटिन भाषामध्यें मेळविती ख्याती ॥
ह्मणविति विद्वज्जन स्वतां, परि हे स्वार्थी वगळे ।
त्यां विद्वान ह्मणावें वरकड पोटार्थी सगळे ॥ १९ ॥
शास्त्रकार ऋषि पौरुष सारे, जग-बांधव लोकां ।
होती आयु:पथदर्शी[9] त्या ग्रंथीं अवलोका ॥
कविमंडळ साधुवृंद होउनि दिग्दर्शक होकां,[10] ।
झाले सर्व जना भवसागर तरावया नोका ॥
त्यजुनि स्वार्था, जन कल्याणा मारुनि बहु हाका, ।
देती जाग्रति नसे जगावर तदनुग्रह[11] हा कां ? ॥
नचं मानाबंधु के. स. रीचें वचन मनीं अगळें ॥
त्या विद्वान ह्मणावें वरकड पोटार्थी सगळे ॥ १६ ॥

॥ श्लोक. ॥

( शिखरणी. )

जया काळीं जे जे नृपति भुवनीं राज्य करिती, ।
तयांच्या विद्येला तनुमनधनें लोक वरिती. ॥
वहाता हा ऐसा सतत जन रीत्योघ न खळे. ।
ह्मणोनी कां झाले अवनिवर विद्वान सगळे ? ॥ १७ ॥

---

९ आयुष्यांत येणाऱ्या सर्व अडचणींचे मार्गदर्शक. १० होकायंत्र. ११ त्यांची कृपा.

शिकोनी सद्विद्या जन दिननिशीं तींत गढले, ।
जरी राजेराव प्रभृति अधिकारास चढले, ॥
परंतू ज्यां कांहीं जन हित ह्मणोनि नच कळे, ।
असे पोटार्थी जे जन मग ह्मणो कां न बगळे? ॥ १८ ॥
जनांच्या कल्याणा निज हृदय ज्याचें न पघळे, ।
स्वविद्या दातृत्वें निज मन सदा फारचि बुळें, ॥
न शोभा दुग्धाचे जन महिवरी ते अजगळे, ।
असे पोटार्थी जे जन मग ह्मणो कां न बगळे. ॥ १९ ॥
अलेफ्, बे, पे, वर्णां पढुनि यवनी राज्य असतां, ।
घडे अर्बी पार्शी बहु उभयभाषीं प्रविणता. ॥
जहालेही काजी, मन जन हितार्था न उगळे, ।
असे पोटार्थी जे जन, मग ह्मणो कां न बगळे. ॥ २० ॥
स्वराज्यीं ती घोकी क, ख, ग, घ, ङ वर्णास जिभली, ।
मराठी भाषेतें लिहुनि शिकती संस्कृत भली ;
श्रुतिःशास्त्रज्ञानें जन मिरविती पंडित-टिळे ; ।
असे पोटार्थी, त्यां स्वहितक ह्मणो कां न बगळे. ॥ २१ ॥
सुखें ए, बी, सी, डी, जन दिननिशीं घोकुनि मुखें ।
घरीं दारीं हातीं बहु मिरविती इंग्लिश बुकें ; ॥
मिळाले बी ए चे युनिव्हर सिटीचे जरि झगे ; ।
नती विद्या जेथें निज मनिं सदा चार नुमगे ॥ २२ ॥
असे पोटार्थी जे पुरुष, निज विद्या मतिबळें ।
परांचे स्वार्थार्था सुधन हरणी कांपिति गळे. ॥
जगातें भोंदाया वरुनि बहु संभावितपणा ।
स्वयें दावोनी, ते. बहु ठकविती त्याहि कृपणा. ॥ २३ ॥
रचूनी एखादें कवन अथवा नाटक नवें, ।
तशी गोष्ट स्त्रीची रचुनि जमवी जी खरि नव्हे. ॥

तयाचा छापूनी ठळकच असा ग्रंथ सुबक, ।
तयाची घेती द्वित्रिगुणितहि ते किंमत ठक. ॥ २४ ॥
दुकानें घालूनी उघड अरज्या त्यांत लिहिती. ।
धनें घेती लोकां अडवुनि न दृष्टी परहितीं. ॥
न ते कामें घेती फुकट जरि तीं सार्वजनिक. ।
तयांची विद्या धिक् जन असुनि बी, ए हि ठळक ॥ २५ ॥
हुशारीनें भारी करिति हयकोर्टांत वकिली, ।
तिथें सत्यत्वाची कचिदपि सुवार्ता अयकिली, ॥
हवा तैसा पैसा लुटुनि पिशवी तुंब करिती, ।
नको एलेल्बी, ती अनुचित जिथें सार्थ करिती॥ २६ ॥
स्वविद्येनें होती मुनसफ, सुभेदार, गजरीं [12] ; ।
दवाखानीं झाले बहुत शिकुनी डाक्टर जरी ॥
परी ज्यांची सारी सतत धन वंतींच नजर ।
प्रधिक् विद्या ती ! घे कळकळ अनाथार्थ न जर ॥ २७ ॥
असो याची एकन्दरि करुनि, सारांश बघतां, ।
असन्मार्गी जाया बहुत परि जो हो उबगतां [13], ॥
जगाऽरोग्यासाठीं सकल निज विद्या-नवसुधा ।
श्रमें पाजी जो, त्या नमन करितों के. स. री. बुधीं [14] ॥२८॥

---

१२ गजरें करून. १३ कंटाळता. १४ विद्वज्जनास.

# अधिकारी पुरुषाचें कर्तव्य व तद्विपरित त्यांचें वर्तन.

## श्लोक.

### न्याय वर्तन.

( शार्दुलविक्रीडित )

होतो प्राप्त नृपाधिकार, पुरुषा ही गोष्ट दैवावरी. ।
लोकांचें करणें हिताऽहित वरें वाईट त्यांच्या करीं. ॥

१२ गजरें करून १३ कंटाळता. १४ विद्वज्जनास.

जन्माचें सुधरीच कीं बिघडवी ही राजसत्ता खरी. ।
वर्तावें पुरुषें विचार बरवा आणूनि हा अंतरीं ॥ १ ॥
जो राहूनि मनीं सुतृप्तचि सदां राजाचिया वेतनीं, ।
कांहीं लोक धनाऽभिलाष करण्या इच्छा धरी ना मनीं ; ॥
कामीं राहूनि दक्ष, राज-नियमें निष्पक्षपातें सदां ।
जो दे न्याय जनां ; स्ववृत्ति न कधीं ठेवी जनीं त्रासदा ॥२॥
कोणाच्या अहिता प्रवृत्त न बळें जो होय ; कोणा उणें ।
ना बोलूनि, जनोपमर्द न करी एकाहि दुर्भाषणें ; ॥
पाहूनी जन-दुःख, विव्हळ मनीं होऊनि जो त्यांचिया ।
दुःखाच्या परिमार्जनार्थ झटतो ना नीति सांडूनिया ॥ ३ ॥
दे जो सर्व जनां मित प्रिय अशा संतोष संभाषणीं ; ।
कामीं भीड न राखुनी, स्वमानिं भी लोकांचिया दूषणीं ; ॥
अंतर्बाह्य हि ठेवि बुद्धि समता थोरां लहानांविशीं ; ।
रक्षाया वचन-प्रमाण करितो चित्तांत कासाविशी ॥ ४ ॥
थोराहूनिहि दीन गोरगरिबीं घे दाद कामीं अधीं ; ।
देई न्याय तयां यथोचित तसा लावूनि जो नाऽवधी ; ।

कामीं लालुच दावितां हि जन, ना पावे मनोऽन्यग्रता ; ॥
अन्याया जरि दंड योग्य, न तरी शिक्षीं धरी तीव्रता ॥ ५ ॥
ज्याचें लक्ष्य बहु प्रजाजन-हितीं ; वेळेनुसारें जरा ।
भांडाया सरकारशीं हि नच भी ; जो लेखणीचा पुरा ॥
भारी हौस मनांत सार्वजनिकीं ; कामीं उभारी जया ; ।
ऐसा जो अधिकारि, तो नच कसा पावेल लोकीं जया! ॥६॥
लोकीं वर्ततसे धरूनि निरहंकार प्रवृत्ति स्वयें ; ।
वर्दी यत्स्वगृहीं नसे हि कवणा मज्जाव भेटीस ये ; ॥
सर्वां दुर्व्यसनीं पराङ्मुखाची ; जो नीति-स्वधर्मी रत ; ॥
ऐसा जो अधिकारि के. स. रि. ह्मणे तो धन्य या क्षोणित ॥७॥

## अन्यायवर्तन.

(स्रग्धरा)

आंगीं भारीच ताठा, सकल जनिं ह्मणे काय तो मीच मोठा ; ।
डोई बांधूनि फेटा, निज करिं मिरवी जाडसा लांब सोटा ; ॥
दंडाचा तो सपाटा, नित बहु उडवी झोंकुनी भांग घोटा ; ॥
कामीं काजीं हकाटा, समजुत न पडे, नर्मदेंतलि गोटा. ॥८॥
तोंव्या मासें च बोले, सतत जनि वसे आळ्यतेच्याचि तोलें ; ।
वर्मी मारूनि टोले, अनहित करणी नित्य चित्तांत डोले ; ॥
कामीं देऊनि झोले, करि अदयपणें दीन लोकाऽक्ष ओले ; ।
सत्याऽसत्यैक मोलें विकुनि, परधनें सांचवी तो डबोलें. ॥ ९ ॥
थोरांतें मात्र मानी, गरिबगुरिब त्यां अल्प चित्तांत नाऽऽणी ; ।
छेदे जें कां नखांनीं हित, न जरि तिथे होतसे खड्ग-पाणी ; ॥
द्रव्याची मात्र कानीं ध्वनि बहु परिसे, नायके शास्त्रवाणी ; ।
स्वोत्कर्षाची शिराणी, परि न करि पुढें दीन-साह्यार्थ पाणी. ॥ १० ॥

---

१ आवड. २ हात.

गुर्कावी सर्व लोकां सहज तरि जसा थोर दारील कुत्रा, ।
वर्ते मानेल तैसा नृपपद-विमर्दें नोळखी आप्त-मित्रां, ॥
पापीं शंका न चित्तीं; सहजहि दिसल्या डाव कोठेंहि कांहीं, ।
न्याया ऽन्याया न पाही स्वहित करितसे लोक मारूं हकाही.*॥ ११॥

आंतूनी एक, बाह्य स्वकृति तरि जशी रम्य वृंदावनांची, ।
तेथें ती व्यर्थ आशा किमपिहि करणें लोकवृंदा ऽवनाची. ॥
लोकद्रव्या ऽभिलाषीं अतितर धरली बुद्धि ज्यानें, तयाच्या- ।
पाशीं दीनें करूनी फळ किमपि न तें आत्म कल्याण-याञ्चा.॥१२॥

## तात्पर्य.

ऐसा सत्ताधिकारी निज मानिं नुमजे, चाकरी दो दिसांची ।
जातां, जाईल मागें क्षणिं निज पदवी "**रावसाहेब**" साची.॥
तेव्हां बोलेल कोण स्वपरजन सखा आपणा "या, बसा,"च ! ।
होतां निर्माल्य, पुष्पा स्वजन झुगरिती. न्याय हाही तसाच.॥१३॥

हेंही राहोच. कोठें सहजहि बदली होय ऐशा ववाची, ।
त्यातें गांवांत कोणी न करि. फुकटचा **रामराम** स्ववाचीं ; ॥
जातां तावा, तयाचें तुटुनि सकलही राजकीय स्वनातें ।
त्यातें जायास तेथें पदर खरचुनी ना मिळे वाहनातें. ॥ १४ ॥

राहूनी एक गांवीं बहुत दिन असा, त्यांत सत्ताधिकारी, ।
व्हावी त्याची अवस्था नवल गमतसे काय ऐशा प्रकारीं !!! ॥
ज्याची वाईट किंवा निज कृति बरवी लोक तैसे चहाती, ।
झाडा द्यायास लागे क्षण न लगुनि, त्या हातचा याच हातीं.॥१५॥
लोकीं ज्याची भलाई, पुरुष मग असो प्राप्त दीन स्थितींत. ।
त्याचे लागूनि पायीं सकल जन सदां प्रीतिनें वंदितात ॥

---

* हाका. ३ कडू वृंदावन फळांची. ४ लोकसमुदायरक्षणाची.

श्रीमद्यश्वंतराय श्रुत सकल जनां, मामलेदार होत्या ।
वेळीं जो थाट चाले, अझुनि बहु तसा.के.स.री.वंदितो त्या.॥१६॥

## अधिकाऱ्याशीं प्रजेचें वर्तन.

॥ श्लोक ॥

( पृथ्वीवृत )

स्थलीं स्थलिच नेमिले असाति राजयाच्या वतीं ।
स्वदेश-हित-रक्षणा कितिक लोक सत्तापती. ॥
तयां सुजन-रक्षणीं बहु तसा असच्छासनीं ।
असेच अधिकार, ते पुरुष सिंहसे स्वाऽऽसनीं ॥ १ ॥
असा अमलदार तो, सहज राजसत्ता बळें ।
चपेटिल कधीं करें जन-गजास हें ना कळे. ॥
कितीहि जरि शांत तो, भरंवसा तयाचा नसे. ।
स्वभावगुण ना सुटे कधींहि जो जयाचा असे. ॥ २ ॥
तुपांत तळुनी जरी बहुत-घोळिलें साकरीं, ।
अखेर तरि कारलें अति कडूच अभ्यंतरीं. ॥
सुदुग्ध आहि पाजुनी जरि हि पाळिलासेल कां, ।
चुकेल न डसावया समयिं आपल्या पाळकां. ॥ ३ ॥
अहर्निश धनाऽऽर्जवें बहुत मित्रता जोडिली, ।
करी न कसणी तरि समयिं बांधिल्या जो ढिली. ॥
असा अमलदारिचा अमल तीव्र, धुंदींत त्या ॥
न ओळख तया उरे जणु अजाण मद्या पित्या. ॥ ४ ॥
मना, करुनि सर्वदां निज विचार तूं फार हा,
करुनि अधिकारि या नमन, दूर बापा रहा. ॥

मना, सरळ, वांकडा किमपि त्यासवें होय ना ।
तया न लव दाखवी निज धनाढ्यता, दार्यना.[1] ॥ ५ ॥
कृपा न समजे, मना जरि ह्मणेल तो "या वसा" ।
करील तुमजे क्षमा कितिहि तो दिसो शांतसा.॥
न त्या सुजन जाण, तो स्ववचनें जरी ऊंससा. ।
करा ऽ ऽगत न सोडुनी हेरि[2] ह्मणेल देऊं ससा. ॥ ६ ॥
दिला जरि रुकार तूं, तदर्शयींहि[3] नव्यांणवीं; ।
दिसो विमल, शुद्ध, तन्मन तुला जणो जान्हवी ; ॥
परंतु घडल्यास तद्वचन-भंग एके दिशीं, ।
तुझ्या अनहिताविशीं पिळिल आपली तो मिशी. ॥ ७ ॥
जसा कल, तसाच तूं विचर. मात्र हे बा मना. ।
धरी किमपि त्याचिया सुवचनींहि विश्वास ना. ॥
पहा, अमलदार तो समायें बोलुनि गोडसें, ।
मनांतिल हारिद्र घे मग हळूच वर्मी डसे. ॥ ८ ॥
वहाविल नदी, नखीं त्वरित खातसे फाडुनी ; ।
करील धृत-खड्ग तो तनु दुखंड एके क्षणीं ; ॥
परी अमलदार तो करुनि हाल दे कालिमा. ।
जगीं स्वमुख दाविण्या स्थल नुरे, न दुःखोपमा. ॥ ९ ॥
जपूनि तरि वाग, बा जववरी न संबंध ये ।
तया जवळ जावया, तववरीच टाळीं स्वयें. ॥
दुरुनि नग दिव्यसे दिसाति साजरे गोजरे, ।
परी जवळ गेलिया भिवविताात खोरे दरे. ॥ १० ॥
मना अमलदारिचा दुरुनि झोंक वाटे बरा, ।
परी निकट दर्शनें सकल जीव हो घाबरा. ॥

---

१ दीनपणा. २ सिंह. ३ त्याच्या नव्यांणव हेतूंस.

ह्मणूनि कवणाविशीं भरु नको हि साक्ष स्वतां. ।
जरी सहज योग ये, बहुत राख निःपक्षता. ॥ ११ ॥
असा करुनिया बरा जरि विचार तूं वागशी* ।
तरी न पडशील तूं सहज वा प्रसंगीं फशीं. ॥
गमेल तुज के. स. री.—वचन हें मना निंवसें ।
परंतु परिणाम तें करिल गोड. सौख्यीं वसे. ॥ १२ ॥

## संपत्तीचें लक्षण व तींत आपलें कर्तव्य.

श्लोक.

( वसंततिलका वृत्त. )

श्रीलागि नाम चपलाच. पलांत जाई. ।
येई गृहीं सहज चालुनि शीघ्र पायीं ॥
एके क्षणांत जन नागविले, किती कां ।
केलें तिनें धनप. ना लव यांत शंका. ॥ १ ॥
तत्प्राप्ति हो करुं ह्मणेल बळेंचि कोणी, ।
व्हायास ती वश तया स्वमनीं न आणी. ॥
इच्छी न जो पुरुष, तत्सदनास दासी ।
होऊनि, वंदन करी दृढ तत्पदांसीं. ॥ २ ॥
पाही न ती सुकुलवंत, न रूपवंत, ।
विद्वान्प्रमूढ, विगुणिद्वय, दुष्ट, संत; ॥
ना विप्र, शूद्र, यवनादिक जाति, रीती ; ।
येतां मनीं सहज त्या सुकृपें वरी ती. ॥ ३ ॥
एका घरीं न चिरकाल टिकोनि राहे, ।
ऐसा तिचा त्रिजगतीं व्यवहार आहे. ॥

* वागलास. १ सुगुणी आणि निर्गुणी.

मुंबापुरीं कितिक शेर्यरच्या जुगारीं ।
झाले हरूनि धन, कोटिप ते भिकारी. ॥ ४ ॥
संपत्ति सांवलि जणोंच दुपारची ती ।
केव्हां कलेल, न कळेल. पहा स्वचित्तीं. ॥
कोटीश त्या नरसिकेशवजीस भीक ।
लागे ; अशीं दुजि उदाहरणें कितीक. ॥ ५ ॥

ना हा मनीं जन करून विचार कांहीं, ।
संपत्ति शाश्वतच मानुनि मग्न राही. ॥
स्व-श्री-सुवैभव-मदें बहु साभिमानी ।
होऊनि तो धनप तुच्छ जगास मानी. ॥ ६ ॥

तो आपल्याच बहु चालुनि निश्च तोलें, ।
कोणासवें अमळ नीट कधीं न बोले. ॥
दुर्वर्तनीं पडुनि, संगति दुर्जनाशीं ।
जोडूनि, पूर्वज-सुलौकिक सर्व नाशी. ॥ ७ ॥

जे सूज्ञ, दक्ष, पदरीं सदसद्विचारी, ।
ऐशां जनांप्रति धनांध न तो विचारी. ॥
ठेवी न जो स्मरण मागिल इष्टमित्रीं ; ।
वर्तेल कोठुनि तरी मग तत्सुतंत्रीं ? ॥ ८ ॥

जे मूर्ख, हांजि करणार, अशांच* नादीं ।
लागूनि, तो बिघडवी स्थिति जी अनादी. ॥
चांडाळचौकडि सदोदित ती सवेंची, ।
तत्संगतींत कुपथीं स्वधनास वेंची. ॥ ९ ॥
सौख्य-स्थितींत पुढतीं करणार हांजी, ।
ऐसेच मित्र बहु आढळती सहाजी ॥

---

१ हिरशेरशीचा. २॥ मुंबईतील प्रसिद्ध श्रीमंत व्यापारी. * अशांच्या. ३ पुर्वीपार स्थिति.

खाणें, पिणें, श्रवण बैठक, नाच, गाणें, ।
यां नित्य सादर पुढें घरच्या प्रमाणें. ॥ १० ॥
खादाड-मित्र तरि बाभुळ वृक्षसे गा. ।
छायाहि आश्रय न दे; फळ रुक्ष शेंगा; ॥
त्यां वेगळा क्षण धनांध ह्मणे न राहूं. ।
त्या हें कळे, न मज हे गिळितील राहू. ॥ ११ ॥

आल्यास किंचिदपि संकट आयकोनी, ।
ते ठेविती स्वकर भोजन-बंधु कानीं. ॥
ना पूर्व ओळख कधींच अशा प्रकारीं, ॥
ते वर्तती. अहि कृतघ्न जणो विखारी. ॥ १२ ॥

ते जाणती, स्वहित मात्र दुजे न कांहीं. ।
शंका, परद्रव तयां उपजे, नको ही; ॥
मल्हारराव नृप, तत्सख, हे पहाना ।
माहीत यच्चरित तें सकलां जनांना. ॥ १३ ॥

दुःसंगतीं धन-मदें तरले. न कोणी ।
त्यांची जगीं पसरलीं अति निंद्य गाणीं ; ॥
बाजी नृपाळ वश दुर्जन डेंगळ्याला ।
तेणें तया व्यसन-पाश नडे गळ्याला. ॥ १४ ॥

लाभूनि सर्व परिची स्थिति उत्तमा ती, ।
जो ना वसे पुरुष अल्पहि ऊतमातीं[1] ; ॥
पूर्व स्थिति स्मरुनि पूर्व जनां न टाळी ; ।
त्याचीच धन्य बहु शाल हि भीकबाळी. ॥ १५ ॥

सारांश, वैभव अशाश्वत दो दिसांचें ।
कीर्त्यैक मात्र अचला जगतांत सांचे. ॥

---

१ उन्माद.

कोणी ह्मणून धन-गर्व न तो वहावा. ।
तेणें जगीं सकल होईल ती वहावा. ॥ १६ ॥
श्रीवैभवीं निरभिमान ; सुधर्म नीती ।
स्वीकारुनि, झिजवि देह सुवर्तनीं. ती ॥
धन्या सती जगति माल्वदेश-राणी[१] ! ! ।
गातो तिची ह्मणुनि के. स. रि. नित्य गाणीं. ॥ १७ ॥

---

## द्रव्यसंचय व त्याचा व्यय.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

तो धौतालपणा तशी कृपणता अंगीं नसावी, परी ।
सारासार विचार पाहुनि मनीं द्रव्य स्वयें वापरीं. ॥
स्वप्राप्तीहुनि खर्च तो अधिक ना व्हावा स्वसौख्यार्थही ; ।
तैशी भोगुनिया ददात ; धन तें राखूं नये संग्रहीं. ॥ १ ॥
प्राप्तीचा चवथा निदान अथवा तो अंश पै साहवा ।
राखावा ; वहु काम काज पडल्या हातांत पैसा हवा. ॥
हातीं ना अडका, हटांत धडका जाण्याहुनी स्वगृहीं ।
वैसावें. करि काम दाम ह्मणुनी तो राखणें संग्रहीं. ॥ २ ॥
थेंबें थेंब तळें, कणें कण जसें कोठार सारें भरे ; ।
कौडी कौडिस जोडितां गृह धना ठेवावया ना पुरे; ॥
हें जाणूनि मनीं, उणीव नसतां कोण्याप्रकारें घरीं, ।
राहावें दिडकीस तत्पर जनें जोडावया सत्वरीं. ॥ ३ ॥

---

१ अहल्याबाई होळकर.

उद्योग श्रम लागती बहु धन-प्राप्ती कराया खरी, ।
कामीं गुंतुनि होतसे सवड ना पाणी हि प्याया पुरी; ॥
लाखापासुनि खर्चण्यास धन तें कार्याऽनुलक्षें तरी ।
मागें पाहुं नये. न कर्ज परि तें व्हावें वसो अंतरीं. ॥ ४ ॥

हा हेत्वर्थ मनीं धरूनि बरवा, ते मारवाडी जसे ।
व्यापारीं धन जोडिती करुनि ते पांचाचिये पांचशें. ॥
नीं तैसे परि योग्य कार्य समयीं मागें पुढें पाहतां ।
औदार्यें धन वेंचिती. प्रति जनें व्हावें तसें सर्वथा. ॥ ५ ॥

द्रव्याचा उपभोग जो नर न घे, नानापरी साधनीं ।
तद्‌द्रव्यर्थच मात्र जो जन झटे, त्याचा नसे तो धनी. ॥
तो तद्रक्षक सर्प केवळचि, तद्भोक्ता, दुजा, आयतें ।
येतां द्रव्य करीं सुखें व्यय करी आल्या पथें जाय तें. ॥ ६ ॥

आहे जीवित, तों परोपकृतिच्या सन्मार्ग-कार्यीं धना ।
वेंचावें; स्वसुखाहि संचय असो, पुत्र-प्रिया-साधना. ॥
घ्यावा हात धुऊनि सूज्ञ पुरुषें गंगा-जलीं वाहते. ।
येतां मृत्यु, धनादि जेथिल तिथें राहे, सवें ये न तें. ॥ ७ ॥

धन्या एक परोपकार-सु-रता राज्ञी अहल्या सती ! !
नारो शंकरिं धन्यता, तशि असो हेमाड पंतास ती. ॥
मार्गीं लोक-गृहें, तळींहि विहिरी, देवालयें घाट ते ।
औदार्यें बहु बांधिलीं जन-सुखा. वाजे जगीं धाट ते. ॥ ८ ॥

तैशी पांथजन-क्षुधोपशमना तीं अन्नसत्रें कितीं ।
स्थापूनी, चिरकाल नांव जगतीं राखी तसें ती सती. ॥
विठ्ठल्सुंदर राजबाहदर दे वर्षाशनें ब्राह्मणा; ।
देवस्थान-जहांगिरी कितिक दे. त्या धन्य कां ना ह्मणा. ॥ ९ ॥

---

१ धर्मशाळा. २ लौकिक.

तो तो धन्य मनुष्य जो नजहितासाठीं स्वसम्पत् त्यजी ।
डेव्हिड्सासून, जेमशेटजि जिजिभाई, जगन्नाथजी, ॥
यांहीं आत्मधनेंच औषधि-गृहें विद्यालयें स्थापिलीं ।
धन्य द्रव्याहि तेंचि ! के.स.रि. कथी जें कीर्ति राखी भली.॥१०॥

---

## द्रव्यमहिमा.

॥ श्लोक ॥

### संपत्त्युत्कर्ष.

( मदिरा किंवा सवाई )

द्रव्य घरीं असल्या वनिता बहु जोडुनि हात पुढेंच उभी ती. ।
झेलितसे पतिच्या वचनास मनीं वरचेवर पावुनि भीती. ॥
"हूं" ह्मणतां पति, तो समजूनि मनोगत भावहि कार्य करी. ती ।
कांहीं पडो न उणें ह्मणवूनि जपे दिनरात सु-सेवक-रीतीं. ॥ १ ॥
राहुनि सन्निध पुत्र सदां मृदु भाषण ऐकविती जनकातें. ।
एक चुरूनि पदां हळु, घालितसे दुसरा व्यजनाऽनिल हातें. ॥
साधि नको मज शालु ह्मणे दुहिता, तरि द्या प्रिय पैठणि बाबा. ।
तन्मणि द्या दुसरी ह्मणते, जड हा किती हो विधुहार अबाबा!! ॥२॥
बंधु सदां वचनीं विनयें बहु राहुनि तत्पर तत्प्रिय कामीं, ।
गुंतुनि, टापटिपीस घरांतिल दक्षपणें झटती दिनयामीं ; ॥
भावनया निज चंचलता अति दावुनि, भाउजिच्या स्वमनाचा ।
पाहुनिया कल, वर्तति तत्सम ना करितां अवकाश पळाचा.॥ ३ ॥

---

३ जगविख्यात याहुदी साहुकार. ४ सरजेमशेटजी बाटलीवाले. ५ मुंबईतील जगन्नाथ शंकरशेटजी. ६ इस्पितळें ( दवाखाने ). १ पंख्याचा वारा. २ चंद्रहार.

ये शिमग्यास वहीण तशीच वसे उगवे जरिही दिपवाळी ।
वस्त्र-नगादि पदार्थ सवें किति घेउनि जाय नवीन नवाळी. ॥
जांवइ, झाडुनि आप्तहि मित्र पुढें करिती स्वहितास्तव हांजी. ।
सेवक दासहि दासि निरंतर जोडुनि हात उभे निज्काजीं ॥ ४ ॥
भोजन-बंधु, किती दुसरे जन खुंटिस टांगुनि दिव्य गवाळीं, ।
देउनि ढेंकर सुस्थिरसे फिरती शहरांत करीत टवाळी. ॥
शास्त्रि, पुराणिक, भिक्षुक, याचक, गायक, वादकही गुणवंत ।
येउनि, सद्वचनास वदूनि उभे पसरूनि करां; न उसंत. ॥ ५ ॥
जाय कुठें धनवंत, उभे जन राहुनि त्या प्रति वंदिति चालीं. ।
आदरुनी विनयें बसवूनि तया, बसती मग आपण खालीं. ॥
भोजन पान सुपारि फुलांसह गौरवुनी, कथिती निज नातें. ।
आर्जव दाखवुनी जन वर्णिति सद्धनिका नसल्याहि गुणातें. ॥ ६ ॥
हांशिल, जोंवरि सिद्ध शितें, असती बहु तोंवरि संनिध भूतें; ।
मुंगि-थैवा जमतोच अनावर साखर गूळ मधाच सभोंतें; ॥
धांवुनि वायस आंमिषिं शीघ्र गतीं पडती जणु राखुनि डोळा; ।
तेवि धनास विलोकुनि आप्त जनादिक होति सहाजिक गोळा. ॥७॥
षड्रसयुक्त सुपात्र तयावर येउनिया बसती बहु माशा; ।
पुष्परसें भरलें असल्यावर भृंग नकां करितील तदाशा? ॥
धान्यभरें असलें जरि शेत उभें, तरि काय कमीपण टोळां? ।
तेवि धनास विलोकुनि आप्त जनादिक होति सहाजिक गोळा ॥८॥
सार, सुता वनिता सुत बांधव हा परिवार पहा पयशाचा. ।
होउनि दूर विपत्समयास, विभाग न घेइ लवाऽपैयशाचा ॥
नारद-भेटिंत वाल्मिकिला गुज हेंचि कळूनि निजानुभवा ये ।
केसरी हो प्रभुपादसरोरुह–लीन ह्मणूनिच वाङ्मनकायें ॥ ९ ॥

---

३ तमाम. ४ फुरसत. ५ मुंग्यांचा जमाव. ६ खाद्य पदार्थांवर. ७ थोड्याही अपयशाचा.

## संपत्त्यपकर्ष.

होयचि तें धन-पात्र रितें, तंव सर्वहि त्या उदरंभर माशा ।
तेथुनि जाउनि शीघ्र उडोनि, दुरूनि सुखें बघतात तमाशा ॥
निर्धनशी स्थिति जाणुनि तोडुनि सत्वर त्या ममता दृढ पाशा ।
काढिति पाय हळूहळु तेथुनि सर्व सुहृज्जन वेष्टुनि गाशा ॥१०॥

निर्धनता प्रदरीं स्वगृहीं मग कायाचि चाड तया पुरुषाची ।
कोणि पुसे न विचारि "खुशाल" घडे अरि भेट बहूत दिसांची ।
जाय कुठें, हि बसेहि उठे, गणतींत न. भाषण ना पण गांवीं. ॥
स्वीय जनांताहि कोठिल कोण नुरे अणु ओळख देखिल नांवीं॥११॥

जाय घरीं तंव सर्वपरीं वानिर्ता-वदनें पारसूनि नकारा ।
तो क्षुधित श्रम पावुनि खिन्न वसे वहु टाकुनिया सुसकारा ॥
स्त्री मग त्यास ह्मणेल उठा जइं येउनिया तिचिया स्वविचारा, ।
निर्धन कांत अगांतुकसा मग जेवितसे गुपचीप विचारा ॥१२॥

निर्धन जाणुनि आत्मपिता, सुत आणि सुता करिती तिटकारा ।
तात ! न धोतर, पर्कर हा धड, या परि मारिति ते झिणकारा ॥
बैसति घांव, मनीं, बहु धांवें करी, तरि वांवें नसे पयशाला ।
वस्त्र मिळे न तया भरडें मग कोठुनि मंदिल शाल दुशाला ॥१३॥

निर्धनता पुरुषा कृशता अति आणुनि दे न मनास उसंत[11] ।
ब्रह्मसमाज सभा न रुचूनि, गमे न वसंत-समीर पसंत ॥
चिंतन-धाम विपत्ति-निकेतन[12] निर्धनता गृह दीन गतीचें ।
भाग पडे सहनास हितास्तव चार शिव्याहि दिल्या जरि नीचें ॥१४॥

अस्तु. अपार विपत्ति अशी जरि भोगितसे बहु विप्र सुदामा ।
प्राप्त दशेंतच मानुनि सौख्य भजे प्रभु माधवजी सुख-धामा ॥

---

८ बायकोच्या तोंडून. ९ खटपट. १० रीघ. ११ विश्रांति. १२ विपत्तीचें घर.

कृष्ण-सु-दर्शन तें घडल्यावरि पावतसे अनुकूल रतीतें ।
हें समजूनि मना शरणागत जा काथि के. स. रि. विश्वपतीतें ॥१५॥

## कालमहिमा.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

जन्मापासुनि वस्तुच्या तरि लयापर्यंतची जी स्थिति, ।
तीतें दैव, नशीब, कर्म, ह्मणती प्रारब्ध कोणी रती. ॥
येतें संचित पूर्वजन्मकृत, तें जन्माचिये संगती. ।
त्या रीतीं सुख दुःख भोग अवघे भोगावया लागती. ॥ १ ॥

ज्याचें ज्यापरि पूर्वसंचित, तसें भोगावया ना टळे. ।
ज्यानें जो द्रुम लाविला, पुरुष तो त्याचींच लाभे, फळें. ॥
होतें प्राप्त सुखाऽसुख प्रतिजना, किंवा सुधें वांकडें, ।
ती सारी निज-पूर्वकर्म-फलता, ना दोष देवाकडे ॥ २ ॥

प्राण्यालाच न मात्र केवळ ह्मणा प्रारब्ध हें वेढिलें. ।
तेणें स्थावरजंगमादि कवणा ना सोडिलें हो ढिलें. ॥
मृत्पाषाण समुद्र पादप लता पक्षीं कृमीं श्वापदां, ।
दे प्रारब्ध सुरांऽसुरांहि मनुजां आनंद कीं आपदा. ॥ ३ ॥

तें दैव प्रतिकूल साह्यकर वा होईल, तैशा रितीं ।
त्या दुर्दैव सुदैव लोक जगतीं हाका सदां मारिती. ॥
दैवाची गति दुर्धरा, स्वकरणी, कोणा कळो ना शके. ।
हैषाऽऽस्यें[2] श्रुति बोलवी, करितसे वाचस्पतीला मुकें ॥ ४ ॥

---

१ अथवा. २ रेड्याचे मुखानें.

# दुर्दैव.

होतां वक्र सुकाल चक्र, न तया कोणी निवारूं शके. ।
पीडा ते आति पावती ग्रह; चुळें क्षीराब्धि एके सुके; ॥
सिंह, व्याघ्र, फणींद्र, मत्त गज, ही आज्ञेमधें वागती; ।
तेथें मानव कःपदार्थ !! जनहो दैवी विचित्रा गती ! ॥ ५ ॥

ब्रह्मा होय अपूज्य भू-तळवटीं; त्या धूप कैचा दिवा ? ।
अंगीं लेपुनि भस्म, अक्षय घडे वास स्मशानीं शिवा; ॥
विष्णूतें अवतार-चक्र फिरवी मत्स्यादि योनींप्रती; ।
राकाऽर्मीं[३] उपराग ये विधु-खगा; दैवी विचित्रा गती!॥ ६ ॥

पुण्यात्मा नृगराज थोर सरडा होऊनि कूपीं वसे; ।
तारुण्यींच नृपा ययातिस जरासर्पी क्षणार्धी डसे; ॥
ब्रह्मा, विष्णु, महेश, ते अनुसया-धामीं तिघे रांगती; ।
झाला इंद्र पहा सहस्र भग तो. दैवी विचित्रा गती ! ॥ ७ ॥

कंठी[४] काळ, हरूनि राज्य, विपिनीं भूप द्युमत्सेन हा; ।
श्रीमद्राम चतुर्दशाब्द विपिनीं भोगी विपत्ती महा; ॥
श्रीमत्पांडव काननांत वरुषें तेरा श्रमें हिंडती; ।
ज्याचा माल, तयास हाल समयीं; दैवी विचित्रा गती! ॥ ८ ॥

वर्षे षष्ठिसहस्र जो तपकरी राजर्षि, त्या कौशिका ।
स्वर्गीं ने सहजी करूनि कुतरा इंद्राप्सरा मेनका;
स्त्री, भंगास्वन राय होय निमिषीं; "वृत्तांत हा भारतीं." ।
भाळीं जें लिहिलें, कदापि न चुके. दैवी विचित्रा गती! ॥९॥

हांकावें ऋतुपर्ण राज-सदनीं कां अश्व भूपें नळें ? ।
पाणी डोम-गृहास कां नृप हरिश्चंद्रें वहावें बळें ? ॥

---

३ राका + अर्मी म्ह० पूर्णिमा व अमावास्येस. ४ कंठिता झाला.

रावावें नृप विक्रमें श्रमुनि कां तेल्याचिये संगतीं ? ।
व्हावें कां सुरें दास रावण-गृहीं ? दैवी विचित्रा गती! ॥ १० ॥

भीमें कां तरि एकचक्र नगरीं भिक्षार्थ झोळी करीं ।
घ्यावी ? पोटभरी तथापि न मिळो कां पांडवा भाकरी ? ॥
भू-दाना पसरी पसा बलि-गृहीं जो इंदिरेचा पती; ।
जोगा घेउनि गोपिचंद भटके; दैवी विचित्रा गती! ॥ ११ ॥

यावी काय सभेंत ती द्रुपदजा पांचां पतींच्या पुढें ? ।
व्हावा कां अनवर्द्यसा छल तिचा कोणाहि जो नातुडे ? ॥
सीता बंधन पावली; जड शिळा झाली अहल्या सती; ।
सावित्री घटिकैक होय विधवा; दैवी विचित्रा गती! ॥ १२ ॥

जुंपावा क्षणिं यादवीं कल्ह कां जे एकमेकां विते ? ।
पावावे क्षय काय एक दिवशीं छप्पन्न कोटीहि ते ? ॥
व्याधाचा शर काय कारण घडो श्रीकृष्ण–घाताप्रती ? ।
युद्धीं कर्ण-रथास कां क्षिति गिळी ? दैवी विचित्रा गती! ॥१३॥
यावा कां मणि चोरल्याविषयींचा आरोप कृष्णा फुका ? ।
खुंटीनें नवरत्नहार गिळितां तो विक्रमा आळ कां ? ॥
ये कां दोष विषप्रयोग–कृतिचा मल्हाररावाप्रती ? ।
एकाचा अपराध दंड दुसऱ्या. दैवी विचित्रा गती ! ॥ १४ ॥

तो शाहालम बादशा रिपु जया धांके थरा कांपती, ।
तीची घेऊन नेमणूक बसला बावन्न कोटी पती. ॥
बाजीराव शतांश पेनशन घे सोडूनि राज्य-क्षिती. ।
सोनें घेउनिया परीस दिधला. दैवी विचित्रा गती! ॥१५॥
रावातें क्षणिं दैव रंक करुनी बंकीं सदां वास दे, ।
रंका देउनि राज्य, “ अक्षय सुखें निर्वैर नांदे वदे ”. ॥

---

५ देव. ६ वदण्यास अयोग्य असा. ७ प्रसवणारे. ८ तीन कोटिची.

पाहा, गुर्जरदेश वैभवपती मल्हारराव–स्थिती. ।
भोगी राज्य सयाजि औरसपणें. दैवी विचित्रा गती! ॥१६॥
दारिद्र्यें जन एक पीडुनि घरीं, गेला महासागरा; ।
गेलें कर्महि त्याबरोबर. ह्मणे “ हा मित्र माझा खरा ”. ॥
तो मोत्यांस्तव मारितां मग बुडी आशा धरी फार ती, ।
हातीं शंख परंतु लागुनि रडे. दैवी विचित्रा गती! ॥१७॥
एका लाभुनि सार्वभौम पद तें सौख्यीं झुले मंदिरीं, ।
तद्बंधु भ्रमुनी दुजा वनफळें सेवी गिरीकंदरीं ॥
एका खाणितले जरी दगड, ये देवत्व एका तरी, ।
सांगे के. स. रि. त्याच देव-सदनीं होतो दुजा पायरी ॥१८॥

## सुदैव.

येतां तो अनुकूल काल, यमही ना होय हानीकर; ।
होतें वक्र सुधेंचि; सोमल तरी होतो गुणें साकर; ॥
ना होणार कदापि, तें घडुनि ये, आयास ना लागती; ।
तो सर्वत्र न काय होय विजयी ? ज्या साऽनुकूला रती ॥१९॥
आयुर्हीन मृकंडु-सूनु वदला, “ दीर्घायु हो ” त्या यम; ।
प्रऱ्हादा विष पाजितां अमृतसें झालेंच तें कायम; ॥
रामाच्या वचनें शिळाहि तरल्या सिंधूंत नौका कर्तीं; ।
तो सर्वत्र न काय होय विजयी ? ज्या साऽनुकूला रती ॥२०॥
कृष्णें “ चित्ररथास मारिन ” अशी केली प्रतिज्ञा, तरी ।
पार्थें देउनि आश्रया सहज त्या संरक्षिलें सत्वरीं; ॥
प्रेमें कृष्ण परेश अर्जुन–रथीं झाला रणीं सारथी; ।
तो सर्वत्र न काय होय विजयी ? ज्या साऽनुकूला रती ॥२१॥
भोगी हाल विपत्ति. फार, अठरा दारिद्र्य विश्वें घरीं, ।

---

१ दुसरा दगड.

ऐशा विप्र सुदामजीवरि कृपा जेव्हां करी श्रीहरी, ॥
सोन्याची नगरी तयास घटकीं लाभे, जनां माहिती. ।
तो सर्वत्र न काय होय विजयी ? ज्या साऽनुकूला रती ॥२२॥
श्रीमच्छालिवहान सर्व परिचीं चित्रें करी मातिचीं, ।
सेना तीच सजीव होउनि उठे. संख्या न सीमा तिची. ॥
राजा विक्रम-सैनिका पिटवुनी दे. नर्मदा-पार ती ।
तो सर्वत्र न काय होय विजयी ? ज्या साऽनुकूला रती ॥२३॥
साधें पोर, परंतु दुर्गम नगा औरंगजेबा [10]पंवी ।
होऊनी, स्वबल-प्रहार करुनी त्या थर्थरा कांपवी. ॥
श्रीमद्राय शिवाजि हिंदु-वसुंधा-राज्या[11] करी. ये रितीं. ।
तो सर्वत्र च कां न होय विजयी ? ज्या साऽनुकूला रती ॥२४॥
झाला पन्नग फारसा क्षुधित जो पेटीमधें आडला. ।
छिद्रा पाडुनि तींत मूषक शिरे खाऊनि जो वाढला. ॥
भक्षूनी निज भक्ष्य, वाट भुजगा जाया मिळे आयती ।
तो सर्वत्रच कां न होय विजयी ? ज्या साऽनुकूला रती ॥२५॥
अंधाची कुबड्यासवोंचे रतली दिव्यांगना त्रिस्तना, ।
या गोष्टींत तिघांहि एक समयीं आल्हाद झाला मना ॥
दृष्टी ये, मधले तिचे स्तनगळे, झाली सुधी पाठ ती ।
तो सर्वत्रच कां न होय विजयी ? ज्या साऽनुकूला रती ॥२६॥
दर्बारीं शिरुनी सभाग्य जन, दे राजाचिया श्रीमुखीं, ।
पाडी तन्मुकुटास; त्यांतुनि निघे. तों सर्प बाहेर कीं. ॥
प्राणा वांचविलें, ह्मणूनि नृप त्या दे अर्ध राज्याप्रती ।
सांगे के. स. रि. कां न होय विजयी? ज्या साऽनुकूला रती ॥२७॥

---

१० वज्र. ११ हिंदुस्थानचें राज्य.

# परोपकार.

## श्लोक.

(शार्दूलविक्रीडित वृत)

ज्या आवश्यकता असे गरज ही कोण्या पदार्थाविशीं, ।
घ्याया प्राप्ति करूनि तो[1] परि जरा ना शक्ति त्याला तशी ॥
ऐशा आर्त गरीब दीन गरजू दुःखी जना आश्रया ।
देणें, यास परोपकार ह्मणणें. ना पार त्याच्या श्रया ॥१॥
कोणी नाहिंच भाग्यवान् जन असा, जो संकटीं ना पडे. ।
संसारांत कितीक त्या अडचणी वाढूनि येती पुढें. ॥
दृष्टीला पडतांच लोक ह्मणती, ज्या आदरें "या बसा," ।
दैवें होउनि दीन तोहि पसरी अन्याऽऽश्रयाला पसा. ॥२॥

( शिखरणी. )

विपत्कालीं ऐशा इतर सुजनीं दुःखित जनां ।
स्वसामर्थ्यें साह्या करुनि, सुखवावें तनु-मना. ॥
पराच्या दुःखातें हरण करण्या शक्ति असली, ।
न पुण्याची अन्या हिजहुनि जगीं जोड कसली ॥३॥

( मालिनीवृत्त )

कळकळ निजचित्तीं वागवूनी प्रमोदें, ।
सकरुण जन-हाका मारितां, शीघ्र ओ दे. ॥
धन बल गुण तद्वी ज्ञान विद्यादि सारें. ।
क्षितिवरि तरि होतीं धन्य. अन्योपकारें. ॥४॥
पसरुनि कर दीनें याचना द्वारिं केल्या, ।
धन कण धनिकानें; अन्न सर्वीं भुकेल्या; ॥

---

१ पदार्थ.

निजकर बुडत्याला पोहेत्यानें[२] पहातां; ।
कळवळुनि समर्थं धीर द्यावा प्रभीता ॥५॥
निज मनिं न सुमार्गा जो विचारास जाणें, ।
झडकरि पथदर्शी[३] त्यास व्हावें सुजाणें[४]; ॥
निजकरिं बलहीना शक्तिमानें धरावें; ।
स्वगृहिं अतिथि आल्या, प्रीतिनें आदरावें ॥६॥

(शार्दूलविक्रीडित वृत्त)

जो पंग्वांऽध लुळा खुळा, जन गदग्रस्त, स्वशक्तीविणें ।
ज्याचें केवळ सर्वथैव इतराधीन स्वताचें जिणें; ॥
द्यावें साह्य तयास ऐपत जशी द्रव्याऽन्नवस्त्रादिकीं. ।
अन्यांच्या, स्वशरीर धन्य धन तें जें लागलें सार्थकीं ॥७॥

(इंद्रावज्रावृत्त)

निःसत्व कार्पास असूनि अंगें, ॥ तो होय यंत्रीं गुणें[५] चक्र-संगें. ॥
धोटा छडी सोसुनि तीव्र मारा, ॥ तो होतसे वस्त्र परोपकारा. ॥८॥
तो धन्य कीं चंदन वृक्ष पाहीं ! ॥ पुष्पें फळें त्या नसतांहि कांहीं, ॥
लोकोपकारार्थ झिजूनि अंगें, ॥ सर्वत्र लोकां सुख दे स्वसंगें. ॥९॥
" अन्योपकारासम, तें न अन्य ॥ लोकीं स्वकर्मोचित धर्म पुण्य. " ॥
ऐशी वदे वेदहि शास्त्र-वाणी. ॥ राहो तियेची स्वमनीं शिराणी ॥१०॥

(वसंततिलका वृत्त)

सारांश होइल करीं, तितुकें करोनि, ।
आर्ता जनां सुखविण्यास परस्परांनीं ॥
द्यावें स्वसाह्य निज शक्त्यनुसार ओघें. ।
त्या धन्यता ! ! श्रम परोपकृतीस जो घे ॥११॥

---

२ पोहणारानें. ३ वाटाड्या ह्मणजे गुरु. ४ ज्ञात्यानें. ५ तंतु म्ह० धागा.

( शिखरिणी वृत्त )

करावीं हीं कामें परि बहु विचारें निशिदिनीं. ।
स्वकीया दानानें किमपि न घडो आळस जनीं; ॥
स्वदानें ना वाढो व्यसन अथवा दुर्गुण कदा; ।
स्वदानें भोगावी अडचणहि कोणीं न विपदा. ॥१२॥

निरुद्योगी, किंवा तरुण जन, निर्विद्य, अळशी, ।
अशांला द्रव्याची मदत करितांही अमळशी, ॥
तयांचा वाढोनी अधिक जगतीं आळस, पहा ।
कुमार्गीं जाती. हें खचित घडतें पातक महा ॥१३॥

( मंदाक्रांता )

दुःखार्तांचें निरसुनि खरें दुःख जें तें स्वदानीं, ।
त्याची त्याला जतन करण्या शक्ति यावी निदानीं. ॥
दानीं द्रव्यादिक कधिं नये वेंचु जें न स्वताचें ।
देणें द्यावें स्वकारिं असल्या, चाळवूं ने[६] स्त्रवाचें ॥१४॥

( वसंततिलका )

ज्या जें असेल अनुकूल, तया प्रकारीं ।
व्हावें सुतत्पर नरें इतरोपकारीं. ॥
विद्या-धनें, तनु-मनें, वचनें, कितीकीं ।
ठेवीयलें सुचिर कीर्तिहि नाम लोकीं ॥१५॥

देवालयें जनगृहें कितिकीं अचाट ।
वापी तलाव जल-कूप नद्यांस घाट, ॥
बांधूनि, घालुनिहि ठेविलि अन्नसत्रें. ।
वर्षाशनार्थ दिधलीं लिहुनी सुपत्रें ॥१६॥

---

६ नये. ७ सनदा.

धन्याच राज्ञि अहल्या पुर इंदुराची ! ! ।
राजे बहादर हि विठ्ठल सुंदराची ॥
गाजे सुकीर्ति. ह्मणती मुलखांत चारी ।
दामाजिपंत पुरुषैक परोपकारी ॥ १७॥

ना द्रव्य शक्ति, नृपशक्तिहि ना, ह्मणोनी ।
केली स्ववाचिक कृपा कवि सज्जनांनीं. ॥
तद्ग्रंथ तारक जगास अखंड होती. ।
तन्नाम कीर्ति अजराऽमर लोक हो ती. ॥१८॥

श्री व्यास वाल्मिकि गुणाढ्य मुकुंदराव ।
श्री ज्ञानदेव तुकया कवि नामदेव ॥
श्री एकनाथ, जग-सद्गुरु रामदास ।
ज्ञानें स्वयें तरुनि, उद्धरिती जगास ॥१९॥

श्री कालिदास भवभूति कवि-प्रशूर ।
बाणाऽख्य भर्तृहरि दीक्षित चंपुकार ॥
मुक्तेश पंडित महीपति पंत जोशी ।
तोषूनि आपणाहि, तोषविती जगाशीं ॥२०॥

लोलिंबराज गुरु भास्कर भूर्खवेत्ते ।
वेदांतविद्गुरु पतंजलि पाणिनी ते ॥
वाग्भट्टही चरक सुश्रुत वैद्य जे ते ।
जाणूनि आपणहि, जाणविती जगातें ॥२१॥

ज्यांहीं जगावरि करूनि परोपकारा ।
सत्कीर्तिचा सकल वाजविला नगारा, ॥
या साधुसंतकविसज्जन-पादपद्मां ।
वंदूनि, के. स. रि. भजे प्रभु सौख्य-सद्मां ॥२२॥

---

८ प्रख्यात. ९ भूगोल खगोलवेत्ते.

# मित्रत्व.

—※—

॥ श्लोक. ॥

( शार्दूलविक्रीडितवृत्त )

प्रेमास्था, ममता, तसा कळवळा अन्योन्य चित्तांतरीं; ।
कांहीं लाभ नसोनि, झीज समयीं येतां, न भीती तरी; ॥
एका जें सुख, दुःख, तें चि दुसऱ्या हो; एकमेकांसि जे ।
देती; साह्य जन स्वयें तनु धनें; मित्रत्व त्या बोलिजे ॥ १ ॥

( वसंततिलकावृत्त. )

मित्रासि जो कळवळा, न तसाहि भावीं. ।
जो देह भिन्न, परि जीवित एक भावी. ॥
होऊनि यापरि अखंड अभेदभावी, ।
माझी ह्मणे, स्थिति अशीच सदां निभावी. ॥२॥

द्वारीं, घरीं, जवळ, दूर, ऋतूंत साहीं, ।
मित्रापशीं सकल लक्ष्य निशीं दिसांही; ॥
होकासुयंत्र[2]तकटावरची शलाका[3] ।
पाही दिगुत्तरच[4] एक जशी. विलोका ॥ ३ ॥

तत्काल उज्वलित दीपक होय तैलें, ।
त्या स्नेह नाम ह्मणुनी जग सर्व बोले. ॥
दे नित्य रव्युदय तो कमला विकास; ।
यालागिं त्यास वदती जन मित्र खास. ॥ ४ ॥

बाहेर एक, न दुजा हृदयांत रंग; ।
मित्राविशीं सरळ, निर्मळ अंतरंग; ॥

१ मानतो. २ होकायंत्रांतील तबकडीवरील. ३ कांटा. ४ एक उत्तर दिशाच

कोणी मनीं भरवितां भलता तरंग, ।
त्या देतसे उडवुनी बनुनी सुरंगें. ॥ ५ ॥
मित्राविशीं कपटभाव, न वंचना ते; ।
चित्तीं भजे प्रियतमाहि अकिंचनांतें; ॥
पावेहि राजपदवी जरि, सौंगडी तो ।
मित्रा विलोकुनिच ताजिम दे खडी तो. ॥ ६ ॥
अत्यल्प कीं नजरभेटिस देउं भारी, ।
सन्मित्र-दर्शन मना तरि दे उभारी. ॥
ये सागरास भरती उडुपोदयीं, ती ।
प्रेमा-ऽश्रु-लोट सख भेटिंत तेंवि येती ॥ ७ ॥
मित्रें दिले जरिहि आणुनि अल्प पोहे, ।
वाटूनि गोड, बहु सौख्यनदींत पोहे. ॥
द्वारावतींत जयिं जायचि तो सुदामा, ।
हें सच्चरित्र घडलें सख कृष्णधामा. ॥ ८ ॥
आहेस मूर्ख जरि मित्र ह्मणेल कीं तूं, ।
सद्भाव त्या कळविण्यास गमे न किंतू. ॥
होईल तों करुनि देइल हेतु-सिद्धी. ।
कृष्णें दिली बहिणं जिष्णुस हे प्रसिद्धी. ॥ ९ ॥
मित्रें जरीहि अपराध अनेक केले, ।
सप्रेम मानस तयाविषयीं भुकेलें. ॥
मित्राहुनी प्रिय गमे न निजांगनाही. ।
प्रेमीं परस्पर कधीं लव भंग नाहीं. ॥ १० ॥

---

५ सुरुंग, ६ निर्धनातें. ७ देवो. ८ चंद्रोदयीं. ९ शंका. १० सुभद्रा नामें बहीण.

घे कर्ण काढुनि गळ्यांतुनि रत्नहार, ।
क्रोधावली ह्मणुनि भानुमती[11] अपार. ॥
वाटूनि साकर सुयोधन तीस बोले, ।
तूं राहिलीस, मम भाग्य खरें उदेलें. ॥ ११ ॥
मोठाहि लाभ जरि मित्र-वियोग-काळीं, ।
झाला, तथापि करितो हृदयीं कहाली. ॥
तान्हाजिचे निधनिचीं[12] शिवराजवाणी, ।
"जा सिंह, येगड, गमे मज मृत्युवाणी[13]." ॥ १२ ॥
तो स्नेह, कीं न कधिं सांडुनि मित्र-संगा ।
दे धैर्य, साह्य, झट संकटशा प्रसंगा. ॥
"धांवे," अशी सख न संकटहाक देवो, ।
तत्साह्यतेस तरि धांवुनि शीघ्र दे ओ ॥ १३ ॥
स्नेहाचिया परम दाखवुनी सिमेला, ।
युद्धीं सुयोधन-हितास्तव कर्ण मेला. ॥
स्नेहें फसल्कर[14], व मालुसरे[15], व येसू[16], ।
झाले त्रिवर्ग शिवरायहितीं गतांऽसू[17] ॥ १४ ॥
ऐसे सुमित्र जगतीं परि फार थोडे. ।
बाकी जणो जिलिबिचेच सुरम्य घोडे. ॥
त्यांच्या मुखीं जंव असे भर-तोबराहो[18], ।
खिंखाळती वदुनि तों "सख तोबरा हो." ॥ १५ ॥
तंबाखुमित्र दिसतात घरोघराशीं, ।
त्यांच्या परी सकल शुष्क समस्त राशी. ॥
मित्रीं प्रसंग, पळती करुनी चलाखी. ।
सन्मित्र तो निपजतो विरळाच लाखीं ॥ १६ ॥

---

११ दुर्योधनाची बायको. १२ मरणाची. १३ मरणासारखे. १४ बाजीफसल्कर. १५ तानाजी मालुसरे. १६ येसाजी कंक. १७ गतप्राण. १८ भरपूर.

क्षारांश, जोंवरि यथास्थित सोय राही, ।
हे मित्र तोंवरिच बांधव सोयराही. ॥
जाणोनि, के. स. रि. कथी, सम रंकरावा ।
जो, तो अखंडसुख राम सखा करावा ॥ १७ ॥

## षड्रिपुदमनावश्यकता.

### श्लोक.

( शिखरिणी. )

टिळा मुद्रा रेषा वठवुनि कपाळास सगळ्या, ।
गळां माळा, वीणा ; स्वचरण-करीं चाळ चिपळ्या ; ॥
करी घोषें प्रेमें भजन रखुमा विठ्ठल हरी ; ।
प्रधिक् तत्साधुत्वा ! ! जित-षडरि झाला नच तरी ॥ १ ॥
प्रदंभें देव्हारें जमवुनि करी ईश-भजना ; ।
पढे गीता ज्ञानेश्वरि, करितसे बोधहि जनां ; ॥
जपध्यानीं सारा दिवस फिरवी माळहि करीं ; ।
प्रधिक् तत्साधुत्वा ! ! जित-षडरि झाला नच तरी ॥ २ ॥
करी नेमें एकादशिहि शिवरात्री अशयैना ; ।
प्रदोषोपासातें करितहि चतुर्थी-निरशना ; ॥
व्रतें वैकल्येंही करुनि, तनुतें ताप वितरी ; ।
प्रधिक् तन्नेमातें ! ! जित-षडरि झाला नच तरी ॥ ३ ॥
त्रिकाळीं स्नानातें करुनि नियमें नासिक धरी ; ।
सुगायत्री मंत्रा जपुनि उडवी गोमुखि करीं ; ॥
सदां राही वेदाऽध्ययन-रत जो दीर्घ गजरीं ; ।

---

१ अनिद्रिस्ता. २ देतो. ३ प्राणायामें करून.

प्रधिक् तद्विप्रत्वा ! ! जित-षडरि झाला नच तरी ॥ ४ ॥
प्रलेपी सर्वांगीं फटफटितशी राख पहिली ; ।
कसूनी कौपीना कटिं, शिरिं जटा-वेणि धरिली ; ॥
मुखें " **सीताराम** " स्मरुनि, नित तीर्थाऽटण करी ; ।
प्रधिक् तद्वैराग्या ! ! जित-षडरि झाला नच तरी ॥ ५ ॥
शिखा मुंडी, प्रेमें वसन भगवें नेसुनि कटीं, ।
स्वहस्तीं घे दंड, त्यजुनि गृह, बैसे जरि मठीं ; ॥
वसे तीर्थाठायीं मुखिं वदुनि " **नारायण** " " **हरी** " ; ।
प्रधिक् तत्सन्यासा ! ! जित-षडरि झाला नच तरी ॥ ६ ॥
निरिच्छे स्वाऽगार त्यजुनि, विपिनीं लावुनि धुनी, ।
करूनीया मूलाऽशैन वसतसे होउनि मुनी ; ॥
शरीरातें कष्टें झिजवुनि, तृषा भूकहि हरी ; ।
तपातें धिक् त्याच्या ! ! जित-षडरि झाला नच तरी ॥ ७ ॥
गळीं सैली पुंगी धरुनि, विलसे नानक-गणीं ; ।
कुराण-श्रद्धेनें धरुनि फकिरी, घालि कफणी ; ॥
भजे ख्रिस्ता, पोंचे प्रमुख गुरु पॉल-स्थितिंवरी ; ।
प्रधिक् तद्धर्मातें ! ! जित-षडरि झाला नच तरी ॥ ८ ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

धर्म, न्याय, हि नीति, यांविषयिंची श्रद्धा मनीं वासना ; ।
इच्छा, नश्वर अल्प ऐहिक अशा सौख्योपभोगास ना ; ॥
द्रव्य स्त्री अवलोकितां नच जरा पावे मनोव्यग्रता ; ।
ऐशी जी स्थिति, आत्मसंयमन तें कोठें नसे पाहतां ॥ ९ ॥
हिंदु ख्रिस्तिहि यावनीं जन असो, कोण्याहि धर्मांतरी ; ।
जो झाला सुसमर्थ आत्मदमनीं, कोठें असो तो तरी ; ॥

४ अगोदर. ५ कंदमूळांचें सेवन. ६ धर्माध्यक्षांचे अधिकारावर.

वैराग्यें धन धाम त्यास नलगे सोडावया बायको ; ।
सांगे के. स. रि. साधु तोचि समजा. त्या दंभता ती नको ॥ १० ॥

## साधुत्व.

॥ श्लोक ॥

( शिखरिणी वृत्त.)

पर–च्छिद्रा झांकी प्रकटुनि जगीं चांगुलपणा ; ।
प्रमोदें, अन्याच्यां सरसुनि करी वर्धन गुणां ; ॥
परोत्कर्षें हर्षें; बहु परहितीं तोषाचि जया ; ।
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ १ ॥
दयाऽऽर्द्रं चित्तें जो सहज परदुःखें विकळतो ; ।
स्वभावें सर्वांऽशीं अकपटचि गंगा निर्वळ तो ; ॥
रसाळें वाणीनें ह्मणत सकलां आप्तसम "या" ; ।
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ २ ॥
विपत्कालीं धैर्यें अनुदिनिं सुखें वास करितो ; ।
प्रवर्ते सद्धर्में ; नृपपणिं सहिष्णुत्व वरितो ; ॥
धरी, जो सद्विद्यारत असुनि, सर्वत्र विनया ; ।
महात्मा तो ताप–त्रयँ हरुनि, वारी भव-भया ; ॥ ३ ॥
पर–स्त्रीतें मानी जननि ; पर-निंदेस्तव मुका ; ।
न इच्छी अन्यायें पर-धन फुका देखिल रुका ; ॥
असूयाँ, यत्क्रोध, प्रबल मद, ही जाय विलया ; ।
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ४ ॥

१ केवळ. २ सहनशीलता. ३ मत्सर.

जया कोणी दुःख श्रम जरि दिला त्रासहि बहू, ।
स्वभावें सौजन्यें सुपुरुष जसा इक्षु हुबहूँ ; ॥
पिळा घाणीं, अग्नीवरति कढवा, गोडचि र्‍याँ ।
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ५ ॥

उगाळा, कांडाही परिमलचि दे चंदन तरी. ।
तशा रीतीं लोकीं निज सुजनता साधु वितरी ; ॥
करी अद्रोहत्वें सुजन-कुजनींही सम दया ; ।
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ६ ॥

क्षमा शांति स्वांगीं धरुनि, वचनीं एक दृढता, ।
उदारत्वें वेंची स्वधन पर-कार्या पर-हिता ; ॥
पदीं कोणी येतां शरण तरि दे शीघ्र अभया ; ।
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ७ ॥

स्वसंयोगें दे जो सुजन-कुजना आत्म-समता ; ।
सुदुर्गंधत्वा क्षीरीं उदक जणु पावे मिसळतां. ॥
जया पायीं पावे नमन करितां **के. स. रि.** जया ।
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ८ ॥

## प्रामाणिकता.

### श्लोक.

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

केला जो स्वमुखें करार, हि दिला विश्वास एक्या वचें, ।
मोठा लाभ असो, हि हानि, परि त्या स्वप्नीं न टाळायचें. ॥

४ हुबेहुब. ५ चरकांत. ६ रुचि.

ऐसा जो दृढ निश्चय प्रकृतिचा, तो मेरुसा ना ढळे. ।
ही प्रामाणिकता सुकल्पलतिका, दे इच्छिलेलीं फळें ॥ १ ॥

व्यापारीं, व्यवहारिं, बाहिर घरीं, सर्वत्र जी सौख्यदा. ।
ही प्रामाणिकता-लता चहुंकडे विस्तारतां एकदां, ॥
विश्रांतीस्तव लोक धांवुनि तिच्या येतात छायाऽऽश्रमीं. ।
चिंता ताप हरूनि लोक सहजीं होतात ते विश्रमी ॥ २ ॥

ही प्रामाणिकता-लता दृढ, हिची सत्यत्व नामें मुळें ; ।
द्याया हीस विचाररूप जल तें सन्निश्चयाचें अळें ; ॥
सद्विश्वास, गभीरसा-भरंवसा, तुर्म्या हिच्या शोभती ; ।
चित्त-धैर्य फुलें ; सुलौकिक फळें नांवाजतीं या क्षितीं ॥ ३ ॥

स्त्री प्रामाणिकता, हिचें ठळकसें सत्यत्व हें कुंकुम ; ।
कंठीं मंगलसूत्र आत्मयमन प्राणाहुनी कायम ; ॥
त्यालीसे सदसद्विचार वसनें संभूषणें ; इभ्रत ।
मोठी ; नाम-सुकीर्तिरूप अवघें सद्धर्म जीचें व्रत ॥ ४ ॥

ही प्रामाणिकता जिथें वसतसे, तो वंद्य झाला जगा. ।
हीचा दिव्यं, ठकां जनांस दिपवी, सत्यत्व नामें झगा ; ॥
स्वार्थींही अभिलाषबुद्धि न हिला ठाऊकही ना दगा ; ।
प्रेमें वंदुनि लोक हीस ह्मणती, "बाई सुखें नांद गा" ॥५॥

स्त्री प्रामाणिकता सुकोमलतमा हंडी बिलोरी जशी. ।
मोठ्या काळजिनें स्वयेंचि जपुनी संरक्षितां ईजशीं, ॥
भारी काळ टिकोनि मंडण घरा होईल. थोडा धका ।
लागे, जाय फुटूनिही उठुनिया पाही मदीना मका ॥ ६ ॥

स्त्री प्रामाणिकता सुनिश्चय-बळें राहेचि जों कायम, ।
ना तद्धस्त[1] धरूं शके प्रबळही प्रत्यक्ष जो कां यम. ॥

---

1 तिचा हात.

तो सन्निश्चय मात्र अल्प ढळतां बुद्धि भ्रमे एकदां, ।
ना तीची पत राहुनी, भरंवसा कोणाहि ना ये कदां, ॥ ७ ॥
स्वप्नीं, तेंचहि जागृतीं, नृप हरिश्चंद्र स्वयें कौशिका ।
दे राज्या. वॅर[2] दक्षिणेस्तव ह्मणे नेऊनि माला विका. ॥
स्वप्नींच्या वचनाहि जो न ढळला ; पाणीहि डोमा-घरीं ।
वाही ; होइल सत्यतेस्तव न का त्याचा ऋणी श्रीहरी ॥ ८ ॥
"घे. ही भूमि तुला त्रिपाद दिधली." राजा बली बोलतां, ।
आलें त्यास कळूनि कीं बटु न हा. ये श्रीहरी पालथा ॥
घालाया कपटें मला. तरि ह्मणे, जें म्यां दिलें तें दिलें. ।
त्याणें तें मग तोय शीघ्र बटुच्या हातावरी सोडिलें ॥ ९ ॥
राखाया वचन श्रियाळ नृप तो, कांहीं दुजी योजना ।
ना योजूनि, सुतेंक तोचि अतिथा मारूनि दे भोजना. ॥
शक्रिद्रा, निज कुंडलांहि कवचा स्वांगीय दुर्भेद्यशा[3] ।
देई काढुनि, अंगरॅाज[4] वचनें. झाली जरी दुर्दशा ॥ १० ॥
पुण्यात्मा नृप यौवनाश्व, निज ती रक्षावया वाच्यता, ।
देई कर्वतुनी स्वदेह सुमनें अर्पावया अच्युता. ॥
श्रीरामा कुमरा नृपें दशरथें घोरीं वनीं धाडिलें. ।
राखूनी वचन प्रमाण, सुख त्या स्त्री कैकयीला दिलें ॥ ११ ॥
पाठीं श्येन, पुढें कपोत पळतां जीवा-भयें भागला, ।
येऊनी शिबिराय-पाय धरितां, तों बोलला मागला, ॥
"दे मद्भक्ष्य, नृपा उरस्थचि तुझें तद्भॉर[5] दे मांस किं[6]." ।
रक्षाया स्ववच त्वरें मग उरीं राजा सुरी भोंसकी ॥ १२ ॥
चांदीचे गट ठेव एकजण तो ठेऊनि गेल्यावरी, ।
ये तत्पौत्रचि मागण्यास मग ते पन्नास संवत्सरीं. ॥

---

२ वरच्या. ३ भेदण्यास कठीण अशा. ४ कर्ण. ५ त्याच्या भारंभार. ६ किंवा.

पेढीचा धनि साहुकार परिसा त्या चीन देशांतला, ।
तत्पौत्रें झट ते दिले गट तया. तो सत्यवर्ती भला ॥ १३ ॥
रक्षाया वच, सत्य-निष्ठ जन, तो राही सदा सादर. ।
घे. ये मृत्युहि सत्यतेस्तव जरी, ना सत्य-दासा दर. ॥
आशीर्भाषण आपलें, निज दुजी व्हाया प्रतिज्ञा खरी, ॥
भीष्म स्वाँ शरपंजरीं खिळुनि घे युद्धीं शिखंडी-करीं ॥ १४ ॥
होवो जीवित-सौख्य-हानि, न मिळो कांहीं जरा खावया, ।
माहात्में जन सर्वथैव झटती सत्यत्व राखावया. ॥
त्यांनीं ईश्वर आपला ह्मणविला सन्निश्चयाच्या बळें. ।
गर्जे के. स. रि. वृक्ष जो जतविला त्यां प्राप्त होतीं फळें ॥१७॥

# ऐक्य व देशाभिमान.

॥ श्लोक ॥

( स्रग्धरा वृत्त. )

एका चित्तें विचारें झटुनि निजगृह ग्राम वा देश-काजीं ।
सर्वांनीं प्रेमभावें निशिदिन झटणें ठेवुनी चित्त राजी; ॥
एकानें काम केलें, अहित हित असो, मान्य तें एकमेकीं; ।
यालागी ऐक्य लोकीं बुधजन वदती, बोलतां अन्य एकी ॥१॥

( वसंततिलका वृत्त. )

त्यां काय ऐक्य-महिमा स्वमुखें कथावा ! ।
होईल तो स्वमननें सकळांस ठावा. ॥
येणें सुराऽसुराहि मानव जिंकिले कीं. ।
द्रोणाद्रि, मर्कट तरी उपटूनि फेंकी ॥ २ ॥

७ स्वतांस. १ सामान्यजन.

पावेल तो जडे[२] पदार्थहि एकतेतें, ।
जें ना घडेल, तरि कार्य करील तें तें. ॥
निर्जीव, हलक, तरी तृण एक होतां, ।
तद्रज्जु बद्ध करि मत्त करी[३] पहातां ॥ ३ ॥
निर्जीव बाष्प अति सूक्ष्म, सुलोचनांहीं ।
तो ना दिसे, प्रबलताहि मनांत नाहीं. ॥
एकत्र तोच करितां नलिका-सुयंत्रीं, ।
कार्यें[४] विशाल घडवी, दिसतात नेत्रीं ॥ ४ ॥
वाराहि ज्यास उडवी, बहु अग्नि-भीरू, ।
यंत्रांत तोच जरि घालुनि दाबिला रू, ॥
जाळावयास नंच शक्य हुताश त्या हो[?] ।
कोणा रिघाव न. जये स्थळिं एकता हो ॥ ५ ॥
प्राणी करील मग ऐक्य जर स्वभावें, ।
शेषें[५] न कां डळमळून तयास भ्यावें ? ॥
एकततेकरुनि टोळ किडे कसे ते ? ।
खाऊनि फस्त करिती घटकेंत शेतें ॥ ६ ॥
एकत्रतेकरुनि सान पिपीलिकाही ।
नेती बिळां सहज ओढुनिया महोऽहीं. ॥
क्षुद्र प्रवाल-जल-कीटक एक नेटें, ।
मोठीं अशीं विरचिती जलधींत बेटें ॥ ७ ॥
मोठी शिकार करणार बलाढ्य कुत्रा ।
जातां अळींत परक्या, लुकंडींच सत्रा ॥
एकत्र शीघ्र मिळुनी कुतरीं, प्रयास ।
ना लागतां, करुनि सोडिति दीन त्यास ॥ ८ ॥

२ निर्जीव. ३ हत्ती. ४ आगगाडी व आगबोट आदिकरून. ५ महान् सर्प.

( मंदाक्रांता वृत्त. )

मोठीं कार्यें नवलद अशीं, क्षुद्र जीवांकडोनी ।
एकोप्यानें सहज जगतीं सत्य येती घडोनी. ॥
झाला, ज्ञानी मनुज मग तो प्राप्त ऐक्य–स्थितीला, ॥
कां नां एके धरुनि कवेंळीं हालवील क्षितीला ? ॥ ९ ॥

एकोप्याची सतत असते फार मोठी उभारी. ।
दाहांचाही कर अवसरीं होय राष्ट्रास भारी ॥
गांठीं थोडा जरिहि खजिना, अल्प सेना, हि वाजी, ।
ऐक्यें जिंकी प्रबल यवना मोंगला श्री शिवाजी ॥ १० ॥
धाम-ग्राम-स्वजन अवघे, त्यांतही देशबंधू, ।
एकोप्यानें वसतिल, तरी आटवीतील सिंधू. ॥
इंग्लंडानें, परिघ असतां अल्पसा, एकचित्तें ।
मोठ्या ऐशा सहज सकळां जिंकिलें स्वर्णभूतें ॥ ११ ॥

( वसंततिलका वृत्त. )

देशांत ज्या करि निरंतर वास एकी, ।
ऐकूं तिथें कुलह वैर कधीं न ये कीं. ॥
लक्ष्मी-विलास-सुख-सद्मचि तो प्रदेश ।
होवोनि, त्यांत न वसेच विपत्ति-लेश ॥ १२ ॥
जें सौख्य दुःख, हि हिताऽहित, देशचें कीं, ।
तें आपलें समजलें जरि जाय लोकीं, ॥
ईर्ष्याऽभिमान चढती तरि ती मिशांची ।
राहूनि, वाण न तयास उरे कशाची ॥ १३ ॥
देशाविशींच अभिमान जयां उभारी, ।
त्यांच्या पराक्रम-कलेस. जगीं निवारी ॥

---

६ दोन हातांच्या मधील अंतरांत. ७ हिंदुस्थान देशाला.

ऐसा समर्थ नच होइल अन्य देश, ।
ज्यामाजि मत्सरहि वैर करी प्रवेश ॥ १४ ॥
जेथें समूळ मद मत्सरता विराली, ।
अद्वैतता मग तिथेंच वसूं निघाली. ॥
देशीं अशा सतत रात्रति ऋद्धि सिद्धी.
तत्पाद के. स. रि. ह्मणे जग सर्व वंदी ॥ १५ ॥

## धैर्य.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

या लोकीं व्यवहार लोक करितां नानाप्रकारें, किती
होती प्राप्त [1]सुसंकटें अडचणी. त्यांची न ठावी गती. ॥
ऐशा दुःसमयास अस्थिरपणा होऊं न देतां मना, ।
तद्दूरीकरणार्थ मात्र झटणें; धारिष्ट त्यातें ह्मणा ॥ १ ॥
कोणी नाहिंच भाग्यवान् जन असा, आयुष्य--काळीं जया ।
दुःखाऽरिष्ट अपाय विघ्न नुपजे, पावेहि ना जो भया. ॥
धर्माऽचार विचार सावधपणा यांहीं जगीं वागतां, ।
दुर्दैवें जन तोहि हाल समयीं भोगी विपत्ति स्वतां ॥ २ ॥
हत्तीचा बसणार तो घसरुनी संरक्षणा धांव घे; ।
खाणारा घृत साकरेस [2]नितें, तो भिक्षार्थ दारीं रिघे; ॥
सन्मानें मुजरा करूनि दिपती ज्याच्या स्वतेजापुढें ।
सारे लोक; असाहि थोर जन जो, कारागृहीं तो पडे ॥ ३ ॥

---

१ महत्संकटें. २ नित्य.

होवो प्राप्त विपत्प्रसंग, रिपुच्या हातीं पडूं सर्वथा ; ।
किंवा संकट ओढवोहि कसलें; इत्यादि वेळीं वृथा ॥
चित्तीं घाबरतां न, निश्चळमना राखूनि, योजूं जरी ।
योग्योपाय, अपाय-नाशन तरी होईल हो सत्वरीं ॥ ४ ॥
राज्यभ्रष्ठ करूनि कौरवनृपें कुंती-सुतां धाडिलें ।
कांतारीं[३] भटकावया, परि न तद्धारिष्ट झालें ढिलें. ॥
सोसूनी बहु दुःख, घाबरुनि ना, श्रीकृष्ण केला सखा. ।
वैरी मर्दुनि सर्व, पांडव पुन्हां घेती स्वसम्पत्सुखा[४] ॥ ५ ॥
दारिद्र्यें अति पीडला, हि खटला मोठा जयाच्या घरीं, ।
धैर्य स्थैर्य सुदामजी परि धरी; राखी मुखीं श्रीहरी. ॥
पोह्यांची मग वानगी निजमनें योजूनि, कृष्णा दिली. ।
धामीं ये परतूनि, तों सकलही संपत्ति त्या लाभली ॥ ६ ॥
आधीं तो[५] वन-वास, त्यांत ललना सीताहि लंकेश्वरें ।
नेली चोरुनि, राम लक्ष्मण परी दोघे धिराचे खरे. ॥
साह्या योजुनि वानरें वनचरें, जाऊनि लंकापुरीं, ।
रामें राक्षस मारुनी, स्ववनिता ती आणिली सुंदरी ॥ ७ ॥
अफ्झुल्खान महान वीर हरिसा धांवूनि येतां वरी, ।
चित्तीं घाबरतां न, युक्ति बरवी योजी शिवाजी पुरी. ॥
धैर्यें घेउनि भेट, वृत्ति शशैसी[६] दावूनि सल्लक्षणीं, ।
पोटीं वाघनखास रोंवुनि[७] दिला खानास मृत्यु क्षणीं ॥ ८ ॥
कापट्यें अटकेंत ठेवुनि दिलें औरंगजेबें, तरी ।
धैर्यें राय शिवाजि ना डगमगे, ना घाबरे अंतरीं. ॥
“ आहें मी दुखणेंकरी ” मिष करी; योजूनि युक्ति त्वरीं, ।
गेला तो वर पाहराहि असतां “ देऊनि हातीं तुरी ” ॥ ९ ॥

३ वनांत. ४ राज्यसंपत्तिच्या सुखास. ५ सशाप्रमाणें. ६ दीनशायोग्यलक्षणान ७ न समजूं देतां पेटाऱ्यांत निजून.

दादासायत्त पेशवा सचमु तो, राज्ञी अहल्येवरी ।
जातां चालुनि दत्तकप्रकरणीं, तीही सुधीरा पुरी. ॥
राहोनी समरीं उभी मग वदे, "दादा, फिरा मार्गुतीं. ।
स्त्री-हस्तें स्वपराभवास घडतां, होईल ना सद्गती" ॥ १० ॥
किल्ला वेढुनि शत्रुनें तळ दिला, सेनाहि सामुग्रि ना, ।
अंगीं धैर्य परंतु राखुनि, करी तत्स्वामिनी योजना. ॥
केळीचीं दहिं-भात चोपडुनि तीं पानें सहस्रावधी ।
फेंकी बाहिर नित्य; हें बघुनिया वैरी पळे तो कुधी ॥ ११ ॥
सैन्यीं विस्खळ जाहला बहु, तरी युद्धांगणीं गोखले ।
बापूंनीं स्वपराक्रमें रिपु-गणा धैर्यें त्वरें रोखलें. ॥
"थांबा, धीर धरा जरा" विनवितां ऐशा रितीं पुष्कळ, ।
बाजीराव सुटूनि धैर्य पळ ना लागूनि काढी पळ ॥ १२ ॥
शस्त्री काय करील युद्ध रणिं जो सोडूनि धैर्यास भी ? ।
वक्ता काय करील धैर्य सुटतां पांडित्य विद्वत्सभीं ? ॥
अभ्यासीं खचुं दे उमेद जन, तद्विद्या कशाची पुरी ? ।
तो संसार कसा करिल, नच जो धैर्य प्रसंगीं धरी ? ॥ १३ ॥
व्यापारीं मिळवील काय धन जो तोटीं उमेद त्यजी ? ।
सोडी हिंमत संकटीं, जन कसा सांरील ती काळजी ? ॥
उद्योगीं फसल्या उमेद न धरी, त्या फायदा कायसा ? ।
तापूनी उकळी न येईल, तरी कैंची रूची पायसा ? ॥ १४ ॥
टोलेजंग महाल धीर सुटतां मातीं मिळे जाउनी. ॥
कांहीं नाहींच वस्तु थोर जगतीं सारांश धैर्याहुनी. ।
धैर्यें राखुनि बुद्धि कायम जरी योजी सुयुक्ती खरी. ।
तो टाळील सुसंकटास. कथितो हें निश्चयें के. स. री. ॥ १५ ॥

---

८ मागें. ९ किल्यांत धान्य व सैन्य पुष्कळ आहेसें जाणून. १० दाणादाण
११ दूर करी.

# शौर्य.

## श्लोक.

(शार्दूलविक्रीडित वृत).

कोठेंही कसला प्रसंग असला, नाहीं परी कांचला; ।
आल्याही परचक्र, त्यावर ह्मणे, धांवा क्षणीं या चला; ॥
जिंकूनी स्वपराक्रमें रिपु, शिरीं खोंवी यशाचा तुरा; ।
ऐशा शूरकृतीस शौर्य ह्मणिजे. शूरत्व किंवा नरा ॥ १ ॥

प्रत्येकीं न तरी, जरी निपजतीं मोत्यें गजाचे शिरीं, ।
ना पाटीर[1] वनोवनीं निपजतो, तत्स्थान मैलागिरी. ॥
तैसा सर्व जनांत शौर्य गुण हा कोठें नसे ऐकिला. ।
ऐसा जो रण-धीर शूर जन, तो लाखामधें एकला ॥ २ ॥

शूरत्वास न जातिभेद, सहजीं कोण्या स्थळीं तें वसे. ।
जैसें तें पुरुषामधें वसतसे, तैसें स्त्रियींही वसे. ॥
दीर्घाभ्यास नको, कवाइत नको, शौर्या नको घोंकणी. ।
तज्जात्यंकुर हा क्षणांत उमटे, वाढेहि एके क्षणीं ॥ ३ ॥

शूराला न तहान भूक समयीं; निद्राहि ज्या ना पुरी; ।
ज्वारीचीं कणसेंहि खाय समयीं चोळूनि हातावरी; ॥
त्या विश्रांति विलास भोग ललना क्रीडा सुखो[2]ऽऽराम ना; ।
शस्त्रास्त्रें धन सैन्य देश जय हा सद्ध्यास सारा मना ॥ ४ ॥

राजेखां, दरबारखां, वजिरखां, शौर्यास खा खा नसे; ।
फत्तेशिंग, नृशिंग, शिंग, न कुठें शौर्यास नाकीं दिसे; ॥
भालेराव, जयाजिराव, हि नको शौर्या नको रावता[3]; ।
एखाद्याहि वसोनि तें धनगरीं, तो होय जोरावता ॥ ५ ॥

---

१ चंदन वृक्ष. २ सुखबाग. ३ रावपणा.

राजाऽन्याय, अधर्म, दंड, जुलमी शिक्षा, तसा कायदा, ।
सोशी शौर्य न. देशचा मग करायाला स्वयें फायदा ॥
बांधी कंबर, एकदांच उसळे, शौर्या नसे वायदा. ।
शत्रु-ध्वंस करी. न भी, जरि धका पोंचेहि जीवा यदा ॥ ६ ॥

जातीर्षा, निज देशचा कळवळा, धर्माभिमान स्वतां, ।
कार्यी धैर्य, विचार, सावधपणा, सद्दक्षता, शीघ्रता, ॥
कापट्याऽरि-पराजयीं, निजजनीं द्रव्यव्ययोदारता, ।
ऐशा शूर–गृहीं वसेलचि रमा स्वीकारुनी दारता ॥ ७ ॥

शौर्याचे सुविचार, कृत्रिमपणा, धारिष्ट, मंत्री तिघे. ।
तत्तंत्रे स्थिति काल पाहुनि, जरी युद्धार्थ तें धांव घे. ॥
त्या स्वप्नींहि अपेश लेश न शिवे. तात्पर्य, त्याचे गळां ।
राज्य-श्री निज माळ घालुनि, तया राहूं न दे वेगळा ॥ ८ ॥

ऐसे शूर किती प्रसिद्ध असती **श्री**मन्महाभारतीं. ।
सद्ग्रंथीं कथिली असेच कविंनीं जी मंडळी शूर ती. ॥
तीं प्राचीन कथानकें न पटतीं चित्तीं जनां सांप्रतीं. ।
यांसाठीं इतिहास-वर्णित अशी देतों जरा माहिती ॥ ९ ॥

अर्वाचीन जगत्प्रसिद्ध असल्या गोष्टींत लोकां रुची. ।
बाजारांतिल अंजिरांहुनि वरीं तीं उंबरें दारचीं. ॥
जाणोनी व्यवहार हाचि, सुमनें जाई, जुई, केतकी, ।
देतों, घ्या पुरवूनि तत्परिमलें चित्तांतला हेत कीं ॥ १० ॥

झाली भू सकला आविंधमय ही हिंदूस थारा नुरे ; ।
झाले ब्राह्मण दीन, गो-वध घडे, धर्म स्वचित्तीं झुरे ; ॥
या ऐशा समयीं जिचें जनन हो[५] त्या भोंसल्याचे कुलीं, ।
शौर्ये ती शिशुमूर्ति ठाकुनि करां म्लेंच्छीं उभी ठाकली ॥ ११ ॥

४ स्त्रीत्व. ५ झालें: ० शत्रूच्या पराजयाविषयीं कापट्य.

सोळावें वय वर्ष आणिक जया राजी न ज्याचा पिता, ।
झाला तो यवनांस, शूर मुलगा शौर्यें त्वरें चापिता. ॥
संपादूनि सुराष्ट्र विक्रम-बळें गादी नवी स्थापिली. ।
ऐसा तो शिवराज, राज्य करुनी रक्षी प्रजा आपली. ॥१२॥
झालें शूरच राजमंडळ पहा त्या पेशव्याचे कुळीं. ।
त्यांनीं भूमि पराक्रमेंच अटकेपर्यंत ती रोंखिली[६]. ॥
बाजीराव सुयोध धीट पहिला, तत्सूनु दादाहि हा ।
शौरी[७] केवळ माधवद्वय[८] जणो भीमाऽभिमन्यू पहा. ॥ १३ ॥
ज्याचें जें गुण-तेज, तें प्रकटल्यावांचूनि राहीच ना. ।
कोणालाहि कधींच दीप, "कळवा मद्दीप्ति" हें याचिना. ॥
विंचू होय लहान, कां तरि करी दंशें न कासाविशी ? ।
तैसा शूर जगीं स्वयें प्रकटतो जन्मूनि मातें-कुशीं. ॥ १४ ॥
लार्ड क्लैव शिपाइ शूर सहजीं व्यापार धंद्यामिसें ।
हिंदुस्थान-धरेस ये. चहुंकडे सम्पत्ति त्याला दिसे. ॥
योजी धैर्य विचार शौर्यहि नृपां भासूनि मिष्टें वचें, ।
दोघीं भांडण लावुनी करुनि घे कल्याण इंग्लंदचें ॥ १५ ॥
गर्वें ये रघुनाथराव चढुनी इंदूर-धानीवरी, ।
शूरा धैर्यवतीच तोथिल परी राज्ञी अहल्या पुरी. ॥
युद्धालागि ससैन्य येउनि रणीं घे शत्रुचा सामना. ।
दादा पाहुनि हें त्वरें परतला वाटूनि लज्जा मना ॥ १६ ॥
शौर्यें जो इतिहास-वर्णित, अशा त्या गोखल्या बापुला ।
वासोटा लढतांचि, तेलिण ह्मणे "रे वाह्मना आपला ॥
कांसोटा घट घाल, हा बघ तुझ्या आलाच सोटा शिरीं." ।
हें बापू परिसूनि भाषण तिचें, सोडी रुंहा[९] सत्वरीं ॥ १७ ॥

६ कायम केली. ७ कृष्ण. ८ थोरले व सवाइ माधवराव हे चुलते पुतणे. ९ पंतप्रातिनिधीची ठेविलेली राख. १० पिच्छाला.

झाला शूर-समूह जो अलिकडे त्यांतूनि ही वानगी ।
थोडीशी दिधली, जनांस सहसा वाटेल ना वावगी. ॥
बाकी मंडळ तें दिसे चहुंकडे शेंदाड वीराख्य जें, ।
तच्छौर्य-स्थितिचें रहस्य कथितों तें पाहिलें पाहिजे. ॥ १८ ॥
बोले, कोण बलाढ्य शूर मजसा ? सांगे अगे बाइले ! ।
माझ्यां शौर्य-गुणांस, नित्य दळितां त्वां पाहिजे गाइलें. ॥
उत्रंडी तरि काढ, खेळु मज दे पट्टा, स्फुरे बाहु हा. ।
भौंरी[11] मी तरि एकटाच समयीं, चालुनि आले दहा. ॥ १९ ॥
ऐसे शूर घरोघरींहि दिसती. ते बायकोचे बळी. ।
झाल्या बंदुकबार एक, कटिची कंपें सुटे धाबळी. ॥
रातीं सोबत बायकोस उठवी लघ्वीस जातां घरीं. ।
केल्या गुर्रहि मांजरीं धडक, ती राहे भरूनी उरीं. ॥ २० ॥
ऐसे हे तिसमारखां निशिदिनीं पांचां हत्यारांसवें. ।
त्यांची अक्कड, पेहराव कडवा, हें मात्र कीं पाहवें. ॥
बाकी शौर्य ह्मणून शून्य. पडल्या कांहीं तया सांकडें, ।
लावें बारगिरास या घडतसे वस्त्रींच पर्साकडे ॥ २१ ॥
शौर्याचे असतीच काय वसले वाडे जगा भीतरीं ? ।
तें कोठें विरला असेल सहजीं, लाखांत एके नरीं. ॥
तें त्रेतायुगिं एक वेळ दिसलें त्यांही रिशीं वानरीं. ।
[12]गर्जे के. स. रि. एक शूर [13]हरि तो कीं व्याघ्र कीं केसरी. ॥२२॥

## कृतघ्नता.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

जाणोनी न कृतोपकार सहसा, संरक्षका, पालका, ।

११ जड. १२ सांगे. १३ घोडा.

किंवा स्वाऽऽश्रयदास, कीं स्वसुखदा, कीं आपल्या मालका, ॥
चित्तीं न स्मरुनी, निजाल्पहि हितासाठीं, स्वयें त्यांचिया ।
सर्वस्वासहि होय घातक. न तो राखी कृतघ्न क्रिया ॥ १ ॥

( वसंततिलका वृत्त. )

होऊनि कार्य, सरल्या गरजेस, लोकीं, ।
मूळा कृतघ्न जन तो न कदा विलोकी. ॥
आल्या ह्मणे सहज योग घडूनि साचा. ।
कोठूनि कोण उपकार करी कशाचा ? ॥ २ ॥

पंक्तीं कृतघ्न नित जेवुनि गोड घांसें, ।
मोजील शेवट तया घरचेच वांसे. ॥
आल्या प्रसंगाहि तसा निज पालकाचें ।
कांपावयास्तवाहि मस्तक, तो न कांचे ॥ ३ ॥

वृक्षादनी[1] तरु-रसें निज जीवनांशीं ।
पावूनि, वाढुनि वरी, तरु-जीवें[2] नाशी ॥
तैसा कृतघ्न जन आश्रयदाऽऽश्रयानें[3] ।
वाढूनि, तत्सुखहि कीर्ति सदा लया ने ॥ ४ ॥

आई न बाप, निजबंधु, न सोयराही, ।
ना मित्र, अन्नद, धनीहि, कृतघ्न पाही. ॥
स्वार्थार्थ लोटुनि तयां भय-दुःख-डोहीं, ।
जो न द्रवेल लव. तो जन आरडोही ॥ ५ ॥

ज्यानें कृपें चढविलें बहु वैभवातें, ।
त्या अन्नदा स्वपति गुर्जरदेशपीतें, ॥
वेळेस लोक उलटोनि विपत्ति देती. ।
वार्ता अशी पसरलीच चहूंकडे ती ॥ ६ ॥

---

१ बांडगूळ नामें वृक्षावर पोसणारी लता. २ झाडांचा प्राण. ३ आपल्या आश्रय देणाऱ्याच्या आश्रयानें. ४ गुजराथेचा राजा मल्हाराव त्याला.

जो अन्नद स्वपति मालक सर्व राज्यां, ।
वंदी प्रजा सकल जोडुनिया करां ज्या, ॥
नारायण प्रभु, कृतघ्न सुमेरसिंगें, ।
वाहूनि आण, वधिला निज खड्ग-संगें ॥ ७ ॥
चित्तांत न स्मरुनि सेवक-सेव्य नातें, ।
वेळीं त्यजूनि कितिकीं सुजनीं धन्यातें, ॥
हातें धुळीं मिळविली निज पेशवाई. ।
दांडा कुऱ्हाडितिल काळ कुळास होई ॥ ८ ॥
देऊनि जन्म, करुनी गजही रजाचा, ।
सर्वत्र मान बहु राखियलाहि ज्याचा, ॥
औरंगजेब सुत तो बहुसा कृतघ्न. ।
शाहाजहान जनका करि बंध-मग्न ॥ ९ ॥
ऐसे कृतघ्न जन केवळ भूमि-भार. ।
पाषाण त्याहुनि करी उपयोग फार. ॥
योग्य स्थळींच उपकार तरी करावा ।
हें के. स. रि. कथितसे गुज रंक-रावां ॥ १० ॥

---

## कृतज्ञता.

—✳—

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

केलेला उपकार जाणुनि मनीं, संरक्षका, पालका, ।
किंवा स्वाऽऽश्रयदास, कीं स्वसुखदा, कीं आपल्या मालका, ॥
कायावाङ्मनसा, स्वहानि जरिही, कार्य प्रसंगीं घडे, ।
दे जो साह्य, कृतज्ञ तोच. झडती साचे जगीं चौघडे ॥ १ ॥

( वसंततिलका वृत्त. )

कोण्या परींहि सुजनें उपकार केला, ।
राहे कृतज्ञ जन त्याविषयीं भुकेला. ॥
माता पिता तनय बांधव यांजपेक्षां, ।
त्याची तयास अधिका असते अपेक्षा ॥ २ ॥
झालाचि जो निजहितास्तव साह्यकारी, ।
त्यातें कृतज्ञ समयास न कां विचारी ? ॥
त्याचा स्वयें तनु-धनें उतराइ व्हाया, ।
आल्यास तो न दवडी क्षण संधि वाया ॥ ३ ॥
त्याच्या बऱ्या विषयिंची मनिं एक निष्ठा. ।
त्याच्या सुखास्तव जरी स्थिति ये कनिष्ठा, ॥
तो कोणत्याहि न कथूनि कधीं नडीतें, ।
साह्यार्थ धांवुनिच घालितसे उडीतें ॥ ४ ॥
तद्रक्षणार्थ समयीं सरसोनि अंगीं; ।
प्राणाकडेहि न विलोकितसे प्रसंगीं. ॥
झाल्यास लाभहि, ह्मणे उपकारकाचा[1] ।
आहे विभाग तरि याजमधें सुखाचा ॥ ५ ॥
होती अशा पुरुष जे कृतकार्य[2] रीतीं, ।
ते कां स्वकीय न कुळाप्रति उद्धरीती ? ॥
ऐसे कृतज्ञ विरळा जन ऐकुं येती. ।
त्यांची जगांत कवणा सर हो नये ती ॥ ६ ॥
धर्मादिबंधु, सुतपा[3] जननी पृथा[4] ते ।
आलें कळूनि, तरि कर्ण, मनें वृथा तें ॥
मानूनि, त्या कुरु-नृपा निजपा[5] न सोडी. ।

---

१ आपल्यावर उपकार करण्याचा. २ उतराइ. ३ महातपास्विनी. ४ कुंती. ५ स्वतःचे पालन करणाऱ्यास.

धारा-सुतीर्थी करि मर्ज्जन. कीर्ति जोडी. ॥ ७ ॥
तो धन्य ! ! जो जन कदापि न मूळ सोडी, ।
ना प्राप्त होय जरि एक तया दसोडी. ॥
घालूनि आत्म-तनुजासहि शत्रु-भक्षीं, ।
पँन्ना स्वयें चितुर-राज-सुतास रक्षी ॥ ८ ॥
शिंद्यास दे नजर दिल्लिप नालखीतें. ।
बैसूनि आपण न, ती पति पेशव्यातें[11] ॥
अर्पूनि, तींत बसतां यजमान, हातें ।
शिंदा कृतज्ञ उचली तदुपानहातें[12] ॥ ९ ॥
सैन्यांत सर्वहि फितूर जरी जहाला, ।
स्वामीस " येथुनि जरा " विनवी " न हालां. " ॥
बापू कृतज्ञ सरसावुनि गोखला हो ।
युद्धीं भिडे स्व-प-हितास्तव एकला हो ॥ १० ॥

(शार्दूलविक्रीडित वृत्त)

श्री नारायणराव भूपति धनी-घातार्थ ते गारदी ।
येती चालुनि भोंवतीं मृग-वधा रानीं जसे पारधी. ॥
घाला पाहुनि हा, कृतज्ञ हुजऱ्या चांपाजि, ना आंसवें ।
गाळूनी, स्वधनी धरूनि हृदयीं, मेला तयाच्या सवें ॥ ११ ॥

(वसंततिलका वृत्त)

वेनीसच्या[13] हरितसेच अहंमदातें, ।
त्या धन्यता बहु कृतज्ञ अहंमदातें. ॥

---

६ स्नान. ७ पन्नानामें दाई जिनें आपला मुलगा स्वामीभक्तीकरितां बळी दिला ती. ८ महादजीस. ९ शहाअलमनामा. १० सन्मानदायक राजवाहन विशेष. ११ सवाई माधवराव पेशव्याला. १२ जोड्यातें. १३ एका तुर्क मनुष्याची कृतज्ञता ही पांचव्या पुस्तकांतील गोष्ट वांचा.

आगीं शिरोनि, बहु सोसुनि तीव्र मारा, ।
तो वांचवी स्वपति फ्रान्सिसको-कुमारा. ॥ १२ ॥
उत्तीर्ण या परि जगीं जन जाहला जो, ।
त्यातें विलोकुनि जगत्रय कां न लाजो ? ॥
जन्मूनि धन्य बहु मातृउदरीं प्रजा ती ।
सांगेचि के. स. रि. असो मग तो कुजाती ॥ १३ ॥

## धर्म.

॥ श्लोक ॥

( स्रग्धरा वृत्त. )

ज्या देशीं, ज्याच जातीं, स्वजनन घडलें ज्या कुलीं ; पूर्वजांहीं ।
धर्म स्वीकारिला जो, क्रमपथ, अवध्या पद्धती रीति ज्या ही ; ॥
आचाराऽऽहार पान ग्रहण करियलें; देवता देव कर्म ।
जें जें कां मानिलें ; तें अनुसरुनि जनें वर्तणें, हा स्वधर्म ॥ १ ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

मानूं सत्यच हिंदुधर्म, जनहो, कां यावनी ख्रिस्ति कां, ।
मानूं वेद, कुराण, बायबल, ह्या ग्रंथा, किताबा, बुका, ॥
मानूं राम-रहीम-येशुमधुनी तो कोणता देव कीं ।
ज्याचें त्यासच सर्व पूज्य, दुसरें घेतां घडे ती चुकी ॥ २ ॥
नित्य स्नान असोचि वा बहुदिनीं अंगास सांचो मळ ; ।
सोळें आणि विटाळ कीं बहु बरा सारा गपागोंधळ ; ॥

---

१४ उतराई.

संध्या, देवपुजा, निमाज, अथवा मानूं खरी प्रेयर ; ।
ज्याचें जें कुलकर्म, तेंच करणें. कर्मान्य आपत्कर ॥ ३ ॥
मानूं स्त्रीस रजस्वलाहि अथवा शुद्धांग जाणूंच ती ; ।
मानूं सूतक कीं प्रबंधन करूं दंडास काळ्या सुतीं ; ॥
ब्रह्म, क्षत्रिय, वैश्य, शूद्र समजूं वर्णैक कीं संकर ; ।
ज्याचें जें कुलकर्म, तेंच करणें. कर्मान्य आपत्कर ॥ ४ ॥
मानावीच पवित्र धेनु मनसा, खावेंचि तन्मांस वा ; ।
घ्यावें क्षीरच इक्षु-सार अथवा उन्मादका आसवा ; ॥
राखूं काय, शिखाच केंस अथवा ठेवूंच डोईभर ; ।
ज्याचें जें कुलकर्म, तेंच करणें. कर्मान्य आपत्कर ॥ ५ ॥
पागोटें परिधान धोतर करूं, टोपी विजारीस कां ; ।
नेसाया बरवें स्त्रियांस लुगडें कीं तो झगा नेटका ; ॥
भाळीं कुंकुम चर्चवूं "सुजन" कीं राखूंच तें धूसर ; ।
ज्याचें जें कुलकर्म, तेंच करणें. कर्मान्य आपत्कर ॥ ६ ॥
हातीं लेववुं कंकणें, बहु बरी कीं त्यांस रिक्ता स्थिती ; ।
भूषीं भूषवुं कीं स्त्रिया प्रकटवूं लंकेचिया पार्वती ; ॥
स्वाज्ञीं त्यांप्रति वागवूंच अथवा होऊं तदाज्ञाधर ; ।
ज्याचें जें कुलकर्म, तेंच करणें. कर्मान्य आपत्कर ॥ ७ ॥
लावूं मुंजच देउं बापतिसमा सुंता करूं कीं निशीं ; ।
सोळें नेसुनि जेवणें उचित कीं जाम्यानिम्याचे निशीं ; ॥
बोलूं ईश्वर, गॉड, कीं निजमुखें अल्ला, सबाह्यांतर ; ।
ज्याचें जें कुलकर्म, तेंच करणें. कर्मान्य आपत्कर ॥ ८ ॥

---

१ युरोपियन चालीप्रमाणें काळ्या सुतानें. २ मिश्रण. ३ मद्यास. ४ सोन्याचा विटाळ अशा. ५ आपल्या आज्ञेंत. ६ त्यांची आज्ञा मानणारा. ७ मुसलमान लोकांची सुंता रात्रीं होते.

खालीं बैसुनि कीं मनें सढळशा लघ्वी उभ्यानें करूं; ।
घेऊं मूत्र--विशुद्धतेस जल कीं मृल्लोष्ठ हातीं धरूं; ॥
पाणी, शौचविधीस कागदच कीं घ्यावा खडा, खापर; ।
ज्याचें जें कुलकर्म, तेंच करणें. कर्मान्य आपत्कर ॥ ९ ॥

सारें धर्महि कर्म वर्तन तसे आचार रीत्यादिक, ।
देशोदेशिंहि भिन्न भिन्न असतीं पानाशनोनाधिक, ॥
लोकांची समजूत आणिक जशी देशीय पाणी, हवा, ।
त्यामानें व्यवहार सर्व ठरला. लोकीं न घ्यावा नवा ॥ १० ॥

आहे एक बरा स्वधर्म, दुसरा खोटा, म्हणूं ही चुकी. ।
किंवा तो अमकाच धर्म बरवा, हा आमुचा तुच्छ कीं. ॥
ऐसेंही ह्मणणें न योग्य. करितां धर्माविशीं भांडण, ।
दो पक्षींहि निरींद्र होइल. जसें तें वाळुचें कांडण ॥ ११ ॥

( वसंततिलका. )

जी गोष्ट होइल न सिद्ध कधीं प्रवादें, ।
कुत्साहि तद्दुरभिमान जनांस बाधे. ॥
हा ना विचार करूनी नन आडवाटें ।
जातां तयांस रुपतील न काय कांटे? ॥ १२ ॥

तो ब्रह्म-बीज असुनी स्थिति उत्तमा ती. ।
नेणूनि, विस्मृति करी निज तात मातीं. ॥
लावूनिया निज कुला बहु कालिमा ती, ।
ख्रिस्त्याचिया शिरतसे द्विज तो जमातीं[12] ॥ १३ ॥

सोडूनि जो स्वकरिचें पळत्याचि मागें ।
लागे. असा जन न कां मग भीक मागे? ॥

---

८ मातीचें ढेंकूळ. ९ खाणें पिणें यांचें न्यूनाधिक्य. १० नीरस. ११ निद्रा.
१२ मंडळींत.

ना स्वार्थ आणि परमार्थ घडोनि दोन्ही, ।
होऊनि दीन भटके. न पुसेचि कोणी ॥ १४ ॥
लोकप्रसिद्ध मिळवूनि किताब बाऱ्या, ।
वाही शिरीं भरूनि केंवट[13]-माल-पाट्या ॥
त्र्यांडी सुडे विकुनि बोंबिल मत्स्य अंडीं, ।
पोटा[14] भरी अडकवूनि गळ्यांत बंडी ॥ १५ ॥
विद्वान हे असालिया द्विजराज-बाटे ।
धर्मोपदेश करिती नित रोजबाटे. ॥
" तारील येशु ह्मणती. न रहीम, राम, ।
दावील येशुच तुह्मां प्रभु सौख्य–धाम ॥ १६ ॥
घेऊनि बापतिसमा स्वसुखेंचि बाटा ।
सन्मुक्तिच्या मग तुह्मा दिसतील वाटा. " ॥
लोकां असा कथुनि नित्यचि बोध सारा, ।
दोंहा[15] विसांत करिती अपला गुजारा ॥ १७ ॥
पोटावरी दिनभरी श्रमतां स्वधंदीं, ।
जाई त्वरें उतरुनी मग सर्व धुंदी. ॥
कर्मानुताप घडुनी रडतीच धायें. ।
गेली घडी नच परंतु पुन्हां कदां ये ॥ १८ ॥
ने यापरी विचरती जन अन्य धर्मीं, ।
त्यांच्या असे अवदशा लिहिलीच कर्मीं, ॥
सोसूनि तीव्र जन-वाक्शर नित्य मर्मीं, ।
होती स्वकीय जन पाहुनि फार शर्मी ॥ १९ ॥

(शिखरिणी वृत्त.)

स्वधर्माचा सारा प्रकृत[16] तिटकारा उपजुनी, ।

---

१३ किरकोळीचा माल भरलेल्या पाट्या. १४ चहोंत्यावर. १५ दहावीस रुपये प्राप्तींत. १६ सांप्रतकालीं.

" पुराणें शास्त्रेंही ' जन ह्मणाति ' झालीं बहु जुनीं. ॥
विचाराऽचारांचें उगिंच ऋषिनीं ढोंग जाथिलें. ।
तयांना जें सोळें बहुत रुचलें तेंच कथिलें ॥ २० ॥
स्वतां त्यांनीं मद्या पिउनि, मृगमांसा पचविलें. ।
जनां त्यांची केली अटक, ठक मोठे ऋषि भले. ॥
न जाणो आह्मी तें. बहुत जन अज्ञान पहिले. ।
जरी त्यांनीं केलें ग्रहण ऋषिंनीं जेंच लिहिलें, ॥ २१ ॥
पुराणें झौंडूनी सुकवि-रचिता कल्पित कथा. ।
गमावूं आम्ही त्या श्रवण करुनी वेळ न वृथा. ॥
जगीं रामा, कृष्णा, जन समजती देव. नवल !! ।
कदाचिच्छौर्ये ते असतिलच राजे बहु बल " ॥ २२ ॥
अशा निंदा-वादें अलिकडिल विद्यानिपुण जे, ।
जया मार्गें आले स्वकुल-पितृ आजेहि पणजे. ॥
तया धिःकारूनी, स्वमनिं दृढ वाहूनि शपथ, ।
सदा जात्यैकत्वें ग्रहण करिती नास्तिक पथ ॥ २३ ॥
न जाणे संध्या ही द्विजकुलज तो तर्पण कधीं ! ।
पितृ-श्राद्धा नेणें ! इतर निज कर्मासहि कुधी ! ! ॥
कुतर्कें लोकीं जो सकलहि विटाळास फिटला ।
स्वयें तो सोळ्यातें मग जन विचारील कुठला ! ॥ २४ ॥
अभक्ष्याऽपेयातें ग्रहण करुनी प्राशन करी. ।
प्रमादें वर्ते तो जन बहु जसा मत्तच करी. ॥
प्रभु-स्तोत्रें, गीता, निर्गम बसले होवुनि मुके ।
तिथें लोकीं एकेश्वर पथक तीं गर्जति बुके ॥ २५ ॥

---

१७ सत्र. १८ वेद.

असे चारी वर्णां गुरु असुनि हे ब्राह्मण जरी ।
स्वधर्माऽऽचारातें त्यजितिल अशा दीर्घ गजरीं, ॥
तयांपेक्षां शूद्र-प्रभृति बरवे. जाति-नियमीं ।
ढळे कोणी, त्यातें स्वजन करिती पंक्तित कमी ॥ २६ ॥
असो ज्यांनीं त्यांनीं करुनि निज धर्माचरण तें, ।
प्रभू लागीं जावें शरण नमुनी तच्चरण ते. ॥
मिळे ज्याच्या स्पर्शें त्वरितचि शिळेलाहि सुगती. ।
न गाया तत्ख्याति श्रुति-मति पुरे. के. स. रि. किती. ॥२७॥

## मद्यपान.

॥ श्लोक. ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त )

तंबाखू, तपकीर, ह्यां जन किती खाती पिती ओढिती ; ।
गांजा, भांग, कितीक घोटुनि पिती ; खाती अफू याकुती ; ॥
जाते गुंगुनि मंडळी पिउनिया कित्येक चंडोल ती ; ।
मद्य प्राशुन झिंगुनी जन किती मार्गांत अंदोलती ॥ १ ॥
लोकीं जीं व्यसनें ह्मणूनि, तितकीं नाहींत कांहीं बरीं. ।
पैसा त्याजमुळें न शेष पदरीं, राहे खिशीं, कंबरीं. ॥
श्लेष्मा वाढुनि, ढांस लागुनि, घसा पिंजे, मुखा वास ये. ।
कैफें झिंगुनि, गुंगुनी विकल ते होतात लोक स्वयें ॥ २ ॥

( प्रहर्षणी वृत्त. )

ह्या सर्वीं, व्यसन परंतु मद्यपान शास्त्रोक्तें बहुत निषिद्ध निंद्यमान. ॥
शास्त्राज्ञा झुगरुनि जो सुरेस प्याला, सेर्वार्थीं सुख रुपयीं न रेसें त्याला ॥३॥

---

१९ अहल्यानामक शिळा. १ हेलकावे घेत चालतात. २ धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारी गोष्टींनीं. ३ ४०० रुपया ( किंचित् )

लोकांना भुलवुनि रांड ही सुरा जी, ताच्चित्तां करवुनि घे स्वतांस राजी.॥
तत्कीर्तिस्मृतिबलतेजहानिकारी होवोनी, झट करिते तया भिकारी ॥ ४ ॥

( वसंततिलकावृत्त. )

जी देखतां वमन हो, असली कुगंधा ;
जी बोलभांड, बहु रक्त तनु प्रधुंदा ; ॥
आचार, धर्म, न विचार न जीस जाती ; ।
आश्चर्य ! धांवुनि तिच्या गृहिं लोक जाती ॥ ५ ॥
येतां धनाढ्य करण्यास निजांगिकार, ।
बोले सुरा बरवि चालुनि ये शिकार. ॥
स्वालिंगनें हरुनि तत्स्मृति सूपचारीं,[४] ।
ती त्या लुटी. उपरि लोटुनि दे गटारीं ॥ ६ ॥

( मालिनी वृत्त. )

स्मृतिरहित तिथें ते लोळती राव खालीं ।
शयन करिति सस्त्री जे पलंगीं, महालीं. ॥
मग दिन उगवे, तों गुंगुनी सर्व माशा ।
जमुनि, जन पहाती भोंवतीं तो तमाशा ॥ ७ ॥
जन किति वदती, हे रावसाहेब मोठे ।
चुकुनि सहज येथें आज आलेचि कोठें ? ॥
कितिक ह्मणति विप्रीं ताळ हा सोडिला हो ! ।
फुकट धरुनि नाका घेति संधेस लाहो ! ॥ ८ ॥

( यूथिकावृत्त. )

स्पष्ट नापिक वदे मग एक तो, सोंवळे ह्मनुनि बाह्मन ऐकतो. ॥
लाइती लइच थोरपना उगा, लोळतो भट कसा गटरीं वगा ॥ ९ ॥

---

४ चांगल्या उपचारांनीं.

बोलतो तव दुजों, द्विज दारुची । तुच्छता करुनि घेति सदा रुची. ॥
विप्र लावितिल पाट जरी हे, । विप्र शूद्र मग भेद न राहे ॥ १० ॥

( उमावृत्त. )

ऐकुनि ये द्विज एक पुढें सरसावुनि त्या उठवी स्वकरीं ; ।
तोंच पुढें सरुनी दुसरा द्विज तत्कटिवस्त्रहि नीट करी ; ॥
शीघ्र तदंग पुसूनि, तिजा मग कोट रुमाल करीं झटकी ; ।
बांधुनि नीट रुमाल शिरीं तव घालितसे चवथा झट कीं; ॥ ११ ॥
राव असे सजवूनि उभे तव येउनि शुद्धि जरा ह्मणती ।
पाहटचीच रपेट मला भवली कथुं काय तिची गणती ॥
येउनि येथवरी घसरूनिच पाय, तसा पडलों गटरीं ।
त्यासरशी मज शुद्धि नुरे बहु अंग दुखे मज न्याच घरीं. ॥ १२ ॥

( मंदाक्रांता वृत्त. )

खो खो खो खो हसुनि जन ते बोलती आपणांत ।
या रावीं दुर्गुण छपविण्या खूप केलीच मात ॥
सूक्तांऽसूक्तां करुनि सकलां ठेविती हात कानीं ।
विप्रा ऐसे ठक न जगतीं पाहतां लोक कोणी ॥ १३ ॥
ऐशा रीतीं करुनि अवघे घेउनी लोक-हास्य ।
भाडें-तांगा करुनि जलदी राव जाती गृहास ॥
चोरीं दोन्ही कर-सलकडीं बोटिचें जोडवें ते ।
गेलें, ज्याला परि संवय जी त्यास कां सोडवे तें ॥ १४ ॥

( स्रग्धरा वृत्त. )

ऐशीं विप्राऽसुरांची झळक फळक ती मंडळी आज कालीं ।
गांवोगांवीं जमूनी बहुत दृढमनें बाटलीभक्त झाली ॥

---

५ दुसरा तेथें असलेला शूद्र.

काव्याज्ञा-भंग-पापीं वचक न धरुनी धाकही अन्नुचा ते ।
ब्रांडी, वाईन, प्याया सहज उडविती बाटलीच्या बुचातें ॥१५॥
प्राप्ती मोठी असोही तरि धन न पुरे तेवढें मद्यप्याला ।
साटोप्याला बुच, स्क्रू, रसभरित अशा बाटल्या ग्लास प्याला ॥
आठोज्यांतून ज्याचे त्रिदिनच असती शुद्धिचे कामकाजां ।
बाकी रोजीं तयाच्या सकलहि ह्मणती भेटिलाही नका जा ॥१६॥

( वंशस्थ वृत्त. )

इदंच नास्ति न परंच लभ्यते । स्थितीस या पावति शीघ्र राव ते ॥
सुरा, पियाची करवूनि दुर्गती । तयाचिया दे अपकीर्ति संगतीं ॥१७॥
असे जगीं पाहुनि नित्य दाखले । सुरेस ज्यांनीं लवमात्र चाखलें ॥
तया नरा दुःस्थिति ये न काय ती? । असोचि तो भूपति कीं तपी यती ॥१८॥

( शिखरिणी वृत्त )

सुरापानें प्राणा बहुत मुकले. यादवकुला ।
सुरा संव्हारी हें कथन करिती व्यास सकलां ॥
सुरा दैत्याऽऽगारीं कच-गुरु-कवि-प्राण-हरणीं ।
धजे कापस्थानें. सकलहि तिची दुष्ट करणी ॥ १९ ॥
सुविद्या संपन्न प्रकृत जन संभावित भले ।
सुरापानें अंगीं जडुनि गद भारी खिदबले ॥
कधीं ज्यांच्या लागे किमपि न अहाहा मळ नखा ।
न तद्दुःखा हाला गणति. शुन[६] त्या अंमळ नखा ॥ २० ॥
सुरा क्रूरा दुष्टा जगति असुरी[७] ही अवतरे ।
मना ! जो कां तीच्या जन गवसला तावडिंत रे ॥
तयाला ती ग्राशी करुनि विपदा निर्दयपणें ।
शिवेलाही तीच्या ह्मणुनि न शिवे के. स. रि. ह्मणे ॥२१॥

---

६ कुत्रें. ७ राक्षसी.

# षड्रिपु.

## काम.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

पाहातां पुरुषें स्वयें सुतरुणी सल्लोचना कामिनी, ।
होते वृत्ति सुचंचला, उपजते तद्भोग-वांछा मनीं. ॥
ऐसा चित्त-विकार, काम, मदन, प्रद्युम्न ह्या नामही, ।
भारी हा अनिवार शत्रु मनुजा. विख्यात लोकीं तिहीं ॥ १ ॥

( वसंततिलका )

दुर्जेय काम रिपु थोर. यदीय संगें, ।
एके क्षणांत मुनिचें तप सर्व भंगे. ॥
याच्या करीं गवसतां नरही विवेकी, ।
बज्ञान आणि सुविचार पळीं नुरे कीं ॥ २ ॥

वैराग्य धारण करुनि बनेल जोगी ; ।
तीर्थी निरिच्छ फिरतो उघडा विरागी ; ॥
संसार सोडुनि मनें यतिही जहाला ; ।
ना सोडिलें तरि पहा मदनें तयाला ॥ ३ ॥

मानूनि हा विफल संसृतिचा पसारा, ।
सन्निश्चयें त्वरित सांडुनि मोह सारा, ॥
रानीं करुनि तप तीव्र, मुनींद्र झाला ; ।
ना सोडिलें तरि पहा मदनें तयाला ॥ ४ ॥

( शिखरिणी. )

निघाला घाळाया मदन निजघाला त्रिजगतीं. ।
पुढें त्याच्या खुंटे मनुज[1]दितिपुत्राऽमरगती. ॥
जिरूनी तन्नेम-व्रत-तप-नय-ज्ञान सगळें, ।
त्वरें कर्म-ज्ञानें-द्रिय-दमन-सामर्थ्यहि गळे ॥ ५ ॥

( विबुधप्रिया. )

ब्रह्मदेव, परंतु तो रतला स्वयें स्वसुतेसवें ; ।
विप्र गौतम[2]-पत्नि भोगियली सकृत्रिम वासवें[3] ; ॥
मेनका मुनि गाधिजें[4] वनिं भोगुनी, तप भंगिलें ; ।
या परी किति कीं जनीं नय-धर्म-मार्ग विलंघिले ॥ ६ ॥

( प्रहर्षिणी. )

लंकेचा प्रभु, रघुभूभृदंगनेला[5] ।
कापट्यें हरुनि, सुखा मुकूनि मेला. ॥
सैरंध्री परवनिता धरूं स्वहस्तें ।
जातां, ये झडकरि मृत्यु कीचकातें ॥ ७ ॥
ज्ञानीही, धरुनि मनीं परांऽगनाऽऽशा, ।
होवोनी स्मर-हत, पावले स्वनाशा. ॥
ऐशा दुर्धर रिपु काम-नाशनाला ।
एकाकी[6] निज सुविचार शक्त झाला ॥ ८ ॥

( शिखरणी. )

विवेकाचा चित्तीं करुनि विपिनीं आश्रय तदां, ।
शुकाचार्यें रंभा निज ह्मणियली माय शतदां. ॥

---

१ मनुष्य, दैत्य आणि अमर म्हणजे देव या त्रिवर्गांची गति. २ अहल्या. ३ कपटी इंद्रानें. ४ विश्वामित्रानें. ५ (रघु+भूभृत्+अंगनेला) = सीतेला. ६ एकटाच

त्रिलोकीं कोणीही करिल न जयाची सर खरीं, ।
तया योगींद्राच्या नमन चरणीं के. स. रि. करी ॥ ९ ॥

## क्रोध.

### श्लोक.

(शार्दूलविक्रीडित वृत).

कांहीं कृत्य मनाविरूद्ध घडतें कीं होय दुष्प्राप तें, ।
स्व-स्वाभाविक शांत वृत्ति असल्या वेळेस संतापते. ॥
हा जो चित्त-विकार, राग ह्मणती, या क्रोधही बोलती. ।
थोरीऽनर्थीहि[1] नाश हा रिपु करी राष्ट्रें तशीं पालथीं ॥ १० ॥

### ॥ आर्या ॥

चित्तोपवनांत जरी शिरला क्रोध प्रमत्त गज हा कीं, ।
सुविचार नीति धर्मादिक सुफलद वृक्ष उन्मळुनि टाकी ॥ ११ ॥
स्वच्छंदें मग टाकी रंवदळुनि स्मृति-सुपुष्प-वटिकेतें, ॥
तनु-भूमि हदरूनी दे. मग क्षमा-दीर्घिका[2] कशि टिके बे ? ॥ १२ ॥

### श्लोक.

( वसंततिलका वृत्त )

ज्ञानी कितीहि जन शांत असो विवेकी, ।
होतां प्रकोपवश तो, स्वगुणा क्षणैकीं ॥
सोडी. शिरूनि बहु राग भरामधें, तीं ।
कर्मैं भयंकर करी अनुताप देतीं[3] ॥ १३ ॥

---

१ ( थोर+अन्+अर्थ )=श्रीमंत लोकांस द्रव्यरहित करितो. २ क्षमारूप विहीर. ३ देणारी.

सांशंक ती स्वललना दिसतां गृहाला, ।
क्रोधायमान जमदग्नि मुनींद्र झाला. ॥
आज्ञापुनीं, परशुराम-कुमार-हस्तें ।
स्त्रीतें उगीच वधवी मग रेणुकेतें. ॥ १४ ॥

( शिखरिणी वृत्त.)

महा क्रोधें, स्त्रीतें त्वरित अनयें गौतममुनी ।
अहल्येतें शापी ; " पड जडशिळा होउनि वनीं " ॥
स्वजोमात्या, त्वेषीं भरुनि अविचारें कविमुनी ।
म्हणे " हो म्हातारा " समजुनि न कन्याऽहित मनीं ॥१५॥

( स्वागतावृत्त. )

कोप हा स्वरिपु निष्ठुर मोठा, क्रूरसा फिरवितो निज सोटा. ॥
अल्पशा क्षणिक हेतुहि साठीं तो त्वरें भलभल्यांसहि गांठी ॥ १६ ॥
मात्र जो, जन विवेक-सुशस्त्री, त्यापुढें उतरुनी स्वमुखश्री, ॥
कोप तो पळतसे पथ दाहीं. मागुतीं न उलटूनिहि पाही ॥ १७ ॥

( मंदाक्रांता. )

नानायत्नें जरि कुरुनृपें गांजिलें पांडवांला, ।
क्षोभ, क्षांतिप्रति धरुनि त्या धर्मरायें, न केला. ॥
भार्या क्रूरा, परि किमपि तुकाराम कोपा न पावे. ।
ऐशांचें हा स्तवन करितो के. स. री. नम्र भावें ॥ १८ ॥

---

४ जळांत मत्स्याचें युग्म पाहून जिच्या मनांत कामाविषयीं शंका आली आहे अशी. ५ आपला जांवई जो ययातिराजा त्यास. ६ शुक्राचार्य. ७ मुलीचें अकल्याण.

# लोभ.

---

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

दैवें जें दिधलें, तयांत न कधीं संतोष होतां मनीं, ।
कष्टानें अधिंकाधिकीं उपजणें हव्यास भारी धनीं ; ॥
इच्छाही अनिवार, लोभ इजला लोकीं असे नाम तें. ।
येणें नोचितशा सदा मनुज दुर्मार्गीं कुकर्मीं रते ॥ १९ ॥

( वसंततिलका. )

लोकांस लोभ-रिपु दावुनि फार माया, ।
तृष्णा-स्वसेसह जना भ्रमवी रमा या. ॥
त्याच्या जरा पुरुष कृत्रिम मोहपाशीं ।
गुंते, तरी त्वरित आकळितो तयाशीं ॥ २० ॥
हातांत आणुनि जनास अशा रितीनें, ।
तद्बुद्धिला भ्रमवुनी मग दुष्पथीं ने. ॥
हा, मित्र बंधु जनिता जननी स्वसा, ही ।
राहूं न दे निजवशा स्मृति लोभ कांहीं ॥ २१ ॥

( शिखरिणी वृत्त. )

प्रिया तृष्णा भार्या घरुनि निज कार्यार्थ जन जे ।
पुढें झाले, त्यांतें स्वमनिं बहु हव्यास उपजे. ॥
न धर्माऽधर्माही अनय नय यां नेणुनिचि ते ।
धन-प्राप्तीसाठीं करिति बहु कर्में अनुचितें ॥ २२ ॥

---

१ आशानामें बहिणीशीं.

जना, अन्या भार्या मग कृपणता वाटुनि वरी, ।
तिच्या कंठीं प्रेमें दृढतर मिठी मारुनि वरी. ॥
न खाऊनी पोटा, करुनि धन-साठा, निशिदिनीं, ।
म्हणें, कोण्या रीतीं सकल जगतीं होइन धनी ? ॥ २३ ॥

( वसंततिलका. )

होतो कृतघ्न जन. जो स्वहितीं प्रलोभी, ।
ना बंधु-मित्र-धनि-घात करावया भी. ॥
संपत्ति जोडुनि अपार कुबेर झाला, ।
विश्रांति आणि सुख तृप्ति तरी न त्याला ॥ २४ ॥
बंधूंस मारुनि करी निज बा[२]-दशा ही ।
औरंगजेब मग भोगित बादशाही ॥
झाली न तृप्ति इतुकेंहि करूनि कांहीं ।
पुत्रींहि तो भरंवसा न धरूनि राही ॥ २५ ॥
पृथ्वीप होउनि शिकंदर बादशाहा, ।
तन्मानसांतिल तथापि न जाय हाहा. ॥
जिंकावया मज म्हणे उरली न भूमी. ।
आतां उपाय तरि काय सुखा करूं मी ? ॥ २६ ॥

(शार्दूलविक्रीडित वृत्त )

बंगाल्यांतिल साहुकार, विपुला संपत्ति ज्याच्या गृहा, ।
कांहीं वाण न ज्या, असा जन उमीचंद[३] प्रलोभी पहा. ॥
त्यानें सामिल होउनी रिपुगणां, त्या तीस लक्षीं धनीं ।
आशा ठेवुनि, मित्र तो बुडविला बंगालचा जो धनी[४] ॥२७॥

---

२ बापाची दुर्दशा. ३ मारिसकृत हिंदुस्थानचा इतिहास भाग ४ था पहा.
४ सुराजउद्दवला.

लोभानें जग जिंकिलें. विरळ त्यापासून जो वेगळा. ।
त्याच्या धांवुनि घालिती सुर-वधू माळा स्वहस्तें गळां. ॥
गोपीचंद सुराज्य-वैभव-सुखा सोडूनि, निर्लोभ तो ।
झाला धन्यहि, वर्णिला बुधजनीं, त्या के. स. रा. वंदितो॥२८॥

## मोह.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

हा देह क्षणिक प्रसिद्ध असतां मानूनि यच्छाश्वती, ।
मत्कांता, धन, बंधु, हें जन वदे, मद्धाम, मत्संतती. ॥
बोले, आप्त, मदिष्ट, मित्र, जन हे माझे सखे सोयरे. ।
ऐसा जो भ्रम, मोह तो. जन तदावर्ती स्वकर्में फिरे ॥ २९ ॥

( वसंततिलका वृत्त. )

हा मोह शत्रु कपटें बहु आत्मपाशीं, ।
घालूनि भूल फसवी दृढ मानवाशीं. ॥
मी कोण, ही स्मृति नुरे मग त्यास कांहीं. ।
मानूनि सर्व जग शाश्वत मग्न राही ॥ ३० ॥
संसार हा बुडबुडा जणु पाणियाचा. ।
सर्वत्र हें अनुभवूनि, मनुष्य याच्यां ॥
कांहीं मनीं न करुनी सदसद्विचारा, ।
मोह-भ्रमीं निशिदिनीं भ्रमतो बिचारा ॥ ३१ ॥

( मंदाक्रांतावृत्त. )

माझें माझें सकल म्हणतो. वर्तुनी स्वाभिमानें, ।
गेला त्यातें विसरुनि दिला आपणा जन्म ज्यानें. ॥

---

५ क्वचित्. ६ देवांगना. १ मोहरूप भोंवऱ्यांत.

नेणे कीं, हा तनु-घट घडीं भंगतां दो दिसांचा, ।
मागें राहे सकल खटला जेथला तेथ साचा ॥ ३२ ॥
नाहीं दारा, गृह, धन, सुताप्तादि येणार पाठीं, ।
पाहे ऐशी मनुज नयनीं नित्य लोकीं रहाटी. ॥
मोहाऽऽवर्तीं तदपि पडतो संसृतीच्या कचाटीं. ।
कांहीं केल्या परि न भगवन्नामपियूष चाटी ॥ ३३ ॥

( स्वागता वृत्त. )

व्यर्थ हो खटपटी सतरा या. हा भवाब्धि मनुजास तराया, ।
ईश-नाम तरणी सुखकारी. स्वाश्रयें जनन मृत्यु निवारी ॥ ३४ ॥

( शिखरिणीवृत्त. )

कराया प्रेमानें ग्रहण भगवन्नामचि सुधा, ।
नको सोडायाला धन, सदन, संसार विबुधा[२]. ॥
नको धुंडायाला विपिन अथवा पर्वत-गुहा. ।
हवा जिंकायाला प्रथम परि दुर्मोह रिपु हा ॥ ३५ ॥

स्व संसारीं राहे सकलहि खटाटोप करुनी, ।
विदेही[३] राजाचें मन तरि सदां ईश-चरणीं ॥
तुकोबा संसारा करि, धरि निजध्यास विठलीं ।
महात्म्यातें ऐशा मग भव-नदी-भीति कुठली ? ॥ ३६ ॥

असोनी संसारीं किमपि तिकडे ध्यास मन न ; ।
खरें राहे ज्याचें सतत परमार्थींच मनन ; ॥
सुखीं दुःखीं जो कां समचि अवघा काळ निभला ; ।
महात्मा तो लोकीं इहपर म्हणे के. स. रि. भला ॥ ३७ ॥

---

२ हे सूज्ञ मानवा. ३ जनकराजाचे.

# मत्सर.

—☀—

## श्लोक.

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

अन्याचें बरवें न साहुनि मनीं, तत्कार्य-नाशाप्रती ।
यत्नानें झटणें ; असो स्वहितही किंवा नसो प्राप्ति ती. ॥
यातें मत्सर बोलतीहि म्हणती हेवा असूया जनीं. ।
ऐसा घातुक नान्य दुर्गुण दिसे जातांहि शोधूं मनीं ॥ ३८ ॥

( वसंततिलका. )

हेव्यासमान मदनादिक शत्रु साहीं ।
नाहींच अन्य रिपु निर्दय कोणताही. ॥
कीं एकदां जन तदंकित जो जहाला, ।
त्याच्या न पार अयशासहि दुःस्थितीला ॥ ३९ ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त )

अन्योत्कर्ष न हर्ष दे किमपिही त्या घातुका मत्सरा. ।
तत्कार्यीं करि विघ्न. तो मग असो भ्राता सखा सोयरा. ॥
जेणें होइल तें जनाऽहित अशा यत्नीं झटोनी पडे. ।
तन्नाशासमयीं निजाऽहित करी. पाही न मागें पुढें ॥ ४० ॥

( वसंततिलका. )

पाही न मत्सर बरें जननीपित्याला. ।
मेलाहि बंधु, करुणा न तथापि त्याला. ॥
घालावयास न चुके स्वसुतींहि घाला. ।
होतो तसाच बहु घातक तो जगाला ॥ ४१ ॥

---

१ सहाजणांत.

( प्रहर्षिणी वृत्त. )

संभाजी-नृपति-मनीं वसे असूयां. ।
मातेचें मग नुरवी जगीं असूं या ॥
मात्सर्यें नृप किति पावले विनाशा. ।
आतां तो सतत घरोघरीं तमाशा ॥ ४२ ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

बापाला ह्मणणार बाप न, अशा औरंगजेबें तरी ।
मात्सर्यें वधिले स्वबांधव-सुजा-दारा-मुरादा करीं. ॥
आनंदी रघुनाथराव-ललना प्रख्यात जी पेशवी, ।
ती, जीवें पुतण्यास मारवुनियां त्याच्या प्रहर्षे शवीं ॥ ४३ ॥

( वसंततिलका वृत्त. )

देव प्रसन्न बहु होउनि मत्सऱ्यातें ।
बोले, गमेल तुज माग अशा वरातें. ॥
भक्ता, परंतु तरि ऐक, ममस्वभावा. ।
देईन दुप्पट तुझ्या तुजहूनि भावा ॥ ४४ ॥
कानीं अशी परिसुनी परमेश-वाणी, ।
मागें प्रभूस मग तो पसरूनि पाणी ॥
हा फोड एक ममनेत्र, परंतु भाऊ ।
देवा फुटूनि नयनद्वय अंध होऊं ॥ ४५ ॥

( शिखरिणी वृत्त. )

घरामध्यें एका अदय शिरतां मत्सर असा, ।
निवाराया कोणी पुरुष न तया शक्त सहसा. ॥

---

१ प्राण. ३ तर. ४ आपले भाऊ जे सुजा, दारा, व मुराद यांना. ५ प्रेताचेंठायीं.

गृहाच्या विध्वंसा करुनि अपकीर्तीसहि करी. ।
करी देशाची तो तशिच धुळधाणी निजकरीं ॥ ४६ ॥

॥ आर्या ॥

मत्सरभावें झाला नाश ६स्वसुवर्ण-भूमिचा सारा. ॥
कथितो के. स. रि., नुरली शक्ति भरायाहि शेतचा सारा॥ ४७॥

## अहंकार.

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

मी मोठा धनवान् गुणी, चतुर मी, विद्वान्सुधी, शाहणा, ।
दाता, शूर, बलाढ्य मी, मदनसा रूपींहि मी देखणा. ॥
हा जो पोकळ मीपणा प्रतिजनीं, वैरी अहंकार हा. ।
या पायीं तरले न कोणि जन. या पासूनि दूरी रहा. ॥ ४८ ॥

( पृथ्वी वृत्त. )

स्वशत्रु अभिमान हा, बहुत डामडौलें स्वयें ।
जगावरति चाल तो करुनि जिंकण्यालागि ये. ॥
महाजनहि तावडीमधुनि याचिया वांचला ।
नसेच. मग पाड त्यापुढति कायसा आपला ? ॥ ४९ ॥

( स्रग्धरा वृत्त. )

हो थोडी प्राप्त विद्या, गुण धन अथवा अंगिं येतां हुशारी, ।
कीं चौघां सभ्य लोकीं अमळ ह्मणविला चांगला, सद्विचारी, ॥
कीं कोठें अल्प राजाश्रय मिळुनि जरा येइ चित्ता उभारी, ।
तत्कालीं त्या जनाच्या हृदयिं वसतसे आढ्यता गर्व भारी ॥ ५० ॥

---

६ आपल्या सुवर्णमय भरतखंडाचा.

( वसंततिलका वृत्त. )

अंगीं भरूनि बहु मीपण-भूत-वारें ।
त्या दीड वीटच उरे नभ उंच सारें. ॥
मी एक, हें जग निमे म्हणतो शहाणें ।
बोले, मशीं करूं नये सर सत्य कोणें ॥ ९१ ॥

हें त्या कळे न परि, मी जगतीं शहाणा ।
खंडीं जसा खसखशींतिल एक दाणा. ॥
एकाहुनी चढ जगांत असंख्य तारे, ।
खद्योत मी मग कसा दिपवीन त्यां रे ! ॥ ९२ ॥

मी निश्चयी, सबल मीच, पराक्रमी मी, ।
ऐसें वदूनि तरला जन कोण नेमी[1] ? ॥
लोकप्रसिद्ध म्हण सांगतसे स्ववाचें, ।
"खालीं सदोदित असे घर मीपणाचें." ॥ ९३ ॥

मी विक्रमी, मजसवें चतुरंग सेना, ।
मद्धेतुला[2] द्विज वसिष्ठ ह्मणे कसे ना ? ॥
गर्वोक्ति ही वदुनि गाधिज भूप, गाय ।
नेतां बळें, फजित होय. पळूनि जाय. ॥ ९४ ॥

"आतां न शस्त्र समरीं स्वकरीं धरीन" ।
कृष्णोक्तिही स्वमनिं वाटुनिया बरी न, ॥
भीष्में त्वरें धरविलें मग पार्थ-युद्धीं ।
कृष्णाकडूनि करिं चक्र हरूनि शुद्धी[3] ॥ ९५ ॥

"मी सिंह, त्या रिपु शिवाजि-वृंका[4] सहाजीं ।
मारीन देउनि चपेटच बादशाजी." ॥

---

१ निश्चयी. २ माझ्या हेतूला. ३ स्मृति. ४ शिवाजीनामें लांडग्यास.

गर्वोक्ति आफझुलखान अशी वदोनी ।
गेला. पडे परि शिवाजि-करीं मरोनी ॥ ९६ ॥

सारांश. कोण तरला जन मीपणानें ? ।
ओढोनि तो अवदशेप्रति आपणा ने. ॥
सांगे मुलास उपदेशुनि नामदेवें[5] ।
" आधीं मिरे[6] जरि जिरे[6] मग हिंग[6] देव " ॥ ९७ ॥

वाटे जया स्वमनिं आपण साधु व्हावें, ।
त्यानें अगोदर मनें रिपु सों[7] धुवावे ॥
जो या रितीं निरभिमान विशंक झाला, ।
त्याच्याच के. स. रि. नमी पदपंकजाला ॥ ९८ ॥

---

५ प्रसिद्ध साधु नामदेव शिंपी. ६ अगोदर मिरे ह्मणजे मीपणा जर जिरे म्ह० जिरला तर हिंग म्ह० जवळ देव आहे. ७ सहा.

## विभाग ४ था.

# व्यवहारसार.

## दृष्टांतपर.

॥ आर्या ॥

### ईशनाममहिमा.

हरिभजनैका घटिका, दिन-षष्ठि-घटींसही पवित्र करी. ॥
पट रजक-धौत सर्वहि शुद्धच जल-बिंदु शिंपितां उपरी ॥१॥
परमेश-नाम वदनीं सहजहि ये, पाप भस्म करिल तरी. ॥
अग्निस्पर्श न कळतां होय, तरी काय दाह तो न करी? ॥२॥
तरलाचि अंतकाळीं जन, ईश्वर-नाम-घोष ज्या मिळतो. ॥
पुत्र-मिषें नारायण वदतां तरला अघी अजामिळ तो ॥ ३ ॥
लागे कवण्याहि मिषें प्रभुनाम-ध्यास, जन तरेल न कां ? ॥
उद्धरली शुक-विरहें[1] "राघोबा" धरुनि घोंकणी गणिका[2] ॥४॥
निजपूर्व-पापसंचित, येऊं ना देत ईश-नाम मुखा. ॥
असतां सुग्रासान्न, ज्वरिता न रुचे ; गमे समान विखा. ॥५॥
मन न हरि-स्मरणीं, तरि संसारीं व्यर्थ शीण हा केला. ॥
जन्मा आला हेला, पाठीं पाणीच वाहतां मेला ॥ ६ ॥
ईश्वर-नाम-सुधा जो प्याला ज़न, तोचि धन्य संसारीं. ॥
संसार खटाटोपाहि करुनी, जनकराय दूर भव सारी ॥ ७ ॥

---

१ पिंजऱ्यांतून आवडता पोपट उडून गेल्यामुळें. २ पुराणप्रसिद्ध वेश्याविशेष.

## ईशभक्तवात्सल्य.

हरिपदिं एकांचि निष्ठा, त्या सुजना कोण दुःख दे, मारी ? ॥
स्तंभीं प्रकटुनि रक्षी प्रऱ्हादा देव भक्तकैवारी ॥ ८ ॥
मारील कोण त्यातें ? परमेश जयास तो सहाकारी.॥
चंद्रा[3]स्य-वधीं तत्पर चांडाळां शीघ्र देव हांकारी[4] ॥ ९ ॥
अनिवार्य संकटींही देव न भक्तास होउं दे क्लेश. ॥
दामाजी-जीवास्तव नटला अतिशूद्र-रूप जगदीश ॥ १० ॥
देवास भक्त-मानस पुरवाया क्षणहि ऊर्तता कुठली ? ॥
गो[6]विंद-गीत गातां, श्रीजयदेवांगना मृतां उठली ॥ ११ ॥
दुष्टाऽसुरास मर्दी, भक्ताऽवनिं देव तनुमनें श्रमला. ॥
कोरी द्विरेफें काष्ठा, परिलाची अल्प ना धका कमला ॥ १२ ॥

## सज्जन.

पर-सुगुण ग्रहण करुनि, उपदेशी ज्ञान सुजन इतरां तें. ॥
विधु आपण रवि-तेजें प्रकाशुनी, दे उजेड जगतातें ॥ १३ ॥
भोगुनि दुःख निजांगें साधु, परां सौख्य दे यथाकाळीं. ॥
दीपक जनां प्रकाशी राखुनि काळोख आपणाखालीं ॥ १४ ॥
पावुनि बंधन आपण, झांकी परगुह्य सज्जन—प्रकृती. ॥
आच्छादी स्त्री-स्तन तें स्वांऽगीं घेऊनि गांठ कंचुकि ती ॥ १५ ॥
दुर्जन-सहवासेंही सत्पुरुष परा न होय अपकारी. ॥
सर्पांनीं वेष्टित, तरि होतो चंदन न आपण विखारी ॥ १६ ॥
सत्पुरुष निर्धन, तरी परोपकारा झिजे स्वतां देहीं. ॥
स्वांगें संतोष जनां चंदन फल-पुष्परहित पण देई ॥ १७ ॥
थोर पुरुष संरक्षी धरिल्या दृढ कांस संकट पडो ही. ॥

---

३ चंद्रहासनामा राजा. ४ हांकून देई. ५ अवधि. ६ जयदेव स्वामीकृत अष्टपद्या. ७ जयदेवस्वामीची मृत झालेली स्त्री. ८ भक्ताचे रक्षणाविषयीं. ९ भ्रमर. १० चंद्र.

स्वाश्रित जना अलाबु[11] स्वांगें तारी महा उदक-डोहीं ॥ १८ ॥
विघ्न करी सत्कार्यी दुर्जन, सज्जन तया पुन्हां सुधरी. ॥
सूच्यग्र[12] छिद्र सुपटीं पाडी, नेडें[13] तयांत तंतु भरी ॥ १९ ॥
भूतीं सर्व दया सम ठेवुनि सत्पुरुष तत्सुखार्थ वळे. ॥
च्यूतचि[14] जनमाता दे संतोषहि तृप्ति आपल्या सुफळें ॥ २० ॥
निवळे सज्जन लोकीं, होयचि तो जसजसा वयीं सरसा, ॥
तिक्तो[15]ऽम्लाऽपक्व सुफल पिकतां दे मधुरशा स्वकीय रसा ॥ २१ ॥
सत्पुरुष भाग्य-कालीं विनय धरी, गर्व वाहुनि न लव तो. ॥
कीं, पुष्प-फलाऽऽगमनीं तरुवर नम्रत्व धरुनि बहु लवतो ॥ २२ ॥
सत्पुरुष तोचि; किमपि न आत्म-वचन संकटींहि जो टाळी, ॥
द्याया त्रिपाद धरणी न ढळे बळि. जरिहि जाय पाताळीं, ॥ २३ ॥
खचतां स्वहेतु सुपुरुष नैराश्यें अधिक योग्यता पावे. ॥
मधुनि खची करितां तरु चोंहिकडुनि फुटुनि अधिक जोंपावे[16] ॥ २४ ॥
शरणाऽऽगतास यद्यपि वेंचे स्वप्राण थोर जन रक्षी. ॥
शिबिराय दे स्व-मांसा जाउं न दे, परि कपोत[17] रिपु[18]-भक्षीं ॥ २५ ॥
दे सौख्य परा सुपुरुष. घे आपण दुःख ताडितां पादीं. ॥
धारक-पदा उपानह[19] सुख दे साहूनि शीततापादी ॥ २६ ॥
निज मार्गेंचि महाजन वर्ते. परिसुनि न दुर्जन-कुटाळी, ॥
शुन भुंकतांहि मार्गीं गजराज भिऊनि, न स्वपथ टाळी ॥ २७ ॥
संकट अडचणाहि असो, थोरजन तरी स्ववर्तनींच रत. ॥
मरणासन्न हरि, तरी इच्छी गज-भेदना; तृण न चरत ॥ २८ ॥
अन्यं[20] गुणाऽगुण सज्जन करी प्रकट गुप्त साठवी पोटीं. ॥
भाळीं धरुनि शशीला उघड, विष धरीच गुप्त शिव कंठीं ॥ २९ ॥

---

११ पोहण्याचा भोंपळा. १२ सुईचें टोंक. १३ सुईचें नाक. १४ आम्रवृक्ष. १५ कडू, आंबट व कच्चें असें खाण्याचें चांगलें फल. १६ फैलावे. १७ पारवा पक्षी. १८ बहिरी ससाण्याचे भक्ष्यस्थानीं. १९ पायांतील जोडा. २० दुसऱ्याचे गुण आणि दोष हे अनुक्रमें उघड करितो आणि गुप्त ठेवितो.

# दुर्जन.

एका दुर्जन-संगें जन पावे नाश, कीर्ति बल भंगे. ॥
होय कुरु-कुल-क्षय तो केवळ दुर्बुद्धि शकुनि-खल-संगें ॥ ३० ॥
हो[21] स्पर्श दुर्जनाचा, सज्जन-गुण-नाश तरि खचित होतो. ॥
घट नाशी दुग्धाचा एक जरा तक्र-बिंदुहि अहो तो ॥ ३१ ॥
होतेच दुर्जनाच्या संयोगें नाडणूक साधुवरा. ॥
मत्कुण-संगें भंगे बहुमूल्य कठीण तेजमान हिरा ॥ ३२ ॥
उपचारें आर्जविला, प्रकट करी तरि खळ स्वगुण-दर्प. ॥
कर्पूर-खतीं रुजला, तरि दुर्गंध त्यजी न कंदर्प ॥ ३३ ॥
खल-संगतीं सुजन-मन होय गढूळ, न कदापि टळवेल. ॥
टाकी स्वकीय सुगुणा शेरावरि पसरल्यास गुळवेल ॥ ३४ ॥
अस्तित्वींहि[22] मृतत्वीं[23] हो ताप[22]-त्रासदा[23]चि खल-करणी. ॥
पीडुनि जनां स्वदंशें मत्कुण दुर्गंधि देई निज-मरणीं ॥ ३५ ॥
सुजनास आडवा ये दुर्जन सत्कार्य-सिद्धि फिरवाया. ॥
वरईंत[24] नाचणी[25] ती शिरुनि निराहार-फल करी वाया ॥ ३६ ॥
खल-संगति सरसी अधिं, होय उणी मग उरे न शेवट ते. ॥
दीर्घा प्रभात-छाया, न्यूना होउनि दुपारला घटते. ॥ ३७ ॥
वचनीं गोड वरुनि, परि दुर्जन हृदयांतरीं कपट-खाणी. ॥
वृंदावन फल रम्यचि वरून, परी आंत कडु निपट[26] पाणी ॥ ३८ ॥
दुर्जन अधीं नमावे, करणें मग सज्जनां नमस्कार. ॥
मुख-मार्जनाहि पूर्वी क्षालाया लागतें गुदद्वार ॥ ३९ ॥
दुसऱ्यासहि आड कुजन ये परकार्यी, स्वतांहि हो कृपण. ॥
बाभुळ पुष्प फलादि न देउनि, होते फलद्रुमां कुपण ॥ ४० ॥

---

२१ झाला. २२ जिवंतपणी ताप देणारी. २३ मेल्यावर त्रास देणारी. २४ भगरनामें तृणधान्यांत. २५ नागली. २६ केवळ.

## महदाश्रय.

महदंगीकृत अल्पहि वस्तु प्रिय पूज्य होतसे सर्वां. ॥
श्रीविघ्नेश–स्वीकृत जन शिरसा वंदितात तृण दूर्वा ॥ ४१ ॥
थोरासंगें क्षुद्रहि जन होतो मान्य सर्व लोकांस. ॥
माळेंत पुष्प-संगें कंठीं सूत्रासही घडे वास ॥ ४२ ॥
थोरांच्या जीवास्तव जपणूक तदाऽऽश्रितीं जनीं मोठी.
सोन्यासाठीं करिती चिंधीतें जतन ठेवुनी पेटीं ॥ ४३ ॥
स्थळ-वैभवेंकरुनि लघु वस्तुहि बहु पावते महत्वास.॥
नृप-भाल-लग्न चिखला कस्तूरी लोक मानिती खास ॥ ४४ ॥
प्रबलाऽऽश्रयास धरितां दीनहि जन दुःस्थितीस सांवरती. ॥
वरचढपणें नराऽऽश्रय करितां सरसावती मिशा वरती ॥ ४९ ॥
वाढविलें, त्यां व तदाऽऽश्रित-जन-भय-संकटा सुजन वारी[27] ॥
तारुनि काष्ठा तरवी त्या वरिल पदार्थ-मात्रही वारि ॥ ४६ ॥
सर्वत्र वंद्य तो जन, थोरांच्या जो उभा रहिम नजरें. ॥
राजाऽऽश्रित जरि हुजरे, तरि करिती थोर थोर त्यां मुजरे ॥४७॥
महदाऽऽश्रयें सुगुणि-जन-गुण होती व्यक्त शीघ्र लोकांतें.
रवि-किरणांनीं फांके रविकांत-मणि-प्रभा विलोका ते ॥ ४८ ॥
अस्पृश्य वस्तुलाही स्थान-महात्म्यें खुलाच दरवाजा. ॥
खेटे देव-घरांतुनि पशु-चर्महि चढविल्यास पखवाजा ॥ ४९ ॥
साधु-समागम घडतां पावे तत्काल पातकी सुगती. ॥
न कणीक खरकटी. जी गायनभजनीं मृदंगलेपित ती, ॥ ५० ॥
सत्सहवास करीलाचि पावन लोकत्रयीं जनां सकलां.॥
मुनिवर-दर्शनमात्रें वाल्मीकि जगांत जाय ओळखला ॥ ५१ ॥

---

२७. रक्षितो व निवारितो.

## अबलाऽऽश्रय.

अबलाऽऽश्रय दुःखद बहु, करवी अपमानही सुसह जगतीं. ॥
कुच, मर्दनीं अधोमुख होती अबलाऽऽश्रयेंच सहज गतीं. ॥५२॥
गुण, मूल्य, नाम, गुणिजन वसल्यास कळेल दीन-धामा न. ॥
भिल्ल-स्त्री-कंठस्था दिव्य हिऱ्या गारगोटिचा मान ॥ ५३ ॥

## मित्रत्व.

क्षणहि सख-वियोग मना डळमळवी, तोच कीं खरा स्नेह. ॥
न टिके दीप-ज्योत्स्ना. समईंतिल सरलिया जरा स्नेह, ॥ ५४ ॥
एकचि गुण-स्वभाव-व्यसनें सख्यत्व सारखें जमतें. ॥
पावे समशीलत्वें लोहीं पोलाद एक जीवातें ॥ ५५ ॥
सन्मित्र-दर्शन, मना दे हर्ष; त्याग, दुःखाह श्रम दे. ॥
मित्रोदयीं प्रफुल्लित होतीं; अस्तास झांकतीं कुमुदें[२९] ॥ ५६ ॥
सख-दर्शनीं प्रहर्षोद्गारें निज ओष्ठ बाहु फुरफुरती. ॥
चंद्राऽऽगमनीं येते नित्य उचंबळुनि सागरा भरती ॥ ५७ ॥
सख-सहवासें चित्ता ये धैर्य स्थैर्य, होय सुख-सीमा. ॥
चंद्रोदयास भरती होउनि, सिंधूस होय पूर्ण समा[३०] ॥ ५८ ॥
तींच सुमित्रें लोकीं. स्वगुणीं भिन्नत्व जीं सहातीं न, ॥
नुमजेल सत्य कोणा त्रेसष्टीं कोणते सहा तीन ॥ ५९ ॥
सन्मित्र तोचि. समयीं स्वजना साह्यार्थ शीघ्र दे हात, ॥
दुर्योधन-जीवास्तव पावे समरांत कर्ण देहांऽत ॥ ६० ॥
सोडुनि न विपत्कालीं ये जो कामास एक तो मित्र. ॥
श्रीरामा सुख द्याया भोगी वनवास-दुःख सौमित्र ॥ ६१ ॥
बांधव तोचि ह्मणविला. जो सुख दुःखास होय समभागी, ॥

---

२९ कमळें. ३० भरती पूर्ण झाल्यावर १२ मिन्युटें पावेतों पाण्यासजी स्थिरता राहते ती.

विपिनस्थ राम होतां बंधु भरत राज्य-सौख्य नच भोगी ।। ६२ ।।
अनलसपणें करी जो निज-सख-हितकार्य-सिद्धि तोचि गडी. ।।
पांडव-कार्यार्थ रणीं रथ वाहुनि कृष्ण कौरवां रगडी ।। ६३ ।।
जीवाकडे न बघतां निज-सख-कार्यार्थ घेत धांव गडी. ।।
कार्यार्थ शिवाजीच्या तानाजी मरुनि जाय सिंहगडीं ।। ६४ ।।

## शत्रुत्व.

रिपु सान ना ह्मणावा, आल्या हातांत शीघ्र दंडावा. ।।
कींव न करुनि लहान न ह्मणुनि[३१], पहातांचि सर्प खंडावा ।। ६५ ।।
न रिपूस ठाव देतां, हुसकावा नच करूनि हांकाटा. ।।
जाचील पुढें, यास्तव उपटावा पायीं मोडतां कांटा ।। ६६ ।।
एक प्राङ्मुख दुसरा, पश्चिममुख, या परीच रिपु-रीती. ।।
जैशीच छत्तिसांकीं तीन सहा व्युत्क्रम स्थितिस वरिती ।। ६७ ।।
सुविचारें न धरावा शत्रु-भरंवसा कदापि शाहाणीं. ।।
कपटें निज-मरण नखीं सांगुनि रावण जटायुला हाणी ।। ६८ ।।
रिपु- भरंवसा न धरणें, यद्यपि तो होय मित्र अद्रोही. ।।
घालुनि विश्वासें विष, कुरुरायें भीम बुडविला डोहीं ।। ६९ ।।
रिपु-नाशनीं करावा धर्माऽधर्म न विचार युद्धांत. ।।
भू-ग्रसित[३२]-रथ-विकालीं विजयें केला क्षणांत कर्णाऽत ।। ७० ।।

## सद्गुण.

अंगीं उत्तम गुण तरि, कुरूपही जन जगामधें शोभे. ।।
काळी, परंतु पाळी जन कस्तूरी सुगंध-गुण-लोभें ।। ७१ ।।
सद्गुणाचि लुब्धता दे. यद्यपि तो अतिकुरूप जन असला, ।।
पनसागरांत[३३] गोडी तो निपजे कंटकीं[३४]ऽग जरि असला[३५], ।। ७२ ।।

---

३१ बोलून. ३२ भूमीनें ग्रासिलेला आहे रथ ज्याचा अशा कर्णाच्या विपत्का-ळीं ३३ फणसाच्या पोटीं. ३४ वरून कांट्यांनीं युक्त. ३५ अशा प्रकारचा.

एकोत्तमा गुणानें शोभे जन असुनि दुर्गुणीहि किती. ॥
प्रिय एक्या सौंगधें कांटाळ जरीहि वक्र केतकि ती ॥ ७३ ॥
सुगुणास मान लोकीं कुलहीनपणा नरा करी न उणें. ॥
पाषाणोदरज तरी, ग्राह्य हिरा होय कां न तत्सुगुणें ? ॥ ७४ ॥
कुलहीनहि नर सुगुणें लोकीं सन्मान्य व्हावया शकतो ॥
कां मुनि वाल्मीकि नसे मान्य जगा असुनि जातिचा शंक[३६] तो?॥७५॥
नीच कुलोत्पन्नहि जन मान्य जगीं सर्व पूज्य आढळतो. ॥
खगनीच काक-विष्ठा-जनित जगीं सर्व पूज्य पिंपळ तो ॥ ७६ ॥
गुणिजन गुणेंच पर-मन आकर्षी. धूप त्या नको गंडा. ॥
स्वगुणेंच लोहचुंबक घे आकर्षूनि शीघ्र लोखंडा ॥ ७७ ॥
धैर्य विचार चतुरता असल्या, नर विघ्न संकटहि टाळी. ॥
स्वगुणें भूप शिवाजी युक्तीनें यवन-राज्य कंवटाळी ॥ ७८ ॥
एकहि विद्या-निपुणा कोठें नाहीं कमीपणा कांहीं. ॥
चौर्य-गुणेंहि सुतृप्तचि मांजर नवनीत-दुग्ध-ताकांहीं ॥ ७९ ॥
जन गुण-रसज्ञ इच्छी केवळ विद्वज्जनींच संगत ती. ॥
मकरंद-सेवनातें कमलीं धांवूनि येत भृंग-तती ॥ ८० ॥
कोठेंहि वसो गुणवान्, शोभे कोठेंहि त्या नसे बंदी. ॥
सन्मणि शिरींहि कंठीं भुजदंडीं शोभतोहि मणिबंधीं[३७] ॥ ८१ ॥
कामीं कुठें अडेना असल्या स्त्री नरहि बहुगुण स्वांगें. ॥
भाजी करा, भरीतहि, शिजवा वरणांत, गोड तरि वांगें ॥ ८२ ॥
विद्या, विनय, विचार, त्रिगुणात्मक मूर्ति ही जनां मान्य. ॥
गोधूम, शर्करा, घृत, पक्कान्नें दाविती न सामान्य ॥ ८३ ॥
मन-बुद्धि-विचारैक्य प्रकट करी शीघ्र आत्मैक्[३८]रूपातें. ॥

---

३६ कोळी. ३७ मनगटाचे ठायीं. ३८ स्वात्मा आणि ईश्वर एकरूप आहेत अशा स्थितीतें.

पारा कथील भिंगाहि एकत्वें दाविती स्वरूपातें ॥ ८४ ॥
शांति, क्षमा, दया ह्या त्रिगुणात्मक मूर्तिला न उपमा तीं. ॥
न्हातीहि वंदिती जन गंगा-यमुना-सरस्वती-माती ॥ ८५ ॥

## दुर्गुण.

एका प्रदुर्गुणानें गुणवंता तुच्छिती समस्त जन. ॥
तुच्छाचे निजोग्रदर्पे. यद्यपि उत्तम रसायनीं लशुन, ॥ ८६ ॥
चोर चहाड शिनळ ह्या त्रिगुणात्मक मूर्तिचा नको वास. ॥
कफवात पित्त हरिती होतां एकत्र शीघ्र जीवास ॥ ८७ ॥
अविचारी क्रूर पुरुष जाणे पापा न लौकिका कांहीं. ॥
नृप संभाजीस न ये वधितां सापत्नमाय शंकाही ॥ ८८ ॥

## ज्ञानी.

मूढ-जनें त्रास दिला, सूज्ञ-जन न होय उलट त्यास पण. ॥
वाऱ्यास पाठ देउनि क्रमणें मार्गास हें शहाणपण ॥ ८९ ॥
व्यवहार जाणुनि जगीं बुध-जन वर्तेच तदनुसार जनीं. ॥
कल पाहूनि धन्याचा सेवक-जन वागतो दिवा रजनीं ॥ ९० ॥
जाणुनि परमेशातें, सद्गुरु दे करुनि ओळख जनांला. ॥
मिळुनी महानदीला लोकां दावी निजौघ-पथ नाला ॥ ९१ ॥
ज्ञाना बोधुनि सद्गुरु उतरी जन मोह-सागरीं थकतां. ॥
अलिता स्वरास देउनि वेदाची करितसे सुसार्थकता ॥ ९२ ॥
अज्ञ जन बहुत जल्पे. प्राज्ञ धरी भाषणीं न सोस रितीं .॥
ओढा उथळ खळाळे. महापुरीं स्थिराचि वाहते सरिता ॥ ९३ ॥

## मूर्ख.

विद्वज्जनरहित जनां निज-वक्तृत्वें करीत भांट मुके. ॥

३९ पोकळ. ४० स्तुतिपाठक.

रवि मावळे, शशीला ग्रहण, दर्गी खें[४१]-गण, काजवा चमके ॥९४॥
विद्वत्संगीं इच्छा जन मूर्खा ऽरसिक दाखवी न मुळीं. ॥
कटु-निंब-फल-स्वादी घेइल कां काक धांव आम्र-फळीं ?॥ ९५ ॥
कळतें परगुण- मूल्य न, त्यातें निजगुण वुधें न सांगावे. ॥
बधिरापुढें कशाला गवयानें ताणुनी घसा गावें ! ! ९६ ॥
मूर्ख वदे इतर जना या हो अज्ञान जन तुझी साचे.
नंदी तुझी कशाचे ? आपण शिवदेव जेंवि दगडाचे ॥ ९७ ॥
मूर्खाऽज्ञान जनांतें कथितां हित-बुद्धि होय ना फलद. ॥
खडकीं तृण कोठुनि तें उगवेल महाहि वर्षतां जलद[४२] ?॥ ९८ ॥
मूर्खास ना ठसे. जरि वहु कथिलें ज्ञान जोडुनी पाणी[४३], ॥
फळ काय ? ओतिलें जरी वहु उपड्या घागरीवरी पाणी ॥ ९९ ॥
मूर्खास बोध होइल कां ? नित्यहिं सार्थ वाचितां गीता. ॥
अरसिक जन डुकल्या घे. राग-भरें चालल्याहि संगीता ॥ १०० ॥
अन्योपदेश मूर्खा न ठसे. जरि नित्य फार बोधविला, ॥
घुसळुनि दधिं जरि लोणी सार निघे, तरि न लाभ तो रविला.॥ १०१ ॥
होईल [४४]अहिहि सख, परि वळवू मूर्खा शकेन [४५]नाकर्षी. ॥
शेषांगीं पहुडे हरि परि तो दुर्योधनास नाऽकर्षी ॥ १०२ ॥

## दाता.

दाता निर्धन, तृप्तचि याचक तद्दत्त उदक-पानानें. ॥
फल-पुष्पें नसतांही, प्रिय लोका [४६]नागवेल पानानें ॥ १०३ ॥
भी ना [४७]वदान्य दानीं. जरि पावति भंग हस्त-अंग-पदें, ॥
शत्रिवद्रा दुर्भेद्य-[४८]स्वांग-कवचकुंडलांस [४९]अर्पे दे. ॥ १०४ ॥

---

४१ नक्षत्र समुदाय. ४२ मेघ. ४३ हात. ४४ विषारी सर्प देखील. ४५ नारद. ४६ विड्याच्या पानाचा वेल. ४७ दाता. ४८ आपल्या आंगचीं भेद होण्यासारखीं नव्हेत अशीं कवचकुंडलें. ४९ कर्ण.

परिपूर्ण याचकेच्छा केल्याविण जल वदान्य न प्राशी. ॥
दे इंधनार्थ मोडुनि चंदन-पर्यंक कर्ण विप्राशीं ॥ १०५ ॥

## कृपण.

सौख्योपभोग नच घे. द्रव्य-निधिहि लाभला जरी कृपण, ॥
श्वान तडाग-निवासी, चाटी जिव्हेंच अल्प उदक पण ॥ १०६ ॥
घेतां उपभोग न, धन-संचय करि कृपण तो परासाठीं ॥
उपभोक्ता जन दुसरा. जरि मधुंच्या[50] मक्षिका श्रमे सांठीं ॥ १०७ ॥
हांसे वदान्य पुरुषा कृपण सदां, न्याय हा असे उलटा. ॥
निज-दुर्गुण लपवाया, साध्वीला व्यर्थ निंदिते कुलटा[51] ॥ १०८ ॥
नच अर्पील कृपण धन. भर देउनि आणिलेंहि ओघाला, ॥
रडता राउत मारिल, घोड्यावरि काय बसविल्या भाला ?॥ १०९ ॥

## सधनता.

लोकीं वाचाल तरी, पुरुष प्रिय जो धनीं करी जोड ॥
अपवित्र मुखें असतां, धेनु क्षीरें जशी जगीं गोड ॥ ११० ॥
सर्वत्र मान धनिका मग जाती-हीन तो जरी असला ॥
मान धनें नोटीला जरि कागद चर्म-खंड तो असला[52] ॥ १११ ॥
धनिकाच्या वचनातें झेलुनि जन सर्व आर्जवीं वसती. ॥
भ्रमर-रसभरित-पुष्पीं करिती गुंजारवें सतत वसती ॥ ११२ ॥
धनवान् मूर्ख तथापि ज्ञानी तो ह्मणविलाच जाय जनीं.
येतां देवत्व, शिले[53] उपचारुनि लोक लागती भजनीं ॥ ११३ ॥
घोड्यावरुनि पडतां श्रीमानें घेतली उडी खालीं ॥
फुटलीहि बांगडी तरि, जन वदती वाढली यथाचालीं ॥ ११४ ॥
द्रव्यास वश सकलही. द्रव्य करी क्षितिहि हिकडली तिकडे. ॥
जल-मार्ग सरळ झाले. होते पर्वतहि उंच जेथ कडे[54] ॥ ११५ ॥

---

५० मधाच्या संचयाविषयीं. ५१ व्यभिचारिणी स्त्री. ५२ अशा प्रकारचा. ५३ पाषाणाला. ५४ पर्वताचे गेलेले उंच भाग.

गौरव मान मनुष्या नाहीं. सम्पत्तिलाच केवळ तो. ॥
येतां रसाल[५५] सुफळां, धांवूनि धनी तयाकडे वळतो ॥ ११६ ॥
दुर्घटहि अशा वचना द्रव्यें पडती रुकार, ये दुणेंता[५६] ॥
वदती नव महिन्याचा लोक. धानिक बैल गाभणा ह्मणतां ॥ ११७ ॥
गांठीं धन रक्षावें. क्रमावया आयुची खरी मजल, ॥
रक्षीच उंट कुक्षीं प्याया निर्जल वनीं पृथक् सुजल ! ॥ ११८ ॥
दे त्रास गोरगरिबां श्रीमानां लोक आर्जवें वंदी. ॥
नूतन वस्त्रीं कशिदा जन काढी परि जुन्या पटीं चिंधी ॥ ११९ ॥

## निर्धनता

निर्द्रव्य पुरुष होतां, जाती सोडूनि आप्तजन सगळे. ॥
सुकतां तडाग, तेथें वसतील कशास हंसही बगळे ! ! ॥ १२० ॥
होतां निर्धन जन, त्या कोणी न पुसे, न कोणिही लक्षी. ॥
अफलद्रुमास नेच्छुनि[५७] जाती अन्याश्रया त्वरें पक्षी ॥ १२१ ॥
निर्धनता तापद अति. देते अनिवार दुःख देहाला. ॥
निज वृद्धता शरीरीं कृशता आणून बहुत दे हाला[५८] ॥ १२२ ॥
चलतींत सर्व तत्पर दास्यीं, विपदीं त्यजूनि संगत ती, ॥
पुसती न सुहज्जन. ही सुकल्या पुष्पा न जेवि भृंग-[५९]तती ॥ १२३ ॥
द्रव्य-विहीन नरातें स्वकीय न पुसेहि दे न लघु मान ॥
सन्मान तात[६०]-सदनीं यज्ञीं पावे सती लव उमा न ॥ १२४ ॥

## स्वतंत्रता.

निजतंत्रते समान न सुख दुसरें, तीस मान सर्व मुभा. ॥
स्वच्छन्दें नारद मुनि राहे लोकत्रयीं क्षणांत उभा ॥ १२५ ॥

---

५५ आम्रवृक्ष. ५६ द्विगुणता. ५७ न इच्छितां. ५८ दुःखाप्रत. ५९ भृंगसमुदाय. ६० दक्षप्रजापतीच्या घरीं.

स्वातंत्र्यास न आटकें[६१], तद्वर्चस्वें जनास दरें[६२] भारी. ॥
सर्वोपरि अधिकारी स्वच्छंदें येतसे च दरबारीं ॥ १२६ ॥

## परतंत्रता.

व्यर्थ पराधीन जिणें लोकीं परतंत्रता बहुत खोटी. ॥
शल्याधीन रथ ह्मणुनि, युद्धीं कर्णास होय बहु खोटी ॥१२७
परतंत्रता परिसवी दुरुक्ति, बल तर्क दूर[६३] शंका ने.[६३] ॥
द्यूतीं विराट-हस्तें खावा कां अक्ष[६४]-घात कंकानें[६५] ! ! ॥ १२८ ॥

## कृतज्ञता.

रक्षी कृतज्ञ जन तो स्वाऽश्रयदा. कष्ट दुःख सेवून,॥
छाया करी. श्रम हरी. छत्र सहन करुनि वात जल ऊन ॥१२९
तोच कृतज्ञ पुरुष. पर-कृत-कार्य स्मरुनि होय उतराई,
कर्ण कृतार्थ जहाला ठेउनि तनु धनहि चित्त कुरुरायीं ॥१३०॥
आश्रयदा रक्षाया कृतज्ञ जन तनु-मनें धनें झटतो. ॥
स्वकरें अहंमद[६६] करी फ्रान्सिकोचें[६६] सुदूर संकट तो ॥ १३१ ॥

## कृतघ्नता.

आश्रयदास उपेक्षुनि, कृतघ्न जन होय अन्य कैवारी. ॥
दावुनि प्रकाश इतरां, धर्त्या ठेवी मशाल अंधारीं ॥ १३२ ॥
उपकार किती केला, उलटेल तरी कृतघ्न जन वेळीं ॥
डंखील सर्प त्या, जो पाजुनि पय नित्य सदयतें पाळी ॥ १३३ ॥
कृतघ्न-जन-संयोगें ज्याचें फळ त्यास कां न बाधावें ? ॥
ठेवू हस्त शिव-शिरीं भस्मासुर तद्वरोंचि बा धांवे. ॥ १३४ ॥

---

६१ बंदी. ६२ भीति. ६३ नष्ट करिते. ६४ फांशाचा प्रहार. ६५ धर्मराजानें. ६६ विद्याखात्यांतील मराठी पांचव्या पुस्तकांतील " एका तुर्क मनुष्यांची कृतज्ञता " ही गोष्ट पहा.

## कालमहिमा.

प्रतिकूल तेंचि होतें समयीं अनुकूल. काल-महिमा हा. ॥
जी एरव्हीं अशुभ, ती शंखध्वनि फाल्गुनांत शुभचि महा ॥१३५॥
प्रिय, तेंचि होय अप्रिय एक दिनीं. काल-गति विलक्षण ही. ॥
वरद[६७]-चतुर्थीस जनां अप्रिय हो सुखद चंद्र-दर्शनही. ॥ १३६ ॥
जी गोष्ट तुच्छ लोकीं, मान्य जनां होय काळ–ओघें ती. ॥
वरद[६७] चतुर्थीस दगड मारुनि, जन आपणा शिव्या घेती ॥१३७॥

## दैवाऽनुकूलता.

जन दीन भाग्य-कालीं श्रेष्ठत्वें पूज्य मान्य हो सकलां. ॥
दसऱ्यास आपटा द्रुम सन्मानें हेमसा जगीं विकला ॥ १३८ ॥
अनुकूल दैव तरि मग काय करावे अपाय थोरांनीं ? ॥
संरक्षिती खगम मधु पाजुनि, बाला शकुंतला रानीं ॥ १३९ ॥
अनुकूल काल येतां, शापहि आनंद-तोषकर होतो. ॥
शाप श्रावण-तातें देतां दशरथ सुपुत्र पावे तो ॥ १४० ॥
ये प्राप्त-काल-घटिका, मग दुर्घट कार्य हो सहज परतें[६८]. ॥
रामाऽनुकूल-कालीं झाले, जड दगड सागरीं तरते ॥ १४१ ॥
निज भोग दुःख सरतां होते सुटका न हालतां पोतीं[६९]. ॥
होतां वानर[७०]-दर्शन, पंख फुटुनि उडुनि जाय संपाती[७१] ॥ १४२ ॥
[७२]अनयाऽधर्मेंहि [७३]बरें होय खरें असलिया नशीब सुधें. ॥
पांडव राज्याऽधर्में हरुनि सुयोधन तपाऽब्द[७४] ढेंकर दे ॥ १४३ ॥
यश-कालीं सहज घडे कार्य न जें होय दीर्घ नवसांहीं ॥
अर्जुन-करें जयद्रथ वध झाला लपुनि सूर्य दिवसांही ॥ १४४ ॥

---

६७ गणेशचतुर्थी. ६८ पादपूरणार्थी अव्यय. ६९ पापण्या. ७० सुग्रीव हनुमंतादि पांच वानरांची भेट. ७१ पंख जळून समुद्रतीरीं पडलेला संपाती नांवाचा जटायुपक्ष्याचा भाऊ. ७२ अनय+अधर्में = अन्यायानें व अधर्मानें. ७३ कल्याण. ७४ बारा वर्षे पावेतों.

स्व सुयश-कालीं अघटित ये घडुनि, घडे न कार्य जें नवसें. ॥
समयास तांदुळांचें पेंव त्रिनोमॅलीं इंग्लिशां गवसे ॥ १४५ ॥
अनुकूल दैव-करणी, रंकाचा राव ती क्षणांत करी. ॥
गाइकवाड-पद-स्थित झाला राजा सयाजि शेतकरी. ॥ १४६ ॥

## दैवप्रतिकूलता.

राजा उदार होतां " दैवें कसें " एक दे अलाबु रिता ? ॥
नवल न ! अधिक न जल ये. कूपाहुनि कुंभ सागरीं भरितां,१४७
होईल धन-प्राप्ति न. नसल्या दैवांत गेलियाहि कुठें, ॥
वृक्ष समस्त वसंतीं पालवती, नेप्तिला न पान फुटे ॥ १४८ ॥
दैवानुसार घ्यावें. द्यावा अन्या न दोष अल्प फुका. ॥
पक्षी सर्व विचरती रव्युदयीं, परि दिसेन त्या उलुका ॥ १४९ ॥
ज्या ज्या समयीं जितकें, होणार प्राप्त, तेंच जन पावे. ॥
तृषितें चातक-खगमें स्वात्युदका मात्र तेवढें प्यावें ॥ १५० ॥
हतभाग्य जना लाभे काय फल ? श्रमहि केलिया अधिक, ॥
मूळ न आडांतच, मग ये कोठुनि पोहऱ्यांत तें उदक ? ॥१५१॥
प्राप्त घडी आल्याविण, चाले न शहाणपण, न तडफड ती. ॥
पडुनि प्रबल नवग्रह लंकेश-गृहीं मनांत तडफडती ॥ १५२ ॥
महदाश्रय जरि केला, तरि फल दैवाऽनुसार नर पावे. ॥
लागे तृतीय नेत्रें शिव-भाळस्था शशिस करपावें ॥ १५३ ॥
दैव-प्रधान. एका लाभे धन-निधि, दुज्या मिळे भलतें. ॥
जलनिधि-मथनीं हरिला श्रीप्राप्ति. मिळे हरा हलाहल तें॥१५४॥
फिरतां दैव, सुमित्राहि होतो वैऱ्यासमान कोपधर ॥
संरक्षी वनितेचा जो, तोचि दिव्यास मालवी पदर ॥ १५५ ॥

---

७५ मारिसकृत हिंदुस्थानचा इतिहास यांतील त्रिनोमालीची लढाई वाचा. ७६ गाइकवाड पदावर राज्यारूढ झालेला. ७७ भोंपळा. ७८ घुबडपक्ष्यास. ७९ जलदी. ८० समुद्रमंथनाचेठायीं. ८१ विष. ८२ स्त्रीचा.

फिरतां विधि,[८३] निज जिवलग बंधु परा मिळुनि, आपणा रगडी. ॥
रावण, बंधु बिभीषण मारी होऊनि रामचंद्र-गडी ॥ १५६ ॥
रक्षकाहि होय घातक होतां विपरीत काल, ना अवधी. ॥
नृप नारायणरावा विश्वासु सुमेरसिंग दास वधी ॥ १५७ ॥
ना धर्म-नीति कांहीं, एक खरी कीं ललाटची रेखा. ॥
धर्मेंच वर्तती नृप पांडव, मग त्यांस दुःख व्हावें कां ? ॥ १५८ ॥
दासत्वही करावें, न विटावें. जाणुनी समय कोणीं, ॥
घालीत सुदेष्णेची दासीत्वें द्रुपदजा [८४]वर्षेयन वेणी ॥ १५९ ॥
निज कार्यार्थ नृपेंही सादर व्हावें प्रसंग आल्याला. ॥
नरें[८५] विजय विराट-गृहीं चोळी कुंकुमाहि बांगड्या ल्याला ॥१६०॥
तळमळ काय करूनि फळ ? जंव ना ये सौख्य–कालची घटिका, ॥
मासिक कृष्णाहि वसे. चोरीचा [८६]आळ सोसुनी लटका ॥ १६१ ॥
सरल्याविण भोग्तृत्व, न हो सुटका तेथ जरि महा वशिला ॥
सुत कृष्ण असूनि बंधन का [८७]आनकदुंदुभीस देवाकिला? ॥ १६२ ॥

## उद्योग.

निज–कष्टाची भाकर बरी, परि नकोच तूप साकर ती ॥
श्वशुर–सदन–वासाची; अपमानुनि जी उठा बसा करती ॥१६३॥
बसल्या कोणच दावा ? प्राप्त सकल होय हालचालीला. ॥
हातीं पंखा, परि तो वायुस्तव पाहिजेच हालविला ॥ १६४ ॥
थोडें थोडें करितां कार्य घडे बहु, पुन्हां न बोभाट. ॥
वर्षांत पाठ होती नित्यैकें श्लोक तीनशें साठ ॥ १६५ ॥
सतताऽभ्यासें विद्या जाज्वल्यच. मलिन होय जरि न पढे, ॥
वापरती स्वच्छ असे. किल्ली परि [८८]बाजुचेस जंग चढे ॥ १६६ ॥

---

८३ दैव. ८४ एक वर्ष पावेतों. ८५ अर्जुन हा जगांत नर असतां. ८६ स्यमंतक मणि चोरल्याचा. ८७ वसुदेव. ८८ एके बाजूस पडलेल्या किल्लीस.

वारंवार उजळणी नसल्या, विद्या मनीं कशी उजळे ? ॥
ना चाळितां फिरवितां, पान सडे, हय अडेहि पोळि जळे.॥ १६७॥
अल्पाहि सततोद्योगें अवघडही कार्य सकल सुलभ घडे. ॥
कुरतुडुनि नाड दोरहि करिती मूषक सहस्रशः तुकडे ॥ १६८ ॥
सततोद्योगें यद्यपि दुर्लंघ्याहि वाट, होय तरि सोपी. ॥
इंग्लंड कशानें तरि फिरवी निज भरतखंडभरि टोपी° ?॥ १६९॥
उद्योगें दुष्प्रापहि होई नर योग्य वस्तुच्या संगा. ॥
उतरविली स्वर्गस्थहि निज पितरास्तव भगीरथें गंगा ॥ १७० ॥
कृत संकल्पोद्योगें, जन मागें सागरा न कां हटवी ? ॥
दे सिंधु पिलां आणुनि चंचुपुटें उदक उपसितां टिटवी ॥ १७१ ॥
लागा स्वतां. न होइल कार्य कधीं अन्य–भरंवसा धरितां ॥
" लावी पक्षीण पिलें " वाचा ही गोष्ट दाखल्याकरितां ॥ १७२ ॥

## आळस.

आलस्याऽधीन नरा ऐहिक सुख–भोग मोक्षही न मिळे. ॥
नित्य न देतां पाणी कां हिरवे राहतील बाग मळे ? ॥ १७३ ॥
सर्वत्र हाल होती. अलसें[८९] कथितां पळा अमळशाला, ॥
बसल्या जागीं आणुनि ज़न पांघरवील कोण तरि शाला ?॥ १७४॥

## ऐक्य.

परकेहि एक चित्तें होतां एकत्र, मान्य घरदारीं.॥
जंबीर लवण हळदी हिंग मिळुनि लोणचें रुचिर भारी ॥ १७५ ॥
वसतां ऐक्यें जन, तन्नाशा प्रबळ[९०] न शके उपाव[११] करूं ॥
नोहुनि[१२] रिघाव, *जाळी पक्क्या गठडींतला *न पावक रू॥ १७६॥
होय महाऽरिहि कुंठित. जों दोघे एकचित्त कायम रे ॥

---

० निजटोपी ह्म० आपला पगडा. ८९ आळसानें. ९० समर्थजन. ११ उपाय. १२ न होऊन. * जाळीत नाहीं.

पडला डाव कसा तरि, चौसर-बाजूंत जूग काय मरे ? ॥ १७७ ॥
एकोप्यानें मर्कट उचली ओझें प्रचंड पर्वतसें ॥
निर्जीव बाष्प ऐक्यें कार्य करी. करिति हय न [९३]खैवें तसें ॥१७८॥
एका जुटें परस्पर जन वर्त्ते, मग सुखास कां कमती ?॥
मनुजें सुखदुःखाच्या समयीं ध्यावी प्रसिद्ध [९४]कौक-मती ॥ १७९ ॥

## द्वैत.

द्वैत, करी वैर जनीं. गृह–देश–विनाश होय त्याजमुळें. ॥
सुकतील कां न? अटतां [९५]हृत्सर–सत्प्रेमनीर–[९६]सुखकमळें? ॥१८०॥
होतां द्वैत परस्पर, जवळ जन–विनाश–काळ ये; कळतो.॥
होइल आळा सुटतां पेंढीचा त्वरित कां न विस्वळ तो?॥ १८१ ॥
दोघांत कलह, तिसऱ्या लाभ रिपु–द्वैत द्यावयास निघे. ॥
[९७]मेंधवा दुर्ग शिवाजी घे. मालक दूर करुनि बंधु तिघे, ॥ १८२ ॥
अपसांत द्वैत सुदृढ होतां निज–सौख्य जन लया नेती. ॥
सांगाच. पेशवाई द्वैतें न तरी बुडे कशानें ती ? ॥ १८३ ॥

## थोरपणा.

जोखीम काळजी श्रम भारी. मोठेपणा अधिक जितका, ॥
ऐसें न ह्मणावें तरि, पावे थोरीस भूप कां इतका ? ॥ १८४ ॥
मोठेपणा फुका नच. ध्यावी लागेच झीज जन–कामा. ॥
टांकीचे घांव दगड सोसुनि, पावोचि देवपण–नामा. ॥ १८५ ॥
चांगुलपण मिळवाया तप लागे. क्षण नकोच भंगाया. ॥
तरु पुष्प–फलां याया कष्ट, पुरे एक घांव खंडाया. ॥ १८६ ॥
थोरी मिळे निजांगीं. घे सोसुनि कष्ट झीज जो, त्यातें. ॥
सच्छिद्र जाहल्यावरि, किंमत वाढे जगांत मोत्यातें ॥ १८७ ॥

---

९३ सख्या वि०. ९४ कावळ्याची बुद्धि. ९५ हृदयरूप सरोवरांतील उत्तम प्रेमरूप जल. ९६ सौख्यरूप कमलें. ९७ पुरंदरनामें किल्ला.

ये योग्यतेस जन. जो न विटे कामीं कितीहि लादाना, ॥
वाजी केवळ सुगुणें वाढवुनी खाय आपला दाणा ॥ १९८ ॥

## थोरांशीं स्पर्धा.

जाणुनि आत्म-बल न, रिपुवरि करितां चाल, होय नाश पळें[९८]. ॥
झडपूनि दीपकातें, तत्क्षणिं दुर्बल पतंग होरपळे ॥ १८९ ॥
थोराशीं स्पर्धा जन करितां आपणचि नाश पावे कीं. ॥
फोडूं नारळ जातां, शुक पावे चंचु-भंग अविवेकी[९९] ॥ १९० ॥
थोराशीं नम्रपणा धरितां हित. नाश केलिया चढती. ॥
जलपूरीं लोहाळे तगती. वृक्ष प्रचंड उन्मळती. ॥ १९१ ॥
न बरोबरी बरी कीं थोराची, देत कालिमा स्वजनीं. ॥
कृष्णमुखी होय जगीं गुंज. करुनि हेम-साम्य तें वजनीं, ॥१९२॥

## धैर्य.

धीर-पुरुष आपण घे संकट. सुख भोगिती पर तथापि, ॥
जलनिधि-मथनीं अवघे देव पिती अमृत. शंकर विषा पी ॥१९३॥
निज संकट धीर-चतुर पुरुष न डगमगुनि युक्तिनें वारी. ॥
होय शिवाजी यवनाऽधिप[१००]-बंध-विमुक्त बसुनि पेटारीं ॥ १९४ ॥
समरांत धीर-जन-शिर पडतां गाजे जगांत तो वीर. ॥
खुडितांहि धीर-शब्दीं धीचें[१००॥] शिर, शब्द राहतो वीर ॥ १९५ ॥

## शौर्य.

स्त्री, नर, भेद न शूरीं. स्त्री, न नरा दाखवील कां सोटा ? ॥
नर बापु गोखल्याचा हलवी तेलिण[१०१] रणांत कासोटा ॥ १९६ ॥
अंगस्वभाव उपजत. शूरीं ना भेद कंचुकी[१०१॥], बाही. ॥
निजशौर्यें रण हलवी झांशीची धनिण लक्ष्मीबाई ॥ १९७ ॥

---

९८ एका क्षणेंकरून. ९९ अविचारी. १०० दिल्लीपति औरंगजेबबादशहाच्या कैदेंतून मुक्त. १०१ श्रीमंत पंतप्रतिनिधीची तेलीण संज्ञक राख वासोटा किल्याची अधिकारीण. १००॥ धीर शब्दांतील धी या अक्षराचें. १०१॥ कंचुकी शब्दानें स्त्री, आणि पुढील बाही शब्दानें पुरुष असा अर्थ घ्यावा.

समयीं स्त्रोही शीर्यें धरवी निजपाद नरवराकरवीं.॥
श्रीमदहल्याबाई राघोबाचाहि मोरच्या फिरवी ॥ १९८ ॥

## कर्तृत्व.

ज्याचें कर्तृत्व तया. न पित्या-पुत्राहि एकमेकांचे. ॥
दिल्लीपतिस शिवाजी भिववी, संभाजि त्यापुढें नाचे ॥ १९९ ॥
कर्तृत्व ज्यास त्याचें. पुत्रा जनका न एकमेकांचें. ॥
प्राशी अगस्ति जलधी. तज्जनक-घटांत अल्प जल सांचे ।.२००॥

## स्त्रीस्वभाव.

स्त्रीपाशीं न वदावी पुरुषें गुज गोष्ट, गोत माहेर ॥
नमतां फुटेल. जैसी तटिनी-भरतींत लाट बाहेर ॥ २०१ ॥
स्त्री-बुद्धि-वश-पुरुष तो हतवीर्यचि होय. जरिहि वाघोबा, ॥
स्त्री-नादें[१०२], प्राज्ञहि तरि, होय अधोमुख जगांत राघोबा ॥ २०२ ॥
स्त्री-मुष्टींत पुरुष जो आला, त्याचें समस्त मोतेरें. ॥
स्वकरागत-घरटातें[१०३] वनिता देती असंख्यशः फेरे ॥ २०३ ॥
द्याया दुःख पतीसहि न चुके स्त्री आत्महेतु-सिध्यर्थ. ॥
धाडुनि सुत राम वनीं करी पतिस कैकया प्रशोकार्त ॥ २०४ ॥
पर्ख्यहिताहि करण्याला स्त्री-चित्तीं ना वसे दया-नीति ॥
तात-मुखें शापविती झाली नवंग्यास देवयानी ती ॥ २०५ ॥
आत्मच्छंदीं गोंवुनि नारी पुरुषास घालवी गरके ॥
निज तंत्रेचि पतंगा दोरी फिरवी जरी नभीं फिरके ॥ २०६ ॥

## देहस्वभाव.

किति बोधिलेंहि केलें, न सुटे मूळ स्वभाव आणिं तऱ्हा. ॥
धनि चारितांहि पेढे, खाया हाडूक धांव घे कुतरा ॥ २०७ ॥
मूळ स्वभाव न सुटे. मारी हाका जरी स्वतां यम तो, ॥

---

१०२ आनंदीबाईच्या नादानें. १०३ हातांत आलेल्या जाय्यास. १०४ नवऱ्याचें अकल्याणही. १०५ पती जो ययातिराजा त्यास.

जाळूनि राख केल्या राही दोरीस पीळ कायम तो ॥ २०८ ॥
न सुटे अत्युपचारहि केल्या ज्याचा स्वभाव जो मूळ. ॥
करितां स्वच्छ धुवूनी उडवी गज तत्क्षणीं शिरीं धूळ ॥ २०९ ॥
वृद्धत्व ये तथापि, प्रबळ न जाईल ज्यास जी संवय. ॥
स्त्री यौवनीं शिनळ, ती हो ई देन पावतांच वृद्ध वय ॥ २१० ॥

## हितेच्छुवाक्यऽमान्यता.

हितकर्ता, कटु वचनें, वाटे न मनीं जनां कधीं गोड ॥
न रुचे कट्वौषधि जरि, करिते देहस्थ रोग-निर्मोड ॥ २११ ॥
हृदयीं भरे दयारस, वरुनि गमे तरि कठोर हितक-वच ॥
मधुरोदकेंचि भरलें, श्रीफळ तरि वर गमे काठिण कवच ॥२१२॥
पावे व्यक्ति[१०६] श्रम ती. हितवचनीं मानिं विकल्प भाव जिच्या, ॥
सीता बंधन पावे. धरितां वचनीं कुभाव भावजिच्यीं[१०७] ॥ २१३ ॥
क्षय पावे. ज्यानें नच हितेच्छुवचनास ऐकिलें कानीं, ॥
मानूनि विदुर–नीति न, केला कुलनाश अंध-लेंकांनीं[१०८] ॥ २१४ ॥
कल्याण होय. कोणीं कथितां हितवचन, ऐकतां साचें, ॥
औरंगजेब वांचे अवलंबुनि सांगणें[१०९] स्वदासाचें ॥ २१५ ॥

## अतिशयता.

अतिपरिचयातिगमनें, मान न पुरुषास खास तोराही. ॥
रवि-निशाऽऽगमनानें त्याचा राहे जगीं न तोरा ही ॥ २१६ ॥
समयानुसार ओघें जातां, पुरुषास सर्व आदरिती. ॥
शुद्धद्वितीयतिथिगत चन्द्रा जन वंदिती प्रमोद-रितीं ॥ २१७ ॥
होते साहजिकच अतिगमनादतिपरिचयादनाऽसक्ति ॥
घरजांवयास न पुसे सासूहि न इतर ऐकती उक्ति. ॥ २१८ ॥

---

१०६ मनुष्य. १०७ लक्ष्मण दिराच्या. १०८ धृतराष्ट्र पुत्रांनीं. १०९ भावाच्या लढाईत हत्तीवरून न उतरण्याविषयीं सामान्य सेवकाची सूचना मानल्यामुळें औरंगजेबाचें रक्षण झालें.

सांनिध्यें अप्रियता, दूरत्वें लालसा जगांत वसे.
करिती परस्थ यात्रा, स्नानहि तीर्थस्थ टाळिती नवसें ॥ २१९ ॥
नसल्यास इच्छिती जन. सान्निध्यें हेळसांड बहु करिती ॥
मिष्टान्न पित्या श्राद्धीं दे कुसुत नपरि जित्यास भाकर ती ॥२२०॥
अतितरता कोण्याही गोष्टीची सत्य हानिकर होते. ॥
पाताळीं बलिराजा अतिदानें जाय आपल्या हातें ॥ २२१ ॥

## स्वार्थसाधकता.

भक्तीनें नच पुसती. कोणी कोणास नसलीया स्वार्थ, ॥
कुळधर्म, तळी भरणें, देवासाठींच बोलणें व्यर्थ ॥ २२२ ॥
निष्काम भक्तिनें जन आचरिती, कर्म कोणतें न दिसे. ॥
दुग्धांऽर्थ[110] गुप्त ठेवुनि, गाई जन पाळितात पूज्य मिषें ॥ २२३ ॥
कोणीं निरपेक्ष जनीं धर्मेच्छु असा विलोकिला दाता ? ॥
बुधजनहि अर्पिता न स्वमुखें नैवेद्य देव जरि खाता. ॥ २२४॥

## पूर्वावधानता.

ताब्यांतुन गेल्यावर काम, तयाचा करूं विचार नका. ॥
सुटला हातांतुनि जो बाण, तुह्मां जाय तो विचारुन कां ? ॥२२५॥
हातांत गोष्ट, तोंवरि करावया ती न घ्या तुह्मी झोंपा. ॥
गेल्यावरि बैल निघुनि, लावुनि फळ काय दारचा झोंपा[111] ॥२२६॥
गेल्यास गोष्ट हातुनि, होय तिचें परतणें कठिण पुढतीं. ॥
गुण तुटतां वावडिचा, हातीं येईल कां परत धड ती ? ॥ २२७ ॥

## ममता.

मायेविण[112], मायेचा[113] चुलत्या वहिनींत मात्र बोभाटा.
ज्याची कळकळ साला, या बोटाचें न दुःख त्या बोटा. ॥२२८॥

---

११० दुग्धाचा अर्थ म्ह० प्रयोजन. १११ फाटकाचें दार. ११२ आईशिवाय.
११३ ममतेचा.

सापत्न माय आवाहि घालुनि पुत्रीं करी प्रलोभ दया. ॥
कैची मनीं विकलता ! ज्या मोलें घातलें रडूंच तया. ॥ २२९ ॥

### प्रेमागत्य.

स्वागत्यीं कडबोळें गोड, नको हेलसांडिची जिलबी.
कां ? मटमट विदुराच्या कृष्णें स्वीकारिल्या कण्या सुलभीं[११४] ॥२३०॥
आवड हीच खरी कीं, भासे भरतां मनीं खरी[११५] घोडी. ॥
अष्टावक्र जरि, तरि कुब्जा-संगीं धरीच हरि गोडी. ॥ २३१ ॥
नलगे मान अनास्थें, प्रेमें नुसती विचारपूस बरी ॥
कां ? ग्रहण करी राघव बोरें उच्छिष्ट, अर्पितां शबरी ॥ २३२ ॥

### गरज.

जोंवरि गरज, तंव पहा, जन सारे आर्जवांत. सरतां ती, ॥
कोणी न पुसे. जैसा कुसुत करी वृद्धतीं विसर तातीं. ॥ २३३ ॥
कार्यच तोंवरि जी,[११६] जी,[११६] जातां सिद्धीस ओळख नुरे ती. ॥
नावाड्या कोण पुसे ? नदी तरुनि लागतां पदां रेती. ॥ २३४ ॥
गरजीं दावुनि आर्जव, सरतां जन जाब देतसे उलटा. ॥
मोहें सर्वस्व हरुनि, अंतीं पुरुषा विचारिना कुलटा[११७] ॥ २३५ ॥
गरजेसमान लोकीं न पदार्थ अमूल्य कोणता दुसरा. ॥
चर्मक[११८]–गृहास खेटे. जन जोड्यास्तवहि उगवतां दसरा. ॥२३६॥
अक्कल न गरजवंता. अमान्याहि वचन मानितो अवघें. ॥
रोख्यांत[११९] सवाशांच्या[१२०] ऋणको रुपये करीं तिर्‍याण्णव[१२१] घे. ॥२३७॥
न कळे कोण्या काळीं लागे कोणास कोणती गरज. ॥

---

११४ सहज रीतीनें. ११५ गाढवी. ११६ हांजीहांजी. ११७ व्यभिचारिणी. ११८ चांभाराच्या घरास. ११९ खांदेखिस्तीच्या रोख्यांत. १२० शंभर रुपये मुद्दलाची सवाई. १२१ मनोती, खिचडी, बाळाजी आणि फेडीचा प्रथम हप्ता, इतकी रक्कम मुद्दलांत वजा करून बाकी.

द्विज[122]-राज-हेतु व्हाया विफळ, नमी सिंधु झुरळ-[123]पौंदे-रज ॥२३८॥
समजूं नये नृपेंही दीनाची गरज आपणा कैची ? ॥
सोन्यास गरज लागे कळवाया निजमहत्व, गुंजेची. ॥ २३९ ॥
नृप-दरबारीं साधन हुजऱ्याची प्रथम भेट वरदीला. ॥
हेमा घ्यावी लागे कसोटिची गांठ व्हावया मोला. ॥ २४० ॥
थोरा न लहानाची गरज, असें काय हो ह्मणो शकता ? ॥
दृढतेस पांचरेची दांड्यास कुऱ्हाडिच्या अवश्यकता ॥ २४१ ॥

### लालूच[124].

अवदानें स्वष्टहि जन-मन पघळे जिरुनि पूर्विची रग ती. ॥
देतां ओंगण, चाले करकर राहूनि रथ समीर-गती. ॥ २४२ ॥
देतां अवदान मुखीं, रावाहि राखील आपली परवा. ॥
निरसु[125] मृदंगाहि करितो देतां गोधूम-पिष्ट मधुर-रवा ॥ २४३ ॥

### जनरीति.

गुणवान् असो कितीकाहि, ह्मटलें कोणा न चांगलें कवणें. ॥
उत्तम षड्रस-भोज्यीं ह्मणतात कढीस मीठ होय उणें. ॥ २४४ ॥
न मनीं भरे. कितीकाहि केलें तरि, लोक-रीति ही उमगा. ॥
झाल्या गायन, शेवट जन ह्मणती, एक चीज उत्तम गा. ॥२४५॥
करितो, त्यावर करिती कामाची लोक लादणी पुरती. ॥
झाडुनि केरसुणीनें टाकाया केर तिजवरिच भरिती. ॥ २४६ ॥

### दुष्कर्मप्रवृत्ति.

सोडुनि जन सत्कर्मा, प्रेमोल्हासें कुकर्म आचरती. ॥
हरि-कीर्तनीं न जातां, लोक तमाशास धांवती, झुरती. ॥ २४७ ॥
सुपथीं द्रव्य न वेंचुनि, करिती धन-मुष्टि दुष्पथांत रिती[126] ॥
ओंवाळणी न भजनीं, दौलज्जादेस हात वर करिती. ॥ २४८ ॥

---

१२२ श्रीपरशुराम. १२३ परशुरामानें समुद्र हटविण्याकरितां सज्ज करून ठेविलेल्या धनुष्याची प्रत्यंचा कुरतुडण्यासाठीं झुरळाच्या पायाची धूळ. १२४ लालूच. १२५ निर्जीव. १२६ रिकामी.

## काम.

कामार्त पुरुष होउनि, पडती दुर्वर्तनीं लव न शंका. ॥
गुरुपत्नीशीं लंपट होउनि पावे शशांक विकलंकीं[127]. ॥ २४९ ॥
काम परस्त्रीविषयीं धरितां, तो होय शीघ्र हानिकर. ॥
राम-स्त्रिस्तव रावण मृत होय करूनिया महा निकर. ॥ २५० ॥
काम-व्यथिता राही लाज, भय, न मीहि कोण ! हें स्मरण. ॥
सैरंध्री साध्विला कीचक मोहूनि पावला मरण. ॥ २५१ ॥
सुंदर वनितों[128]–पाशीं बद्ध न हो जन जगांत ऐसा न. ॥
स्वर्गास ने करूनी विश्वामित्रास मेनका श्वान. ॥ २५२ ॥
विरला जन. नव रामा होतां वश, तीस जो न रंगेला, ॥
मनसंयमनें वदला " जननी " शुक मुनिच एक रंभेला. ॥२५३॥
मन्मथ-सुरी नव स्त्री. कांपिल नर-हृदय कां न तल्लीला ? ॥
मोहित महेश झाला. पाहुनि हिमनगदरींत भिल्लीला ॥ २५४ ॥

## क्रोध.

अविवेक-मूलक असा शत्रु क्रोधासमान ना मनुजा! ॥
क्रोधें जमदग्नि कथी निजभार्येला[129] वधावया तनुजा[130]. ॥ २५५ ॥
क्रोधावेशीं भरतां, काय जन करील, नेम ना कांहीं. ॥
दिधल्या स्त्रिया पतींनीं हांकुनि कांपूनि थाननाकां ही. ॥ २५६ ॥
जन सहज दुःख पावे अविचारें कोप जर महा केला. ॥
पावे खेद कविसुता[131] पतिच्या कोलूनि[131॥] नरम हाकेला ॥ २५७ ॥

## लोभ.

लोभ धरुनि पर-धन हरि अनयें, जन तो न बहुत काल टिके. ॥
मृत होय, पांडवांशीं दुर्योधन खेळ खेळुनी लटिके. ॥ २५८ ॥
अतिलुब्धता मनुष्या दुःखाच्या गुंतवी सुदृढ पाशीं. ॥

---

१२७ अधिक कलंकातें. १२८ स्त्रीच्या मोहपाशांत. १२९ आपली जी स्त्री रेणुका तीस. १३० मुलगा जो परशुराम त्यास. १३१ देवयानी. १३१॥ ढुशारून.

मधु-लोभें गुंतावें लागे कमलीं निशांत[१३२] मधुपाशीं. ॥ २५९ ॥
कष्टा श्रमा न पाहे. जाणे वित्तास मात्र धन-लोभी. ॥
धान्य यथेच्छित भक्षी बाजारीं वसु[१३३] न सोडण्याला भी. ॥२६०॥
प्रतिग्रहास चटकला, नन अपमानीं न तो करी परवा. ॥
गजकर्ण-हत[१३४], तरि कटीं[१३५] दानेच्छेनें[१३५॥] करी द्विरेफ[१३६] रवा[१३७] ॥ २६१ ॥
तृष्णा भार्या वरितां, लाज न शंका विचार तो राही. ॥
ताडुनि बद्धाहि केलें, सोडियलें कां स्वकर्म चोरांहीं ? ॥ २६२ ॥
भोग-प्राप्तीच्छा नन करितो. मरणींहि टेंकला धरणीं, ॥
भुजग-ग्रासिताहि मंडुक, तत्पर राही झषांचिया[१३८] धरणीं ॥ २६३ ॥
श्रम पावशील. परधन-हरणीं हे नरवरा कधिं न घूसें[१३९]. ॥
अल्पाऽऽमिषार्थ पावे दृढ बंधन सांपळीं त्वरित घूस ॥ २६४ ॥
लोभी हव्यासी जन, नेणे माया दया न भी पापा. ॥
औरंगजेब मारुनि राज्यास्तव बंधु, बंध[१४०] दे बापा ॥ २६५ ॥

## मोह.

संसृति-मोहाऽऽवर्तीं[१४१] खाय गटगळ्या पडूनि मानव तो ॥
कोणीहि न कोणाचें समजुनि, पथ तोचि त्यास मानवतो ॥२६६॥
देह क्षणिकच. कांहीं वाटे त्याहुनि न अन्य जरि सरसें, ॥
जरि रम्य मनोहर, तरि उदकाचा बुडबुडा क्षणीं निरसे ॥ २६७ ॥
दो दिवसाच्या तनुची मानावी काय शाश्वति नरा हे ! ॥
अतिरम्य तेरड्याच्या पुष्पाचा रंग तीन दिन राहे. ॥ २६८ ॥
नुमजे. क्षणभंगुर हा गृहधनकांतासुतादि भव-खटला, ॥
कोठें कांहींच नुरे. पाण्याचा जेवि बुडबुडा फुटला. ॥ २६९ ॥

---

१३२ रात्रभर. १३३ पोळ. १३४ हत्तीच्या कानांनीं ताडित. १३५ गंडस्थळीं १३५॥ मदस्रावाच्या इच्छेनें १३६ भुंगा. १३७ शब्दातें. १३८ मत्स्य. १३९ घीरें. १४० कैद. १४१ संसार. संबंधी मोहरूप भोंवऱ्यांत.

दृश्य सकल जायाचें समजुनि, मोहें पुन्हां नुमजतो कीं. ॥
वैराग्य तें श्मशानीं पावुनि, जन सर्व खटपटिस घोंकी ॥ २७० ॥
माझें माझें ह्मणतां गेला विसरून त्या जगज्जनका. ॥
स्त्रीच्या छंदीं गुंतुनि निजपितरातें पुसे कुसुत जन का ? ॥२७१॥

## मत्सर.

मत्सर–तस्कर मानस–गृहिं शिरुनि ऐक्य–धन समस्त हरी. ॥
धनगर-वाड्यांत हळुच शिरुनी वृक, मेंढरांस फस्त करी. ॥२७२॥
मात्सर्यें द्वेष मनीं उपजुनि गृह-नाश होय, हें उघडें. ॥
त्या शतहि धार्तराष्ट्रां पंडुसुतीं करुनि वैर मृत्यु घडे. ॥ २७३ ॥
परनाशनार्थ ईर्ष्यें स्वाऽहिताहि करूनि घ्यावया ना भी. ॥
यास इसांपनितींतिल गोष्ट उदाहरण " मत्सरी, लोभी " ॥२७४॥

## अहंकार.

तरले कोण करोनी सुहृज्जनांशीं अहंपणा गर्व ? ॥
शिशुपाळादिक खल ते प्रबळहि, मेले अधोगतीं सर्व ॥ २७६ ॥
" अभिमानाचें खालीं घर, " ही ह्मण काय हो असे लटकी ?
भीष्में कृष्णाकरवीं विजय-रणीं शस्त्र धरविलें झट कीं ॥ २७७ ॥
कां विश्व न वश होइल जेथ अहंभाव सर्वहि गळाला ? ॥
दे नामदेव-सदनीं विश्वंभर गोदडीस ठिगळाला ॥ २७८ ॥

## विद्यानुभव.

व्यर्थचि. पुष्कळ विद्या पढला, अनुभव न पैं[१४२] तिचा कांहीं ॥
काशी प्रयाग नुमजे. जरि घेतालें भुवन-[१४३]पर्यंति चौकींहीं ॥२७९॥
हृदयीं न बिंबली, ती कामाची काय पुस्तकी विद्या ?
रोखीं धन लाखाचें व्यर्थ. करीं[१४५] जरि न पावली[१४६] सद्यां[१४७], ॥ २८० ॥

---

१४२ परन्तु. १४३ भूपर्यटन १४४ गाडीच्या चाकांनीं. १४५ हातीं. १४६ १/४ रूपाया. १४७ पाहिजे असल्यावेळीं.

### सत्पुत्र.

पुत्रैक धन्य ! ! जननी-जनकाच्या शुश्रुषीं न जो विटला. ॥
पितृभक्त पुंडरीकें केलें भीमातिरीं उभे विठला ॥ २८१ ॥

सुजनैकाचि पुत्र पुरे. नलगे शत, नीतिमार्ग-संहरते ॥
ध्रुव एक कुला तारी. स्वकुलांतक धार्तराष्ट्र शंभर ते ॥ २८२ ॥

धन्यैक पुत्र ! ज्याचा वाजे सत्कीर्तिचा जगीं डंका. ॥
सीता-शुद्धि करुनिया हनुमंतें जाळिली स्वयें लंका ॥ २८३ ॥

सुत धन्य तो ! पित्याहुनि गाउनि यत्कीर्ति देश सं[148]द्वर्दतो ॥
पळवीत विष्णुशास्त्री स्ववितर्क[149]षायें जनां[150]ऽज्ञ-हृद्गद तो ॥ २८४ ॥

### पतिव्रता.

साध्वी-प्रभाव-तेजापुढतीं नच दीप्ति अग्नि-तेजाची. ॥
[151]सति-शाप-भयें हुतवह होउनि शीतल, न तत्सुतो[152] जाची ॥२८५॥

धन्या पतिव्रता स्त्री ! जगतीं देईल कोण ताप तिला ?
सावित्रीच्या वचनें यमहि तिच्या जीववी मृता पतिला ॥ २८६ ॥

साध्वी धन्या तीच ! न ठेवी जीवित्व पतिविना सवतें ॥
[153]जयदेव स्वामि-निधन परिसुनि झाली तदंगना शव ते ॥ २८७ ॥

त्रैलोक्य-सौख्य नांदे सा[154]ध्व्युटजीं. तीस काय आबाळ ? ॥
विधि, हरि, हर, अनुसूया-धामीं होऊनि रांगती बाळ ॥ २८८ ॥

### सद्गुरुनिष्ठा.

विद्या-प्राप्ति तरि घडे केल्या गुरु-दास्य तें स्वतनुकष्टें. ॥
संदीपन-गुरु-धामीं श्रीकृष्णें वाहिलीं शिरीं काष्ठें ॥ २८९ ॥

---

१४८ प्रेमानंद पावतो. १४९ आपल्या विद्यारूप काढ्यानें. १५० अज्ञजनांच्या हृदयांतील रोग १५१ श्लोकार्ध "पतिव्रताशापभयेनपीडितो हुताशनश्चंदनाबिंदुशीतलः" १५२ पुत्राला. १५३ प्रसिद्ध अष्टपद्याकार १५४ साध्वीच्या झोंपडींत.

जन कां न सिद्धि पावे होतां गुरु-सेवनीं न ऊनें[१५५] केंचं[१५६] ? ॥
पावे कवि-प्रसादें संजीवनीसिद्धि जीवसूनु[१५७] कच ॥२९०॥

### आत्मसंयमन.

विरला जन नव रामा होतां वश तीस जो न रंगेला. ॥
निज-संयमनें वदला "जननी" शुकमुनिच एक रंभेला ॥२९१॥
जो निग्रह चित्त, यमाहि घालूं न शके तयावरति घाला. ॥
शुक मुनि वश न जहाला पवमान, वसंत, [१५८]रतिवर, तिघांला॥२९२॥
सुंदर ललना-वशतीं निज-संयमनें क्वचिज्जन न मळला ॥
काशी नृपीं[१५९]ऽऽत्मजा वश, ना भीष्म-ब्रह्मचर्य-नग ढळला ॥२९३॥
स्वकराऽऽगता नव स्त्री नाऽऽलिंगिल, जन क्वचित् असा अवनीं॥
प्राप्त म[१६०]स्तांनीप्रति श्रीचिमणाजीअपा ह्मणे वहिनी ॥ २९४ ॥

### ईश्वरचिंतन.

परमेशीं लक्ष्य असो. अवयव गुंतोत सर्व कामाशीं. ॥
गुणें[१६१] हातीं, परि सारें आकाशीं लक्ष्य वावडीपाशीं ॥ २९५ ॥
परमेश्वरीं लय[१६२] असो व्यवहारीं गुंतला स्वदेह जरी. ॥
भ्रमुनि स[१६३]कैल, वरचेवर येउनि मातेसि बाळ दे हजरी ॥ २९६ ॥
श्रीशीं चित्त असो, जरि कामीं पळघटिकरूनि तासें[१६४] गळे ॥
स्वशिरोधृत जल-कुंभीं नारीचें लक्ष्य चालतां सगळें ॥ २९७ ॥
प्रभु-चरण ध्यास असो आसन-शयनींहि भोजनाऽऽगमनीं ॥
देशांतरींहि वसतां कृपण ध्यातोचि गुप्त ठेव मनीं ॥ २९८ ॥

### सर्वसामान्यस्फुटप्रकरण.

सदयें साह्य करीलचि, त्यापाशीं दुःख-वचन भाकावें. ॥

---

१५५ उणा १५६ किंचित्. १५७ बृहस्पतीचा पुत्र. १५८ मदन. १५९ काशी-राजाच्या तिघी मुली. १६० या नांवाची रूपयौवनसंपन्न शत्रुपक्षाकडील यवनी स्त्री दिल्लीचें संग्रामांत प्राप्त होऊन तसि भावजय मानून बंधु १ ले बाजीराव यांस आणून दिली. १६१ दोरी. १६२ एकाग्रता १६३ चोंहीकडे. १६४ वालुकायंत्र.

फारितां टाहो चातक, हरिति तृषा स्वाति-मेघ वर्षावें ॥ २९९ ॥
लोकां गरीब, तैसा कामीं श्रीमन्त ये न गोष्ट खरी. ॥
तृष्णा तृषित जनाची कूप हरी, जलधि त्या निराश करी ॥३००॥
थोरां न जें घडे, तें कार्य करी नीच झडकरी अवघें ॥.
तरुग्रीं सहज चढे मार्जार, व्याघ्र त्याकडेस बघे ॥ ३०१ ॥
कर्तव्याऽकर्तव्यीं पुरुषा न उरे विचार राज्य मदें. ॥
इंद्रपदस्थ नहुष नृप यानीं[१६५] ब्रह्मर्षि जोडुनी श्रम दे ॥ ३०२ ॥
निज-कार्य-साधनातें लघुता बुधजनाहि धरुनिया रुवतो. ॥
बलि-राज्यास हराया बटु वामन[१६६] होतसे रमाधव तो ॥ ३०३ ॥
हीनत्व येइ, *करितां श्रेष्टासाहि *याचना क्षण न लगतां. ॥
लक्ष्मी-कांताहि पावे बलि-धामीं भूमि-याचनीं लघुता ॥ ३०४ ॥
स्वमुखें निजगुण-महिमा वर्णन करितां, न तोषकर हो तें. ॥
स्त्री काय सौख्य पावे स्वस्तन मर्दूनि आपल्या हातें ? ॥ ३०५ ॥
व्यक्तिप्रत प्रकृति[१६७] तो एके बीजींहि भिन्न आढळते. ॥
उत्पत्ति स्थल दीपक, परि भिन्नगुणी प्रकाश कज्जल तें ॥३०६॥
पूज्यच समर्थ जन, तद्द्वार-श्वानाहि मान बहुत पण. ॥
शिवलिंगा जन पुजुनी धरिती तद्वहन नंदिचें वृषण ॥ ३०७ ॥
अति सरळता स्वभावीं न भली भलि वक्रता लवाहि जगतीं. ॥
साग तुटे सरळपणें. वक्रपणें, अन्य वृक्ष बहु जगती. ॥ ३०८ ॥
जाणे न एक विद्या मात्र धरी जन गुणीं शतीं लाहो. ॥
उपयोगीं एक न, मग चिंध्या भाराभरी कशाला हो ! ॥ ३०९ ॥
सोसावें दुःख नरें अवलोकुनि भाविच्या सुखा कां न ? ॥
भूषार्थ सान मुलगी टोंची हर्षें स्वनासिका कान ॥ ३१० ॥
सन्मान्यता, सुफलता, प्राप्त न अल्पा श्रमा गुणा फोलीं[१६८] ॥
अल्पाहारी दुग्धी गाय मिळे काय अल्पशा मोला ? ॥ ३११ ॥

---

१६५ पालखीला १६६ खुजा (लघुरूपधारी.) १६७ स्वभाव. १६८ पोकळ अशा.

गृहशिक्षेविण न मुलें धरितीं व्यवहार-मार्ग निज छंदीं ॥
तेजास धूत वस्त्रें ना येती जरि न इस्तरी कुंदी ॥ ३१२ ॥

निर्माल्य होय जन तो जातां सत्ता नृपाऽधिकाराचा. ॥
पावेल धाक जन कां पडतां अहि-दंत तो विखाराचा ? ॥३१३॥

बंधु स्वसाहि ललना सुत न सुता प्रिय जिवाहुनी अपलें. ॥
[१६९]टांकीं बुडतां, घाली पादतळीं वानरी स्वकीय पिलें ॥ ३१४ ॥

अनिवार हो क्षुधा बहु ! ! नेणें मायाहि लोभ कीं नातें. ॥
राहुनि उभी सुत-शवीं गांधारी खाय चिंचपानातें ॥ ३१५ ॥

घ्यावें ऋणानुबंधें, होती परके स्व, आणि निज परके. ॥
मृग-वत्सा दुग्ध अजा पाजी, बोका पिलांवरी गुरके ॥ ३१६ ॥

ज्या मार्गांत वळविली, त्यांत वळे बाल-बुद्धि निज काजें ॥
नव सरल वेणु[१७०] लवुनी पालखिला दंड होउनी साजे ॥ ३१७ ॥

मन तुटलें, विटलें, तरि पूर्व-प्रेमीं पुन्हां वसे कुठलें ? ॥
उपचारींहि न जडलें, सन्मौक्तिक एकवार जें फुटलें ॥ ३१८ ॥

व्यर्थचि वटवट केली जरि न तशी योग्य दाविते करणी. ॥
वाणुनि शूरत्व गृहीं घे धाक विराटराय-तोक रणीं ॥ ३१९ ॥

नाश घडे, थोर जनीं कोणीं उपहास जरि पहा केला. ॥
मृत होय परिक्षिति नृप देतां ऋषि-पुत्र शाप-हाकेला ॥ ३२० ॥

दृढ पक्ष एकचि धरी, पावे जन तो जगांत थोरविला. ॥
कौरव-पक्षें युद्धीं दे कर्ण पित्या प्रमोद तो रविला ॥ ३२१ ॥

लाभे सुख जन, कार्मी करि धांवाधाव जंव असे अवधी. ॥
गृह बांधिल्याहि आधीं कूपाची सिद्धता करीच सुधी ॥ ३२२ ॥

झाकुनि कुलांगना निज गृह-वैगुण्यास, सौख्य दे पतितें. ॥
पागोटें वर घडिनें छिद्राऽऽच्छादुनि, धन्यास शोभवितें ॥ ३२३ ॥

---

१६९ हौदामध्यें. १७० वेळू.

नसल्या मीठ, हकाटी करुनि, पतिस लाज देत कुत्या स्त्री. ॥
स्वच्छिद्र उघड दावी. आंगरखा कुटिल खल सकल वस्त्रीं ॥३२४॥
नीचाऽल्पहि धन-लाभें होउनि मानी, प्रजल्पना करितो ॥
ट्रों ट्रों मीपण शब्दें गर्जे डबकीं बसूनि दर्दुर तो ॥ ३२५ ॥
सौख्योपभोग नृप घे द्रव्याचा मिळविल्या[१७१] श्रमें दुबळी. ॥
मुंग्या वारुळ करुनी त्यांत शिरे आयताच नाग बळी ॥ ३२६ ॥
व्यसनि-जनांचे दुर्गुण होती उघडे न राहुनि विचार. ॥
नाचे शिखी[१७२] प्रमोदें घननादें परि दिसे गुदद्वार ॥ ३२७ ॥
ये वठणीस रुळलिया कामीं, रागीट पुरुष धन कमवू. ॥
अंगीं काठिण्य अधीं, होते मग तिंबिल्या कणीक मऊ ॥ ३२८ ॥
सवती सवतीचें मन सहज पृथक् सर्व ही रितिभाती. ॥
भार्गव-भूस्थ[१७३]-स्त्रीकृत जैं शीतनशीत मोकळें भातीं ॥ ३२९ ॥
जन-भाषणीं सकलही कळते सूज्ञा गुण-प्रभा त्याची. ॥
सहजचि होय परीक्षा एका शीतें समग्र भाताची ॥ ३३० ॥
गुणवान् दुःखचिपावे पराश्रयें, निर्गुणी सुखी असतो. ॥
मंजुळ वाणीनें शुक बंधन पावे,फिरेच वायस तो ॥ ३३१ ॥
लाखाच्या मत्तेला काडीची दाबण्या पुरे सत्ता. ॥
लघ्वंकुश आकर्षी सहजी नगशा प्रचंड गजमत्ता ॥ ३३२ ॥
सेवुनि विषय ह्मणे जन, हें विष आतां पिईन काधिं मी न ॥
गळ टोंचितां गळीं, मग नलगे आमिष ह्मणे मजशिं मीन ॥३३३॥
संगति विषयि-जनांची ने ओढुनि विषय-वासनीं सु-मना. ॥
घे धांव परिमलातें चित्त, करीं अंगिकारितां सुमनां[१७४] ॥ ३३४ ॥
स्त्र्यभिलाषीं मन जडतां सुजनहि अविचार-वर्तनीं शिरतो. ॥
नूरजहान स्त्रीतें तप्तानि मारुनि वरी जहांगिर तो ॥ ३३५ ॥

---

१७१ मिळविलेल्या. १७२ मोर. १७३ कोंकणस्थ स्त्रीनें केलेला. १७४ पुष्पास.

सांगितलेली बुद्धि न समयास पडेल अल्प कामातें. ॥
ना पोंचवी शिदोरी इच्छितशा दूरच्या मुकामातें ॥ ३३६ ॥
ज्ञानांकुर त्या वरती करितां उपदेश होतसे फलद. ॥
मूलांकुर कायम, मग वाढे तरु उदक शिंपितां जलद ॥ ३३७ ॥
वेश्या वसुनि महालीं तुच्छ ! ! सती वसुनि उटजिं मान्यचि ते. ॥
कांच शिरीं, मणि पादीं, धरितां किंमत न वाढते घटते ॥ ३३८ ॥
थोडें थोडें ह्मणवुनि ऋण, वसतां तें करील कोश रिता. ॥
उदरस्थ स्वल्पाहि गद उपेक्षितां होय जीविता हरिता ॥ ३३९ ॥
जगतांत आंगराखू जन केवळ भूमिभार विपिनचर. ॥
न भिजे, न शिजे, न रुचे, चणकीं[175] उपयोग ना करी कुचर ॥ ३४० ॥
जनकपणीं उपदेशिति, बालपणीं खेळलेच कुत्सा जे. ॥
आधीं उनाड, मग ती वृद्धा नारी पतिव्रता साजे ॥ ३४१ ॥
ज्यावरि अवलंबे गृह, रक्षावें त्या नरास सर्वांहीं. ॥
नौका फुटतां, लोकीं वाहावें कां न तरि दिशीं दाहीं ? ॥ ३४२ ॥
श्रद्धा भक्तिन जेथें, उपदेशुनि त्या नरा न फल कांहीं. ॥
नग गुंफिलें फुकट, *ज्या सोडियलें स्त्री-शिरास *अलकांहीं[176] ॥ ३४३ ॥
शब्दांचा बहु भरणा, धातूंचे[177] ज्ञान परिन, तरि वाया. ॥
माहाल सात ताली डगमागेत जरि न मुस्तकिम पाया ॥ ३४४ ॥
आदायाहूनि अधिक न करावा खर्च किंचिदपि रावें. ॥
सुविचारें पुरुषानें पाहुनि अंथ्रूण पाय पसरावे ॥ ३४५ ॥
न कुकर्मीं अनुसरला, ऐसा जन या जगामधें विरला. ॥
सावच नाऽऽढळला जो, देखियला चोर परगृहीं शिरला ॥ ३४६ ॥
श्रीसंबंधें कोणावर ठेवावा न भरंवसा कसला. ॥
औरंगजेब बंधुप्रति विश्वासोन मुराद बहु फसला ॥ ३४७ ॥

---

१७५ हरबऱ्यांतील. १७६ केसांनीं. १७७ मूळ बीजांचे.

उन्मत्त कितीहि असो, परि मर्मी भेदिल्या सहज वळतो. ॥
सांकुश महात देखुनि येइ गजाहि नम्रतेसह जवळ तो ॥ ३४८ ॥
आयुर्वृद्धि स्वबळें कोणी न करूं शकेल, न वदाऽसें. ॥
श्रीचांगदेव जगला वर्षं विद्याबळेंचि चवदाशें ॥ ३४९ ॥
जोडिति हस्त प्रबळा, जन भेकड मूर्ख काळ गरिबाचे. ॥
खडतर देव नवासिती, आठविती परि न अज्ञ हरि वाचें॥ ३५० ॥

# विभाग था.

## जनासउपदेश.

॥ साक्या ॥

( पशु, पक्षी, कीटकादिकांचे ग्राह्य गुण. )

अश्वाचा रणधीरपणा, हा गुण घ्यावा सर्वांहीं ॥
स्वतां निभुनि, जो धन्यास समयीं रक्षाया तनु वाही ॥ १ ॥
अल्प तृप्तता, अश्रांतपणा, सोशीकपणा भारी, ॥
हे रासभ-गुण हितकर मनुजा होतील व्यवहारीं ॥ २ ॥
स्वोदररक्षित-जलें, प्रसंगीं शमवी उंट तृषेस. ॥
ह्या न्यायें ठेवीत असावें प्राप्तींतुन धन शेष ॥ ३ ॥
द्विरद-गंड-भेदनीं *हरीच्छा हरतां शक्तिहि सारी. ॥
ह्या सिंह-गजन्यायें मनुजें वर्तावें स्वाचारीं. ॥ ४ ॥
श्वानगजन्यायवत् कुजन-मुख दुर्वचन न परिसोनी, ॥
स्वकुल-पथाचरणें वर्तावें लोकीं सत्पुरुषांनीं. ॥ ५ ॥
सहज जागृति, प्रामाणिकता, कृतज्ञता, हे तीन ॥
श्वानापासुनि घ्यावे सद्गुण. परंतु जन घेती न. ॥ ६ ॥
बिडाल-कार्यैकलक्ष्य, उद्यम, हे गुण घेतां कोणीं, ॥
खाया नित्य मिळेल न कां मग, त्यां पय दधि घृत लोणी ? ॥७॥
पर-सुगुणाऽगुण-मिश्रण, त्यांतिल सद्गुण-वेंचे घ्याया ॥
पुढें सरा जनहो अवलंबुनि हंसक्षीरन्याया. ॥ ८ ॥

---

१ नेहमीं कामास जुंपलेला असा. २ गाढवाचे गुण. * सिंहाची इच्छा. ३ मांजर.

साधाया निजडाव, करावा गुरु तो एक बकाक.[४] ॥
मौन धरुनि, समयीं कार्य पुरें साधा. न पुन्हां हाक. ॥ ९ ॥
कोकिल-मंजुलरव–गुण घेउनि भाषण मधुर असावें. ॥
कीं सर्वांचें वळूनि सहजीं मन तेथेंचि विसावें. ॥ १० ॥
निज हक्क पुरे स्थापन व्हाया, भाऊबंदीं मागें ॥
न सरावें. तित्तिर-गुण घेउनि झुंजावें नयमार्गें ॥ ११ ॥
मोव्या उठुनि पहाटीं आपण, जागृति द्याया सर्वां ॥
कुक्कुट-गुण घेउनि साधावें मनुजें उद्यम-पर्वा ॥ १२ ॥
सर्व दृष्टता, निज सुख-दुःखीं स्वजन-स्मरण, दृढैक्य, ॥
हे वायस-गुण, जनांस करितिल जिंकाया रिपु शक्य ॥ १३ ॥
पिपीलिकेचे अजिंकसे गुण यत्न, श्रम, येकोपा, ॥
घेतां जन, त्या हटेल, इंद्राहि जरि पावुनि ये कोपा. ॥ १४ ॥
पक्ष कोणता एक धरालिया मग धरसोड न त्यांत, ॥
व्हावी. हा गुण मगरीं घ्यावा. मगर-मिठी विख्यात ॥ १५ ॥

---

## मनास उपदेश.

( देहाऽशाश्वत स्थिति )

॥ श्लोक ॥

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

वाग्धीज्ञान-विशिष्ट देह मनुजा[१] देवें अपारा दयें ।
देऊनी, वर पांच पांच दिधलीं तीं ज्ञानकर्मेंद्रियें. ॥
ऐसा मानवदेह दुर्लभ तुला चौऱ्यांशि लक्षीं भला ।
लाभे. सार्थकता मना करुनि घे जों काळ ना ठेपला ॥१॥

---

४ बगळा. १ मनुष्याला.

## दिंड्या.

मनुज-देहा आयुष्य-गणाति साची, । जरी केली ईश्वरें *शताऽब्दांची. ॥
विशीं मरती, चाळिशीं, किती साठीं, । मना सावध झट होय याजसाठीं॥ २॥
मना आयुष्यीं नेम नसे कांहीं, । त्यांत बाहात्तर रोग वास देहीं ॥
करुनि, पीडिति शिणविती फार काया.।यांत गेलारे काळ किती वाया.॥३॥
मना नाना संकटीं, विपत्तींत, । किती पोटाच्या व्यर्थ खटपटींत, ॥
नित्य गृह धन घोकितां पुत्र जाया, । यांत गेलारे काळ किती वाया.॥४॥
"काय वय झालें फार आपलें कीं? । अझुनि नाहिंत पाहिल्या सुना लेकी"॥
वदुनि ऐसें, अवलंबितोसि माया. । मना गेलारे काळ किती वाया.॥ ५ ॥
"पुढें सार्थकता करूं स्वदेहाची. । मना वदसी. भ्रम परी व्यर्थ हाची."॥
दिवस न कळे येईल कोण कैसा ? । नसे देहाचा घडीचा भरोंसा. ॥ ६ ॥
न येईल व्यंगता आपणातें, । कधीं कोणीं करूं नये या पणातें. ॥
शतहि वत्सर चालेल देहगाडा. । क्षणीं होइल कीं कलंडुनी खोडा. ॥७॥
देहयंत्र जणो घड्याळ कीं वाटे. । शिथिल याचे होउनी चक्र कांटे, ॥
कधीं न कळे, बिघडेल हें घड्याळ. । बंद केव्हां कीं नेम ना पडेल! ॥८॥
किती जपलों मुद्दाम, तरी ओघें । क्षणीं कोण्या विकृतिनें अगर रोगें, ॥
घडुनि अथवा अपघात मना कांहीं, । काय देहीं होईल नेम नाहीं. ॥९॥
क्षणीं जाउनि अर्धांग होय दीन; । बधिर, मूकहि, जन होय दृष्टिहीन; ॥
फिरुनि जिव्हा होईल बंद वाणी; । मना अथवा होईल जीव हानी. ॥१०॥
तसें संपत्तैश्वर्य आज भारी. । मना हिसती हय, झुले गज द्वारीं. ॥
विभव जाउनि तें, लोटतां निशी न, । पडे पायीं शृंखळा. होय दीन.॥११॥
म्हणुनि कायम जंव नयन निर्विकार, । मना पाहुनि घे सृष्टि-चमत्कार; ॥
घेइं जाउनि दर्शनें सज्जनांचीं; । नीतिधर्मपर ग्रंथ सदां वाचीं. ॥ १२ ॥
श्रवण असती, तंव हरि-कथापुराणें, । ज्ञाननीतिग्रंथेतिहास, गाणें, ॥

---

* शंभर वर्षांची.

मना निज-जनपद-जनहितार्हवाद,।ऐक.दीनांची तशिच हाक दाद.॥१३॥
सरळ रसना, तंव हरि-कथाऽमृताला । प्राशुनी, गा संगीत धरुनि ताला.॥
लोक सद्गुण तिवुकेच मात्र वार्णी[3] ।लोक कल्याणीं वेंच मना वाणी.॥१४॥
जंव अकुंठपणा हस्त पाद गात्रां, । मना देशाटण करीं तीर्थयात्रा. ॥
धर्मदानीं, सत्कर्मी, स्वहस्त । लोककार्यी वाहोत वा प्रशस्त ॥१५॥
नराचि नारायण होयशी तनू ही । दिलीं दैवें. तो त्वत्स्मृतींत नाहीं !! ॥
यदेच्छेनें उत्पन्न जग जहालें. । यदेच्छेनें तें स्थिरे आणि चाले. ॥१६॥
यदिच्छेनें स्थिर-जंगमें रहाती. । तशी संतत चालली जग-रहाटी. ॥
यत्स्वसत्तेविण दिन नहो, क्षपा न.।काय सांगूं हाले न वृक्षपान. ॥१७॥
अशा विश्वेशा जगच्चालकाशीं। भ्रमें कैसा विसरुनी मना जाशी ॥
करिशि मी मी मी व्यर्थ अहंकारें.।सतत काळ पुढें टपुनि उभा बारें॥१८॥
उडी काळाची बा पडेल जेव्हां, । बंधु ललना सुत सोडवी न तेव्हां. ॥
प्रियाहि परिचित जन, आप्त,सोयराही,।ह्मणे आतां यांत,ना सोयें राही॥१९॥
सर्व अंतरुनी वतन, वित्त, वाडा, । तुझ्या राषतिचा होउनी भर्वांडा, ॥
मना घेशी जैं वास तूं स्मशानीं,।कशी राहिल ते स्थळीं तुझी शानी?॥२०॥
पहा, जेथिल तेथेंच सर्व राही. । कोण राखिल मग तुझी सरबराई ? ॥
चितीं ठेवुनि, मंडळी परततां ती,।एक येइल रे धर्म तुझ्या साथीं.॥२१॥
सर्व मायिक इहलोकिचा पसारा!। व्यर्थ हव्यासहि खटाटोप सारा ! ॥
एक निर्वाणीं देव मात्र थारा. । मना सावध हो करुनि ह्या विचारा.॥२२॥
मना होईं प्रभु-चरण-तराणि-लीन। सहज जाशिल मग तरुनि भवनदीन.॥
ऐस संसारीं सर्व काम,धंदीं.। परि ध्यास असो ईश चिदानंदीं..॥२३॥
सुसंगत्यौषधि ईवी यास मूळ. । सहज नाशिल ती भवनदी समूळ. ॥
मना वंदुनि तरि साधुचरणधूळ,।स्वच्छ हो, जो तूं विकल्पें गढूळ.॥२४॥

---

२ स्वदेशीय लोकांच्या हिताविषयींच वादविवाद. ३ वर्णन कर. ४ गात्र. ५ अर्थ, जीव. ६ अखेरी. ७ सरणांत. ८ पाहिजे.

सार मुख्याचें,जों अवाधि असे कांहीं,।त्वरित करुनी घे तरणें या नृ॑कार्यीं. ॥
मना जविंहि ।शिव एकरूप पाहीं ।कथी के.स.रि.मग जन्म पुन्हां नाहीं २९

## स्वतरणोपाय.

### पद (भूपाळी)

मनारे॥येउनि नरतनुगृहीं।कर उदिम असा,कीं जन्माचा सौदा होइल सही।ध्रु
म०॥तुझिया वय-मोसमीं । सत्संगति धरुनि, ईश्वरासम मातापितरां नमीं ।
,, ॥ प्राप्तस्थितिला श्रमी । ना होउनि,शांति समाधानाहि ठेवीं हृदयाश्रमीं।
,, ॥ स्वकुलाचारक्रमीं । भंग न पावुनि, पोटासाठीं उद्योगा आक्रमीं. ।
,, ॥ क्रोधीं होउनि शमी ।सदां भाषणीं नम्रपणा धर मृदुता जणुं रेशमीं.।
,, ॥ अहंपणाच्या भ्रमीं। भ्रमुनि,न ह्मण एक मीच लोकीं सर्वज्ञाहि विक्रमी.।
,, ॥ ना कोणाचें कमी । उच्चारुनि, निर्मासर्ये हो जनापराधीं क्षमी. ।
,, ॥ स्व-स्थावरजंगमीं । घे उपभोग. न इच्छा धर पर-जायाधन-संगमीं.।
,, ॥ दीनावर नेहमीं । दया असो. पारि भर न कुणाची असक्षथानें हमी.।
,, ॥ नपड अविद्या-तमीं । नीतिधर्मसुविचारें ठेवीं निष्ठा पुरुषोत्तमीं. ।
,,॥स्वीकारीं गोष्ट ही।कर उदिम असा कीं जन्माचा सौदा होइल सही॥१॥
मनारे ॥ चंदन वृक्षापरी । परोपकारी झिजुनी, अद्वैतत्व-वसन वापरीं. ।
म०॥संसार सुखें करीं।परि त्यांताचि गुंतुनि न राहीं जणु कमलीं मधुकरी.।
,, ॥दारा पुत्रीं धरीं । आवड, परि हरि-नामामृत पीं सप्रेम स्वौऽधरीं. ।
,, ॥निज-कामीं शंभरीं । ऐस. परंतु त्वत्ध्यास सदां राहो विश्वंभरीं. ।
,, ॥जगदात्मा प्रभु जरी। दृष्ट न, तरि त्या ओळखुनी घे सृष्टच्यिा स्थिरचरीं.।
,, ॥विपिनीं ऐसाहि घरीं,।दृढ धर हरिपद-नौका;ती तुज तारिल भवसागरीं.।
,, ॥रामचिं दो अक्षरीं । तरले उदकीं दगड. पहा तो राम सबाह्यांतरीं.।

---

९ तारण. ९॥ नरदेहांत. १० तारुण्याचे भरांत. ११ खात्री, (जामिनकी.)
१२ भृंग. १३ मुखीं.

,, ॥स्थिति होतां यापरी,।चारि मुक्ति रुळतील पदीं.हें कथितो गुज के.स.री।
संमत लोकीं तिहीं।कर उदिम असा कीं जन्माचा सौदा होइलसही॥ २ ॥२६॥

पद.

( गड्यांनो कृष्ण गडी अपुला या चालीवर. )

मना कर सार्थक झट कांहीं । ये न पुन्हां गत घटकाही ॥ध्रु०॥
मानीं सार न संसारा । अवघा लटकाच पसारा. ।
खंडुनि माया-भ्रम सारा । घे परमेशीं उपसारा. ।
करुनी घे निज सुटका ही । येन पुन्हां गत घटकाही ॥ १ ॥
नरतनु ही बहु नवसाची । लाभे तुज दो दिवसांची. ।
शाश्वति नाहींच कशाची । एकैश-स्थिति चिर साची. ।
मोहे भ्रम न दिशीं दाहीं । ये न पुन्हां गत घटकाही ॥ २ ॥
सोडुनि सर्व अहंकारा । घे सद्गुरु चरणीं थारा. ।
कर आत्मानात्म-विचारा । प्राशीं परमामृत-सारा. ।
मननें जिंकीं रिपु साही । ये न पुन्हां गत घटकाही ॥ ३ ॥
ज्यानें निर्मियलें विश्वास । तच्चरणीं ठेवुनि विश्वास. ।
त्यजितां घेतां श्वासोच्छ्वास । घेईं प्रभुनामाचा ध्यास. ।
जगहें एकरूप पाहीं । ये न पुन्हां गत घटकाही ॥ ४ ॥
सर्वांभूतीं सम ममता । ठेवुनि, करिं मस्तक नमता. ।
ऐशी होतां बा समता । पावे भवनिधि गोष्पदता. ।
हा देतो के.स.रि. गांही । येन पुन्हां गत घटकाही ॥५॥२७॥

पद.

( तों सचिवमतें जाय घेउनी पत्र )

कां नाठविशी देव सखा कैवारी ? । जो जनन मृत्युतें वारी ॥ध्रु०॥
तनु चौऱ्याशी लक्ष फिरुनि असारा । आलास नृतनु—संसारा ।

---

१४ विश्रांति. १५ अखंड. १६ साक्ष. १७ नीरस अशा.

या मायेनें ह्मणसी भ्रमुनि उदारा। माझेच बंधु सुत दारा।
परि चलतीचा जंवाचि घरांत उबारा। तव भोंतीं हे जन वारा।
तुज नागवुनी जातिल हे परभारां। समयास करुनि पवबारा।

चाल.

वेष्टिलास सकल जनांहीं.। परि समयीं कोणी नाहीं.।
कशि समजुत तुज न मना ही। काळ हा टपूनि वंर्ना[18]ही.।
मग कोण तुला मृत्युचिया दरबारीं। होईल साह्य घरवारी? ॥१॥
कां नाठविशी देव सखा कैवारी। जो जनन मृत्युही वारी ॥ ध्रु० ॥
या संसारीं लोभ धरूनिया लटका। आयुष्यीं करिशी लुंटे[19] कां?।
हा काळ तुला चकवुनि देउनि झुंटका। जातसे करुनि पळ घटका?।
या काळाचा शिरीं एक दिन सेंटका[20]। बैसतां, कशाची सुटका।
घे प्रभुनामामृत-प्रेमरस-घुटका। तोडील भवाचा तटका.।

चाल.

दुर्लंघ्य अफाट भवा या। प्रभुनामशक्त अटवाया।
तो हृदयीं प्रभु अठवाया। घालवूं नको क्षण वाया।
काथे के.स.रि. कीं गत घटका, उपचारीं। येइना फिरुनि माघारीं।
कां नाठविशी देव सखा कैवारी। जो जनन मृत्युतें री ॥ध्रु॥२८॥

पद.

(धणी सकल तरणि या चालीवर)

मना भ्रमर होउनि ईशचरणकमलसुरस पी ॥ ध्रु०॥
गातां मुखिं ईशनाम।पुरवुनि तें सकल काम।दे चिरसुख गति निजपदिं।
जी न कधीं। पावले तपी। ॥ १ ॥ मना भ्रमर० ॥
अजामिल भ्रष्ट विप्र। पिंगलाहि तशी क्षिप्र। ईशनाम वदुनि वदनिं
निधानिं तराति। अघी यद्यपि ॥ २ ॥ मना भ्रमर० ॥

---

१८ वनसर्प. १९ लूट. २० गुंगारा. २१ सोडगा.

जाउनि सप्रेम शरण । धरितां दृढ ईशचरण । उद्धरती खटनट चट

पशुहि निपट । नक्र गज कपी ॥ ३ ॥ मना भ्रमर०॥

काथे के.स.रि. हा नृ-काय लाभुनि, तूं करिशि काय? । काळ उभा

टपुनि सतत होय निरत।प्रभुचिया जपीं॥४॥मना भ्रमर०ध्रु०॥२९॥

पद.

( उद्धवा शांतवन करिजा या चालीवर )

भवविश्रम सीतारामीं घेइं मना सतत विसावा ॥ ध्रु०॥

ब्रह्मांड-रक्षणासाठीं । गिरिजेश हलाहल प्याला. ।

त्या योगें सर्व शरीरीं । दाह तो असह्य जहाला. ।

तच्छमना स्वशिरीं धरिली। गंगा हि बिल्वतरु-पाला; ।

शीतरश्मि[२२], शीतल व्हाया । केला मग भूषण भाला; ।

चर्चूनि भस्म सर्वांगीं । भूषविलें कंठीं व्याला; ।

झालाहि हिमाचलवासी; । तरि नाहीं ताप निवाला. ।

चाल.

रामनाम वदतां वाचा । दाह शांत होय शिवाचा. ।

तेथें भवताप कशाचा?।तो हृदयीं राम वसावा॥भवविश्रम.।ध्रु०।१॥

महा दुष्ट निर्दय पापी । मानवघ्न मार्ग लुटारू; ।

सदां घोष ज्याच्या वदनीं । पांथस्था ठोकू मारूं; ।

ज्या पाहुनि जन भय पावे । पावकास भी जैसा रू; ।

होय जगा तोचि दुरात्मा । भवसागर पार उतारू. ।

चाल.

रामनाम घोषें विपिनीं । वाल्ह्याचा वाल्मीकि मुनी ।

होय.हें समजुनी स्वमनीं।तो नयनीं राम दिसावा॥२॥भव०॥ध्रु०॥

भोगियली साध्वी इंद्रें । कपटाचा करुनी कावा; ।

---

२२ चंद्र.

त्या योगें पतिशापाचा । होतसे तीस अटकावा; ।
होउनी शिळा ती पडली । हा वृत्तसार ऐकावा; ।
संवत्सर षष्ठिसहस्रीं । श्रीराम येइ त्या ठावा. ॥भवविश्रम॥ ध्रु० ॥

चाल.

मिळतांच रामपद-वशिला । उठलीच अहल्या सुशीला ।
यद्यश-गुण-माहिमा असला,।तो के.स.रि.वरि न रुसावा॥ २॥भव०ध्रु॥२०॥

## परमेश्वराची प्रार्थना.

पद.

( भला जन्म हा तुला लाधला. या लावणीचे चा० )

काय करूं कसें करूं लागली अष्टाक्षर-घोंकणी।वारिं हें संकट चिंतामणी।ध्रु.।
दृष्टिविना ही सकल सृष्टि मज । भासे शून्यापरी । नलगे गोड सबाह्यांतरीं।
अहर्निशीं टोंचिते काळिजा।तीक्ष्णा चिंता-सुरी।धडक ही भारी भरली उरीं।
नानापरिच्या विचार-लहरी । उचंबळुनि इत्तरीं । जीव हा धाके वरचेवरी।
पडलों खात गटगळ्या दुर्धर।दुःख-महासागरीं।पहासी वाट किती यावरी?।

चाल.

तूं मायबाप, अज्ञानचि मी लेंकरूं. ।
तरि हेलसांडुनी नको उपेक्षा करूं. ।
तूं तारक, तुजविण पाय कुणाचे धरूं. ? ।

गेल्यावरि जीव, मग औषधी।अर्थ काय पाजुनी।वारिं हें संकट चिंता०।१।
मनांतील हौस, हेतु, इच्छा,।सर्व मनांतचि उरे।जीव हा यास्तव भारी झुरे.।
स्वतंत्रता-निजकांताविरहे । मन भारी हुरहुरे । नेत्रिचे खळतीना अश्रुरे. ।
रांड पराधिनता घुसुनी घर।मजशिं करीबावरें।भ्रमुनि मन एक न जागीं स्थिरे।
सर्व सिद्ध असुनि जाहलें मज।नाहींसें जग खरें।सुखी मजहुनि डोळस पांखरें।

## चाल.

हे दयानिधे उपजे न अझुनि कशि दया ? ।
हे विघ्नहरा मत्संकट वारीं भया. ।
द्या दर्शन, देउनि दृष्टि सेवकास या. ।
वदान्य तूं, के.स.रि मी याचक, ।दीन उभा आंगणीं।वारिं हें संकट चिं०।२।१।

## पद.

( कितिरे असती तूं निष्ठुर रामा नव मेघश्यामा या चा० )
देवा, कां केली अकृपा इतुकी ? । पार जिच्या न तुकीं. ॥ ध्रु० ॥
वाटे, चुकलों न कधीं वा देवा, । वडिलांची सेवा. ।
न गमे, वुडविला पराचा ठेवा. । नाहिं केला हेवा. ।
वदलों, अतिथांप्रति समयीं जेवा । जणुं भाषण मेवा. ।
स्वमनीं धरुनि कधीं कृत्रिमभावा. । न वंचिलें भावां. ।
काय होय मग विभो कळेना । अक्षम्य अशी मजकडुनि चुको?॥ १॥देवा.॥
धर्म-स्वाचारीं किमपि न ढळलों. । सत्संगीं जुळलों. ।
न कधीं दुर्बुद्धि-मळानें मळलों । दुर्व्यसनीं गळलों. ।
दीनां साह्य करूं, ना पेंगळलों. । सुजन-पदीं रुळलों. ।
जरि संसृति-मोहगुणें आंवळलों, । सत्कार्यीं वळलों. ।
असहनार्ह मग मजकडुनि विभो।नकळे घडली दुष्कृति अमकी॥२॥दे.॥२
झालों उपदेशक देशहितार्थ । चिंतुनि न स्वार्थ. ।
लोकीं वदलों मृदुवचन यथार्थ । गाउनि ना शर्थ. ।
केला प्राप्तींत सुखें चरितार्थ । कष्टुनि ना व्यर्थ. ।
कर्ता तूंच एक सर्व-समर्थ । कथितों मुख्यार्थ. ।
मग अपराधी शिशु के.स.रि. तरि । जनका क्षमा करीं या घटकीं॥३॥दे.॥

---

१ तुळेनला. २ संसारसंबंधी मोहरूप रज्जूनें. ३ असह्य.

पद.

( त्याचा हरि विकला हरि विकला या चा० )

जरि मी अपराधी । अपराधी । नकरा प्रभो परौं धी. ॥ ध्रु० ॥
केली दर्शन-सुकृपा । त्या मृग-घातक दुष्ट व्यौंधीं. ॥ १ ॥ जरिमी० ॥
गजेंद्रीरि उद्धरिला. । तो कां नक्र तुह्मां आराधी ? ॥ २ ॥ जरिमी० ॥
त्या पूतनेस दिधली । सायुज्य-स्थिति हरुनि उपाधी. ॥३॥ जरिमी० ॥
स्वकृपौषधें हरावी । या के. स. रि. ची चिंताव्याधी.॥४॥जरिमी०॥३॥

पद.

( बाई तो कां ? नव्हे नव्हे या चा० )

धांव धांव ईश्वरा मुकुंदा. । अझुनि काय अंत पहाशी ।
दुःख-सागरीं खात गटगळ्या । पडलों. तारक हो मजशीं ॥ ध्रु० ॥
कृपाघन, दयानिधि, करुणार्णव, । दीनबंधु, दीनदयाळ, ।
अनाथ-नाथ, पतित-जन-पावन, । शरणागतजनकनवाळ, ।
श्रांतौऽऽराम, व्यसनार्तजनानंदकंद, भक्तमवाळ, ।
वाटे, तुज ह्या बहु गुणवाचक नांवांचा लटका आळ. ।
मग मी दीन नव्हे कां देवा? । तूंहि दीनवत्सल नससी?॥१॥धांव धांव ई०॥
सर्वात्मा, सर्वभूतजीवन, । सर्वाऽवन, तूं सर्वेश, ।
सर्वोत्पत्तिस्थितिलयकर्ता, । सर्वातीताहि अविनाश, ।
विश्व-विभवरूपविद्गुणमतिज्ञानशक्ति, तूं अक्लेश, ।
जगन्माय तात, तूं जगत्सुख, । जगदाश्रय, जगदावेश, ।
जगद्व्यापका, ऐकाया मग । हाक नये माझीच कशी? ॥२॥धांव धांव ई.॥
पादस्पर्शे शिळा उठविली । हरुनि शापदुस्थिति सारी; ।
अमृतदृष्टिनें मृतगोपगणा । जीवविलें यमुनातीरीं; ।

---

४ परकी. ५ पारध्यावर ( शिवलीलामृतांतील अध्याय दुसरा पहा. ) ६ नक्र.
७ थकलेल्यांचा विश्रामबाग.

कुब्जा करुनि सरळ, जांबुवती । केली त्वां सुंदर नारी; ।
निजसख विजय-प्राणरक्षणा. । सूर्य लपविलास दुपारीं; ।
ऐशा तुज, मद्दुःख हराया । काय असे खटपट बहुशी?॥ ३ ॥धांव धांव ई.॥
कोठें जावेंचि लेंकरें ? जरि । मायबाप देति न थारा ? ।
जल कोपे जलचरीं, तयांनीं । जावें मग कोणे द्वारां ? ।
ध्यावा आश्रय कुठें नदीनें । सिंधु धरिल जरि तुंबारा ? ।
राजोपेक्षीं प्रजें वदावें । कोणा. " मत्संकट वारा " ? ।
हाक मारितो,ओ देउनि,द्या।दर्शन दासा के.स.रिशीं॥ ४ ॥धांव धांव ई.॥ ५॥

## ॥ ग्रंथसमाप्तिवर्णन. ॥

### कटाव.

व्यवहारसुपद्यसहस्त्र । ग्रंथ जो येथवर लिहिला । तो परिसाविला ॥ ध्रु० ॥
शालिवहान शके अठराशें। उमेशमुखसंख्यांक[1] त्यावरी. । सुभानु संवत्सरीं सुखदसा, । सदा पवित्राहि बहुशिवदायक, । तो नवममास नामें परिसा । मार्गशीर्ष मास ज्यास वदती. । चाबूक जयाचा तो थंडचि[2]. । हेमंतऋतु अधिकार करी. । रथ घडघड चाले, बाजी[3] बहु । समीर केवळ. । शुक्लातिथी सप्तमी. सहावी । तारिख इंग्लिश इसावे सनाची. । डिसेंबर ख्रिस्त जन्म मासचि. । अठराशें त्र्यांशींत जीवे[3॥]-वासरीं पहाहो. । रचुनि लघुग्रंथ, श्रीजानकिनाथ जनस्थान-क्षेत्रीं श्री । गोदातिरीं । लोकीं विख्यात व्हावयाला । श्वेतद्वीपस्थ[4] इंग्लिशकळा । बहुचित्तचमत्कारि यंत्रांवर[5] । छापुनि लोकेक्षणीं[6] ठेविला । बहुत अगत्यें. । मात्र समर्पक त्यांतिल भाषण । सुजनीं ग्रहण करुनि, बहुतापरि । उदार हस्तें । दीजे आश्रय के. स. रि. ला.

---

१ पांच. २ थंडीचे दिवस इत्यर्थः. ३ शाळू दिवस इत्यर्थः. ३॥ गुरुवारीं ४ ग्रेटब्रिटन बेटांतील. ५ खिळे यंत्रावर ( टाइपावर. ) ६ लोकदृष्टीस.

समाप्त.

# व्यवहारपद्यसहस्र पुस्तकांतील अशुद्ध शब्दादिकांचें शुद्धिपत्र.

| पृ० | क० | ओ० | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | सूर्याऽक-र्षणें | सूर्याऽऽक-र्षणें |
| २ | ७ | १ | सिंधु-जला-ऽकर्षण | सिंधु-जला-ऽऽकर्षण |
| २ | १० | १ | सर्वही | सर्वहि |
| ३ | २५ | २ | दुर्मार्ग-वर्त-नीं | दुर्मार्ग-वर्तनी |
| ४ | २७ | १ | अनिवांर | अनिवार |
| ४ | २७ | १ | आबरिता | आवरिता |
| ४ | ३१ | २ | अजाणता राहो | अजाण तारा हो |
| ६ | २ | ४ | जन्मदां | जन्मदा |
| ९ | १६ | ४ | पायघड्यास | पायघड्यांस |
| ९ | १७ | २ | प्रेमाऽस्था | प्रेमाऽऽस्था |
| १२ | ३७ | १ | वाहुनि | वाहूनि |
| १३ टीप | ४१ | ३ | यज्ञानें | यज्ञातें |
| १५ | ५१ | १ | हुंबरें | हूं बरें |
| १६ | ५८ | १ | ठेवाया | ठेवाया, |
| १७ | ६० | १ | खरी, जन-निची | खरी जननिची, |
| १७ | ६१ | १ | मलूल, आ-सुची | मलूल आसुचीं, |
| १७ | ६३ | २ | प्रतिपाळ, फार झिजु-नी ती | प्रतिपाळ फार झिजुनी, तीं |
| १८ | ४ | ३ | साम, दंडें ; | साम-दंडें ; |
| १९ | १० | ३ | तीं | ते |
| २० | १४ | ४ | दिसतते | दिसतसे |
| २३ | ५ | ४ | पति-सुखीं | पति सुखी |
| २४ | ११ | ३ | दासी-दा-सावर | दासी-दासां-वर |
| २४ | १४ | ४ | पडे, कस्तु-रीची, | पडे कस्तूरी-ची, |
| २५ | २२ | १ | करुनि | करूनि |
| २६ | २४ | ३ | याच्आक-र, | याञ्चाकर |
| २६ | २५ | १ | सलगिचे, | सलगिचे |
| २७ | ३० | १ | लक्ष्मी, वि-ष्णु | लक्ष्मीविष्णु |
| २७ | ३४ | २ | संपत्ति वि-पत्तिला | संपत्ति-विप-त्तिला |
| २८ | ३६ | १ | स्त्रीला अ-धिकार | स्त्रीला ना अ-धिकार |
| ३४ | ८ | २ | तयां | तया |
| ३७ | २ | १ | कोणी | कोणीं |
| ३७ | २ | १ | विद्याकुल-वधविशीं | विद्या-कुलव-धुविशीं |
| ३८ | १० | ३ | झटती | झडतीं |
| ३८ | ११ | १ | विद्या-कोरी | विद्या कोरी |
| ३८ | ११ | २ | वांधी | बांधी |
| ४२ | १३ | १ | जन हितक-र्णीं | जन-हितक-र्णीं |
| ४२ | १४ | ४ | वंदू | वंदूं |
| ४२ | १४ | ४ | देश'काका' | 'देशकाका' |
| ४२ | १४ | ४ | त्या | त्यां |
| ४३ | १६ | ४ | नोका | नौका |
| ४३ | १६ | ७ | नचं माना-बंधु | नच माना बं-धु |
| ४३ | १७ | ३ | जन रीत्यौघ | जन-रीत्यौघ |
| ४४ | १८ | ३ | जन हित | जन-हित |
| ४४ | १८ | ३ | म्हणोनि | म्हणोनी |
| ४४ | १९ | २ | स्वविद्या दा- | स्वविद्यादा- |

| पृ० | क० | ओ० | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|
| | | | तृत्वें | तृत्वें |
| ४४ | २० | ३ | जन हिता-र्थी | जन-हितार्थी |
| ४४ | २१ | १ | वर्णास | वर्णांस |
| ४५ | २७ | ३ | धन वंतींच | धनवंतींच |
| ४६ | १ | १ | नृपाधिका-र, पुरुषा | नृपाधिकार पुरुषा, |
| ४६ | १ | २ | त्यांच्या | त्याच्या |
| ४६ | २ | २ | लोक धना-ऽभिलाष | लोक-धना-ऽभिलाष |
| ४७ | ९ | २ | अनहित क-रणी | अनहित-क-रणीं |
| ४८ | १२ | ३ | लोकद्रव्या-ऽभिलाषीं | लोकद्रव्या-ऽभिलाषीं |
| ४८ | १४ | १ | ववाची | बवाची |
| ४८ | १५ | ३ | चहाती, | चहाती. |
| ४९ | १ | १ | स्थळिच | स्थळींच |
| ४९ | १ | १ | राजयाच्या | भूपतीच्या |
| ४९ | २ | १ | राजसत्ता बळें | राजसत्ता-बळें |
| ४९ | ३ | १ | बहुत-घो-ळिळें | बहुत घोळि-ळें |
| ४९ | ४ | २ | तारि | तरी |
| ५० | ८ | ३ | बोलुनि | बोलुनी |
| ५२ | ५ | ४ | दुजि | दुजिं |
| ५३ | ११ | ४ | कळे न | कळे न. |
| ५३ | १३ | १ | जाणती, | जाणती |
| ५३ | १३ | १ | दुजे | दुजें |
| ५३ | १४ | १ | तरले. | तरले |
| ५३ | १४ | ४ | तेंणें | तेणें |
| ५४ | १६ | ४ | होईल | होइल |
| ५४ | १७ | २ | स्वीकारुनि | स्वीकारुनी |
| ५४ | १ | ४ | ददात ; | ददात |
| ५४ | २ | १ | प्राप्रीचा | प्राप्तीचा |
| ५४ | २ | १ | पै | पैं |
| ५५ | ६ | ३ | तद्वोक्ता, दुजा, | तद्वोक्ता दु-जा, |
| ५५ | ८ | ४ | घाट | घांट |
| ५५ | ९ | ३ | ब्राम्हणा | ब्राम्हणां |
| ५५ | ९ | ४ | जहांगिरी | जहागिरी |
| ५६ | १० | १ | नजहितासा-ठीं | जनहितासा-ठीं |
| ५६ | १० | २ | डेव्हिड् सा-सून | डेव्हिड् सा-सुन |
| ५९ | १ | ३ | संगती | संगतीं |
| ५९ | ३ | ३ | पक्षीं कृमीं | पक्षी कृमी |
| ५९ | ४ | ३ | स्वकरणी, | स्वकरणी |
| ६१ | १५ | १ | धांके | धाकें |
| ६१ | १५ | २ | घेऊन | घेउन |
| ६२ | १६ | ३ | गुर्जरदेश वै-भवपती | गुर्जरदेश-वै-भवपती |
| ६२ | २० | ३ | नौका कृ-तीं ; | नौकाकृतीं ; |
| ६२ | २२ | १ | विपत्ति. | विपत्ति |
| ६३ | २३ | ३ | दे. | दे |
| ६३ | २४ | ३ | करी. | करी |
| ६३ | २७ | २ | निघे. | निघे |
| ६४ | १ | २ | प्राप्ति | प्राप्त |
| ६४ | ४ | ४ | धन्य. | धन्य |
| ६५ | ६ | ४ | आदरावें | आदरावे |
| ६५ | ७ | १ | पंग्वांऽध | पंग्वंध |
| ६८ | १ | ४ | देती ; | देती |
| ६९ | ७ | ४ | प्रेमा-ऽश्रु-लोट | प्रेमाऽश्रु-लोट |
| ६९ | ७ | ४ | सख भेटिंत | सख-भेटिंत |
| ७० | १५ | ४ | खिखाळती | खिकाळती |
| ७२ | १० | १ | यावनीं | यावनी |
| ७२ | १० | १ | धर्मांतरी | धर्मांतरीं |
| ७३ | १ | ३ | हर्षे | हर्षें |
| ७४ | ५ | १ | कोणी | कोणीं |
| ७५ | ३ | ४ | चित्त-थैर्य | चित्तस्थैर्य |
| ७६ | ७ | ४ | कदां, | कदां. |
| ७८ | ४ | २ | तो | ती |
| ७९ | १४ | २ | पराक्रम-क-लेस. | पराक्रम-क-लेस |
| ८९ | टीप१ | १ | करण्याचा | करणाऱ्याचा |

| पृ० | क० | ओ० | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|
| ९३ | १३ | १ | ब्रह्मबीज | ब्रम्हबीज, |
| ९३ | १३ | १ | उत्तमा ती. | उत्तमा, ती |
| ९८ | १२ | १ | तव | तंव |
| ९८ | १४ | ४ | तें | ते |
| ९९ | २० | ४ | नखा | न खा |
| १०१ | ६ | ४ | किति कीं | कितिकीं |
| १०५ | २३ | ४ | म्हणें, | ह्मणे, |
| १११ | ५१ | ३ | निमे | निंमे |
| १११ | ५१ | ४ | करूं | करुं |
| ११३ | ० | ० | विभाग ४ था. | विभाग ३ रा. |
| ११३ | ७ | २ | करुनी | करुनि |
| ११४ | १२ | २ | पगिलावी | परि लावी |
| ११६ | ३१ | २ | विंदुहि | बिंदुहि |
| ११८ | ५६ | १ | ावयाग, दुःखाह | वियोग, दुःखाहि |
| १२२ | १०२ | २ | नाऽकर्षी | नाऽऽकर्षी |
| १२४ | १२३ | २ | सुन्हृज्जन. | सुन्हृज्जन |
| १२५ | १२९ | १ | स्वाऽश्रय-यदा | स्वाऽऽश्र-यदा |
| १२५ | १३१ | २ | फ्रान्सिका-चें | फ्रान्सिस्को-चें |
| १२६ | १४४ | २ | जयद्रथ वध | जयद्रथ-वध |
| १२९ | १७६ | १ | आलस्या-ऽधीन | अलस्या-ऽऽधीन |
| १३१ | १७८ | २ | बाजी | वाजी |
| १३६ | २४९ | २ | ओंवाळणी | ओंवाळणीं |
| १३७ | २५० | २ | राम-ख्रि-स्तिव | राम-ख्रीस्तव |
| १३८ | २६० | २ | वसु | वसु, |
| १३९ | २७२ | १ | गृहिं | गृहीं |
| १४० | २८४ | २ | विष्णुशास्त्री टीप | कैलासवासी विष्णुशास्त्री |
| १४० | २८७ | २ | जयदेव स्वा मि | जयदेव-स्वा-मि |
| १४१ | २९० | १ | कच | कचें |
| १४१ | २९६ | १ | असो | असो. |
| १४२ | ३०२ | १ | राज्य मर्दें | राज्य-मर्दें |
| १४२ | ३०८ | १ | भली | भली, |
| १४३ | ३१४ | १ | अपलें | अपले |
| १४३ | ३२३ | १ | झाकुनि | झांकुनि |
| १४४ | ३२६ | १ | दुबळी | दुबळीं |
| १४४ | ३३५ | १ | ख्रयाभिला-षीं | ख्याभिलाषीं |
| १४४ | ३३५ | २ | तप्ताति | तत्पाति |
| १४५ | ३४७ | २ | औरंगजेब बंधुप्रति | औरंगजेब-बं-धुप्रति |
| १५० | १५ | १ | हस्त पाद गात्रां | हस्त-पाद-गात्रां |
| १५० | १६ | २ | येदेच्छेनें | यदिच्छेनें |
| १५० | २३ | २ | काम धंदीं | कामधंदीं |
| १५० | २४ | १ | ती भवनदी | भवरोग ती |
| १५९ | कटाव | १० | गोदातिरीं | गोदातीरीं |